सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | शनिवार, दि. ०१ नोव्हेंबर २०२५ | वर्ष - तिसरे | अंक २०६ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


# देशाच्या एकतेसाठी प्रत्येक नागरिकाने जबाबदारी स्वीकारावी - पंतप्रधान

**सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय एकता दिनाच्या कार्यक्रमात देशवासीयांना केले संबोधित**



गांधीनगर, ३१ ऑक्टोबर : देशाची एकता कमकुवत करणारी प्रत्येक कृती प्रत्येक नागरिकाने टाळली पाहिजे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले. पंतप्रधान आज गुजरातमधील केवडिया येथे सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय एकता दिनाच्या कार्यक्रमात देशवासीयांना संबोधित केले. राष्ट्रीय एकता ही काळाची गरज असल्याचे नमूद करत त्यांनी प्रत्येक भारतीयाने एकतेचा संदेश आत्मसात करावा, असे आवाहन केले.

सरदार पटेल यांच्या कार्याचा गौरव करताना पंतप्रधान म्हणाले की, त्यांनी देशाच्या सार्वभौमत्वाला सर्वोच्च स्थान दिले. मात्र त्यांच्या निधनानंतर आलेल्या सरकारांनी त्या दृष्टीने पुरेसे गांभीर्य दाखवले नाही, याबद्दल त्यांनी खेद व्यक्त केला. काश्मीरमधील चुका, ईशान्येकडील आव्हाने आणि देशातील नक्षलवाद-माओवादी हिंसा या सर्वांचा उल्लेख करत त्यांनी राष्ट्रीय सार्वभौमत्वावर थेट धोका असल्याचे सांगितले. पटेल यांच्या धोरणांऐवजी त्या काळातील सरकारांनी कमकुवत दृष्टिकोन स्वीकारल्याने देशाला हिंसाचाराचा फटका बसल्याची टीका त्यांनी केली.

या कार्यक्रमात पंतप्रधानांनी एकता नगरातील सकाळच्या विहंगम दृश्याचा उल्लेख करत सांगितले की, संपूर्ण देश आज एका ऐतिहासिक क्षणाचा साक्षीदार आहे. देशव्यापी एकता दौडीत कोट्यवधी भारतीयांचा उत्साहपूर्ण सहभाग पाहून नव्या भारताचा संकल्प प्रत्यक्षात साकार होत असल्याचे त्यांनी नमूद केले. सरदार पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त स्मृतीनाणे आणि विशेष टपाल तिकीट जारी करण्यात आले असल्याची माहितीही त्यांनी दिली. काश्मीरच्या विलीनीकरणाबाबत बोलताना मोदी म्हणाले की, सरदार पटेल यांनी काश्मीर भारतात पूर्णपणे सामावून घेण्याची इच्छा व्यक्त केली होती, पण त्या काळातील पंतप्रधानांनी ती इच्छा पूर्ण होऊ दिली नाही.

### भारताच्या एकतेचे चार आधारस्तंभ : पंतप्रधान

**सांस्कृतिक एकता, भाषिक एकता, भेदभावमुक्त विकास आणि सर्वसमावेशक कनेक्टिव्हिटी. त्यांनी बारा ज्योतिर्लिंग, चार धाम, सात पवित्र नगरे, आणि शक्तिपीठांची परंपरा ही भारताच्या सांस्कृतिक एकतेची प्रतीके असल्याचे सांगितले. भाषांच्या वैविध्यातून भारताची शक्ती वाढत असल्याचे नमूद करत त्यांनी प्रत्येक भारतीय भाषेचा सन्मान करण्याचे आवाहन केले.**

## थोडक्यात...

### मेलबर्नमध्ये भारताचा पराभव: ऑस्ट्रेलियाची १-0 ने आघाडी!



मेलबर्न : भारत आणि ऑस्ट्रेलिया टी-२० मालिकेतील दुसरा सामना मेलबर्नमध्ये खेळवण्यात आला. या सामन्यात ऑस्ट्रेलियाने दमदार खेळ करत टीम इंडियावर सहज विजय मिळवला आणि मालिकेत १-० अशी आघाडी घेतली. पहिला सामना पावसामुळे रद्द झाल्याने दोन्ही संघांसाठी हा सामना महत्वाचा होता, पण भारतीय संघ ही संधी साधू शकला नाही. आता भारताला मालिका जिंकण्यासाठी उरलेले तीनही सामने जिंकावे लागणार आहेत.

या आधी टीम इंडियाने मेलबर्नच्या ऐतिहासिक चउऋ मैदानावर ६ टी-२० सामने खेळले होते, ज्यापैकी ४ सामने भारताने जिंकले आणि फक्त एकदाच पराभव पत्करला होता तोही २००८ मध्ये. त्यानंतर १७ वर्षे भारत या मैदानावर विजयी राहिला होता, पण अखेर हा रेकॉर्ड तुटला.

### न्यायमूर्ती सूर्यकांत भारताचे नवे सरन्यायाधीश

**२४ नोव्हेंबर रोजी पदभार स्वीकारणार**



नवी दिल्ली : राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी न्यायमूर्ती सूर्यकांत यांची भारताचे ५३वे सरन्यायाधीश म्हणून नियुक्ती केली आहे. राष्ट्रपतींनी नियुक्ती पत्रावर स्वाक्षरी केली असून, या नियुक्तीची अधिसूचना केंद्र सरकारच्या न्याय विभागाने जाहीर केली आहे. ते २४ नोव्हेंबर २०२५ रोजी सरन्यायाधीश म्हणून कार्यभार स्वीकारतील. न्यायमूर्ती सूर्यकांत यांचा जन्म १० फेब्रुवारी १९६२ रोजी हरियाणातील हिसार जिल्ह्यातील पेटवार या गावात झाला. त्यांनी १९८४ मध्ये रोहतक येथील महर्षी दयानंद विद्यापीठातून कायद्याची पदवी मिळवली आणि त्याच वर्षी हिसार जिल्हा न्यायालयात वकिली सुरू केली. पुढील वर्षी त्यांनी चंदीगड येथील पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयात वकिली केली आणि संविधानिक, सेवा आणि दिवाणी विषयांमध्ये विशेष प्रावीण्य मिळवले.

### आजच्या तुलनेत आठ महिन्यांनी होणारी कर्जमाफी अधिक फायद्याची - बच्चू कडू



नागपूर, ३१ ऑक्टोबर : राज्यातील शेतकऱ्यांकडून तात्काळ कर्जमाफीची मागणी होत असताना, आजच्या तुलनेत ८ महिन्यांनी जाहीर होणारी कर्जमाफी शेतकऱ्यांसाठी अधिक फायद्याची ठरेल, असा दावा बच्चू कडू यांनी केला आहे. राज्य सरकारशी गुरुवारी रात्री झालेल्या बैठकीनंतर आज, शुक्रवारी नागपूरला पोहचल्यावर कडू बोलत होते.

यासंदर्भात कडू म्हणाले की, जर सरकारने कालपासूनच कर्जमाफीची घोषणा केली असती, तर ती ३१ मार्च २०२५ पर्यंतच्या थकीत कर्जावर लागू झाली असती. मात्र आता ही कर्जमाफी ३१ मार्च २०२६ पर्यंतच्या थकबाकीवर लागू होईल. त्यामुळे यंदाच्या अतिवृष्टीमुळे अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना मोठा फायदा होईल असे कडू यांनी सांगितले. सरकारच्या प्रतिनिधींसोबत काल सुमारे अडीच तास चाललेल्या बैठकीत तीव्र चर्चा झाल्याचे कडू यांनी नमूद केले. सरकार आर्थिक कारणे पुढे करून तारीख देण्यास तयार नव्हते. मात्र आम्ही तारीख घेऊनच आल्याचे कडू यांनी सांगितले.

### नांदेड - पुणे वंदे भारत लवकर सुरू होणार- खा.डॉ. अजित गोपछडे

नांदेड, ३१ ऑक्टोबर : नांदेड - पुणे रेल्वे प्रवास आता अति जलद गतीने होणार असून या मार्गावर लवकरच वंदे भारत एक्सप्रेस धावणार आहे. खा. डॉ. अजित गोपछडे यांच्या प्रयत्नांना यश येत असून केंद्रीय रेल्वे मंत्रालयाने नांदेड - पुणे वंदे भारत एक्सप्रेसला ग्रीन सिग्नल दिला आहे. मराठवाड्यातील रेल्वे प्रवाशांना अधिकाधिक रेल्वे सुविधा मिळावी , मराठवाड्याचा जलद गतीने विकास व्हावा आणि जलद रेल्वे सेवा उपलब्ध व्हावी यासाठी खा. डॉ. अजित गोपछडे यांचे सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. नांदेड - मुंबई वंदे भारत एक्सप्रेस सुरू करून घेतल्यानंतर खा. डॉ .अजित गोपछडे आता नांदेड - पुणे आणि नांदेड - हैदराबाद वंदे भारत एक्सप्रेस साठी प्रयत्न करत आहेत. या अनुषंगाने केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेऊन त्यांनी पत्र दिले होते.

# शेतकरी कर्जमाफीचा निर्णय जून २०२६ पूर्वी घेणार - मुख्यमंत्री



मुंबई, ३१ ऑक्टोबर : राज्यातील शेतकऱ्यांना ३० जून २०२६ पूर्वी कर्जमाफीचा निर्णय घेणार, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. कर्जमाफीच्या अनुषंगाने एक समिती आम्ही गठीत केली आहे. एप्रिलपर्यंत या समितीने शिफारस करायची आहेत. त्या आधारावर पुढची प्रक्रिया करून तीन महिन्यात म्हणजे ३० जून २०२६ पर्यंत कर्जमाफी करण्यात येईल असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केले.

सह्याद्री अतिथीगृह येथे शेतकरी कर्जमाफी संदर्भात आंदोलक प्रतिनिधी शिष्टमंडळ सोबत मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. या बैठकीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, मंत्री दत्तामामा भरणे, मंत्री गिरीश महाजन, मंत्री जयकुमार रावल, राज्यमंत्री ड आशिष जयस्वाल, राज्यमंत्री डॉ पंकज भोयर, मुख्य सचिव राजेश कुमार, शेतकरी आंदोलन शिष्टमंडळातील प्रतिनिधी माजी राज्यमंत्री ओमप्रकाश बच्चू कडू, खासदार राजू शेट्टी, माजी मंत्री महादेव जानकर, वामनराव चटप, रविकांत तुपकर, राजन क्षीरसागर, गिरीश दाभाडकर, अजित नवले यांच्यासह सर्व प्रमुख विविध विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव आणि आयुक्त, वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री म्हणाले, नैसर्गिक आपत्तीमुळे संकटात असलेल्या शेतकऱ्यांच्या खात्यात आता पैसे देणे आवश्यक आहे, कारण तसे केले नाही तर रब्बीची पेरणी त्यांना करता येणार नाही. म्हणून आता ३२,००० कोटींच्या पॅकेज वितरण याला प्राधान्य आहे. पूर्व अतिवृष्टीमुळे अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना पॅकेजच्या माध्यमातून ३२ हजार कोटी रूपये मदत दिली जात आहे. आत्तापर्यंत ८००० कोटी रुपये खात्यात दिले गेले आहेत.

# मुंबई पोलिसांनी मोर्चाला परवानगी नाकारली; विरोधकांची पंचाईत !



मुंबई : मुंबईत निवडणूक आयोगाविरोधात विरोधी पक्ष एकत्र येत आहेत. महाविकास आघाडी आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांनी उद्या निवडणूक आयोगाविरोधात सत्याचा मोर्चा काढण्याची घोषणा केली आहे. या मोर्चात अनेक विरोधी नेते सहभागी होणार आहेत.

या मोर्चात राज ठाकरे, उद्धव ठाकरे, राष्ट्रवादी प्रमुख शरद पवार, तसेच काँग्रेस आणि डाव्या पक्षांचे नेते सहभागी होणार आहेत. मोर्चाची सुरुवात दुपारी १ वाजता फॅशन स्ट्रीटवरून होणार होती. मेट्रो सिनेमा मार्गे मुंबई महापालिकेच्या मुख्य प्रवेशद्वारावर हा मोर्चा जाणार होता. मात्र, या मोर्चाला मुंबई पोलिसांकडून अद्याप परवानगी मिळालेली नाही. मिळालेल्या माहितीनुसार, आझाद मैदानाच्या बाहेर मोर्चा काढण्यास नियमांनुसार परवानगी देता येत नाही. आझाद मैदानाच्या आत आंदोलन करता येईल, परंतु बाहेरून मोर्चा निघाल्यास तो विनापरवाना ठरेल. आणि विनापरवाना मोर्चा काढल्यास आंदोलनकर्त्यांवरती कारवाई होण्याची शक्यता आहे.

# तेलंगणा : मो. अझरुद्दीन यांनी घेतली मंत्रीपदाची शपथ

हैदराबाद, ३१ ऑक्टोबर : काँग्रेस नेते आणि माजी क्रिकेटपटू मोहम्मद अझरुद्दीन यांनी तेलंगणा सरकारमध्ये मंत्रीपदाची शपथ घेतली. राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी त्यांना शपथ दिली. अझरुद्दीन यांची ही नियुक्ती जुबली हिल्स पोटनिवडणुकीसाठी महत्त्वाची मानली जात आहे, कारण त्या मतदारसंघात मुस्लिम मतदार निर्णायक भूमिका बजावू शकतात.

काँग्रेसचे वरिष्ठ नेते आणि भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार मोहम्मद अझरुद्दीन यांना तेलंगणा सरकारने आपल्या मंत्रिमंडळात स्थान दिले आहे. त्यांनी मुख्यमंत्री ए. रेवंत रेड्डी यांच्या नेतृत्वाखालील सरकारमध्ये शुक्रवारी मंत्रीपदाची शपथ घेतली. तेलंगणा राजभवनात आयोजित समारंभात राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी मुख्यमंत्री आणि अनेक महत्त्वाच्या नेत्यांच्या उपस्थितीत माजी भारतीय क्रिकेटपटू अझरुद्दीन यांना शपथ दिली. अझरुद्दीन यांच्या समावेशानंतर मंत्रिमंडळातील एकूण सदस्यसंख्या १६ झाली असून, आणखी २ सदस्यांचा समावेश होऊ शकतो. राज्य विधानसभेच्या एकूण सदस्यसंख्येनुसार, येथे कमाल १८ मंत्री असू शकतात.



मोहम्मद अझरुद्दीन यांची मंत्रीपदावर नियुक्ती हा एक महत्त्वपूर्ण राजकीय निर्णय मानला जात आहे, कारण काँग्रेस पक्ष जुबली हिल्स पोटनिवडणुकीत पूर्ण ताकदीने उतरला आहे. या मतदारसंघात एक लाखांहून अधिक मुस्लिम मतदार आहेत, जे निकालावर निर्णायक प्रभाव टाकू शकतात. माहितीनुसार, याच वर्षी जून महिन्यात बीआरएसचे आमदार मगंती गोपीनाथ यांच्या हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाल्यामुळे ही जागा रिक्त झाली होती आणि त्या जागेसाठीच आता पोटनिवडणूक होणार आहे. गेल्या ऑगस्ट महिन्यात तेलंगणा सरकारने अझरुद्दीन यांना राज्यपाल कोट्यातून विधान परिषद सदस्य (एमएलसी) म्हणून नियुक्त केले होते, मात्र राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी अद्याप या नियुक्तीला मंजुरी दिलेली नाही. अझरुद्दीन यांनी २०२३ च्या निवडणुकीत जुबली हिल्स विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवली होती, परंतु त्यांना पराभवाचा सामना करावा लागला होता.

# भारत आणि अमेरिका यांच्यात १० वर्षांचा संरक्षण करार

नवी दिल्ली, ३१ ऑक्टोबर : भारत आणि अमेरिकेदरम्यान १० वर्षांच्या संरक्षण करारावर स्वाक्षऱ्या झाल्या आहेत. दोन्ही देशांमधील संबंधांसाठी हा करार महत्त्वपूर्ण टप्पा मानला जात आहे. अमेरिकेचे संरक्षण मंत्री पीट हेगसेथ यांनी करारानंतर सांगितले की, भारत आणि अमेरिकेतील संरक्षण संबंध यापूर्वी इतके मजबूत कधीच नव्हते. त्यांनी सोशल मीडियावर शेअर केलेल्या एका पोस्टमध्ये म्हटले की त्यांची भारताचे संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्याशी भेट झाली आणि या भेटीत संरक्षण सहकार्याचा दीर्घकालीन करार करण्यात आला. हेगसेथ यांच्या मते, भारत आणि अमेरिकेमधील हा करार प्रादेशिक स्थैर्य अधिक मजबूत करेल.



या कराराबद्दल भारतीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी म्हटले की, माझ्या मते, आज या संरक्षण आराखडा करारावर स्वाक्षऱ्या झाल्यामुळे भारत-अमेरिका संबंधांमध्ये नव्या अध्यायाची सुरुवात होईल.

यापूर्वी, राजनाथ सिंह यांची ऑगस्ट महिन्यात वॉशिंग्टनमध्ये हेगसेथ यांच्याशी भेटण्याची योजना होती, परंतु अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतीय आयातीवरील शुल्क दुप्पट करून ५०% केले आणि त्यामुळे दोन्ही देशांतील संबंध गेल्या अनेक दशकांतील सर्वात खालच्या पातळीवर गेले. यामुळे राजनाथ सिंह यांचा अमेरिकेचा दौरा रद्द करण्यात आला होता.

आता आसियान देशांच्या संरक्षण मंत्र्यांच्या परिषदेत सहभागी होण्यासाठी राजनाथ सिंह क्वालालंपूर येथे गेले, जिथे त्यांची आणि अमेरिकेचे संरक्षण मंत्री पीट हेगसेथ यांची भेट झाली व या करारावर स्वाक्षऱ्या झाल्या. याआधी भारतीय परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनीही क्वालालंपूरमध्ये अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबिओ यांची भेट घेतली होती. त्या भेटीतदेखील दोन्ही देशांमधील संबंध अधिक दृढ करण्यावर चर्चा झाली होती. मागील आठवड्यात अमेरिकेने रशियाच्या दोन प्रमुख कच्चे तेल निर्यात करणाऱ्या कंपन्यांवर निर्बंध जाहीर केले होते. त्यानंतर भारतीय रिफायनऱ्यांनी रशियन तेलाच्या आयातीत कपात केली आहे, आणि त्यामुळे आता दोन्ही देश संबंधांच्या पुनर्बांधणीच्या शक्यता पाहत आहेत.

# पुढचे ४८ तास धोक्याचे, राज्यासाठी आयएमडीचा इशारा!

मुंबई : भारतीय हवामान विभागाकडून देशासह महाराष्ट्रात पुन्हा एकदा पावसाचा इशारा देण्यात आला आहे. अनेक राज्यांमध्ये अतिमुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आल्याने नागरिकांची चिंता पुन्हा वाढली आहे. 'मोथा' चक्रीवादळाचा प्रभाव हळूहळू कमी होत असला तरी, त्यामुळे आता पुन्हा एकदा कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला आहे. या कमी दाबामुळेच अनेक राज्यांमध्ये अतिमुसळधार पाऊस तर काही राज्यांमध्ये हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा इशारा देण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर, हवामान विभागाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आणि आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे. भारतीय हवामान विभागाने देशातील अनेक राज्यांसाठी पुढील दोन दिवसांसाठी पावसाचा अंदाज आणि सतर्कतेचा इशारा जारी केला आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, आज पूर्वोत्तर राज्यांमध्ये अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

# जर भारताने हा विश्वचषक जिंकला, तर मी जेमिमा रॉड्रिग्ज सोबत ड्युएट गाणे गाईन- गावस्कर

नवी मुंबई, ३१ ऑक्टोबर : महिला विश्वचषक २०२५ मध्ये टीम इंडिया ने अप्रतिम खेळ करत फायनलमध्ये आपले स्थान निश्चित केले आहे. उपांत्य सामन्यात भारताने सात वेळच्या विजेत्या ऑस्ट्रेलियाला पराभूत करून इतिहास रचला. या दरम्यान माजी भारतीय कर्णधार सुनील गावस्कर यांनी एक मजेशीर वादा केला आहे. त्यांनी म्हटले आहे की, जर भारताने हा विश्वचषक जिंकला, तर मी जेमिमा रॉड्रिग्ज सोबत ड्युएट गाणे गाईन.

गावस्कर यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले, जर भारत विश्वचषक जिंकला आणि जेमिमा तयार असेल, तर आम्ही दोघे मिळून एक गाणे गाऊ. ती गिटार वाजवेल आणि मी गाईन.





त्यांनी आठवण करून दिली की बीसीसीआय अवॉर्ड २०२४ मध्ये त्यांनी आणि जेमिमाने आधीही 'क्या हुआ तेरा वादा' हे गाणे एकत्र सादर केले होते. त्या वेळी जेमिमा गिटार वाजवत होती आणि गावस्कर गात होते. गावस्कर हसत म्हणाले, जर ती पुन्हा एका म्हाताऱ्या माणसासोबत गाणे गाण्यास तयार असेल, तर मी पुन्हा पूर्णपणे तयार आहे! पुढे बोलताना गावस्कर यांनी जेमिमाच्या फिल्डिंगचे विशेष कौतुक केले. ते म्हणाले, लोक तिच्या फलंदाजीबद्दल बोलत आहेत, पण तिने क्षेत्ररक्षणातही अप्रतिम कामगिरी केली आहे. तिच्या दोन अप्रतिम रनआउट्समुळे ऑस्ट्रेलियाचा स्कोअर ३५० च्या वर जाऊ शकला नाही. ती एक अनुभवी खेळाडू आहे - तिने परदेशातील लीग स्पर्धांमध्येही खेळले आहे. खेळ समजून घेण्याची आणि परिस्थिती सांभाळण्याची तिची क्षमता उत्कृष्ट आहे. आता भारताचा फायनल सामना रविवारी दक्षिण आफ्रिकेविरुद्ध होणार आहे. गावस्कर यांच्या मते, घरच्या मैदानाचा फायदा आणि संघाचा सध्याचा फॉर्म पाहता टीम इंडिया ट्रॉफीची सर्वात मोठी दावेदार आहे. त्यांनी म्हटले , संघाचा आत्मविश्वास सध्या शिखरावर आहे. जर ते या लयीत खेळत राहिले, तर विश्वचषक ट्रॉफी निश्चितच भारताचीच असेल.भारताच्या या ऐतिहासिक विजयात जेमिमा रॉड्रिग्जने झळकावलेली खेळी निर्णायक ठरली.

# राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर प्रतिबंध लावावा : मल्लिकार्जुन खर्गे



नवी दिल्ली, ३१ ऑक्टोबर : देशातील बहुतांश कायदा व सुव्यवस्थेसंबंधी समस्या भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघामुळे निर्माण होतात. त्यामुळे संघावर प्रतिबंध घालणे आवश्यक असल्याचे मत काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी व्यक्त केले. सरदार पटेलांच्या जयंती कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदींनी केलेल्या टीकेला उत्तर देताना खर्गे बोलत होते.

संघावरील प्रतिबंधाबाबत खर्गे म्हणाले की, संघावर प्रतिबंध लागावा हे आपले वैयक्तीक मत असून देशाच्या हितासाठी आवश्यक आहे. कारण देशातील बहुतेक सामाजिक समस्या, कायदे-सुव्यवस्था-संबंधी अडचणी संघ आणि भाजपशी संबंधित आहेत. देश 'लोह पुरुष' सरदार पटेल यांची जयंती आणि माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांची पुण्यतिथि साजरी करत आहे. या दोन्ही महान नेत्यांनी देशाची एकता, अखंडता आणि प्रगती राखण्यात अतुलनीय योगदान दिले आहे; एक 'आयरन मॅन' तर दुसरी 'आयरन लेडी' होते. तसेच खर्गे यांनी सरदार पटेलांनी श्यामा प्रसाद मुखर्जी यांना लिहिलेल्या एका पत्राचा उल्लेखही केला. त्या पत्रात तत्कालीन गृहमंत्री पटेल यांनी स्पष्ट केले होते की, संघाने निर्माण केलेल्या वातावरणामुळे महात्मा गांधींची हत्या घडली.

भाजपा नेहमी हे दाखवण्याचा प्रयत्न करते की नेहरू आणि पटेल यांच्यात मतभेद होते; परंतु वास्तव हे आहे की दोघांनाही एकमेकांचा प्रामाणिक सन्मान होता. नेहरू यांनी पटेल यांच्या देशाची एकता राखण्याच्या भूमिकेची प्रशंसा केली, तर पटेल यांनी नेहरू यांना आदर्श नेता मानल्याचे खर्गे यांनी सांगितले.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## 'फूल ऑन हॅलोवीन' फक्त अँन्ड पिक्चर्स वाहिनीवर!

मुंबई : सज्ज व्हा एक दिवसाच्या धमाल, हॉरर आणि भयावह अॅडव्हेंचरसाठी कारण यावेळी हॅलोवीन होणार आहे 'ऑन नाही तर फूल ऑन', फक्त अॅन्ड पिक्चर्सवर! ३१ ऑक्टोबरला दिवसभर प्रसारित होणार आहे फूल ऑन हॅलोवीन. तरुण प्रेक्षकांशी असलेल्या सखोल नात्यासाठी ओळखली जाणारी अॅन्ड पिक्चर्स वाहिनी घेऊन येत आहे - मौज, ताजेपणा आणि थराराने भरलेला अनुभव, जो त्यांना अगदी आपलासा वाटतो! तयार व्हा जंप स्केअर्स ऐवजी फन स्केअर्स साठी, कारण अॅन्ड पिक्चर्स तुम्हांला आमंत्रित करत आहे एका अविस्मरणीय हॅलोवीन मूव्ही मॅरेथॉनसाठी - ज्यात असेल शहारा उभे करणारे क्षण, खळखळून हसवणारे प्रसंग आणि भुतांची धमाल सरप्राइजेस!

## मोरारी बापूंच्या रामकथेनं पंचवटी उजळली

नाशिक: पूज्य मोरारी बापूंची ऐतिहासिक रामयात्रा आज पवित्र नाशिक नगरीत पोहोचली. पंचवटी येथे हजारो भाविक एकत्र येऊन रामकथा ऐकण्यासाठी जमले. चित्रकूट आणि साटनामधील अध्यात्मिक प्रवासानंतर नाशिक ही ११ दिवसीय यात्रेतील आणखी एक महत्त्वपूर्ण पायरी ठरली, जी मर्यादा पुरुषोत्तम प्रभू श्रीरामांच्या पावलांवर चालणारी आहे. पंचवटी हे प्रभू श्रीरामांच्या वनवासातील एक अतिशय पवित्र स्थान आहे. येथे श्रीराम, माता सीता आणि लक्ष्मण यांनी धर्मपालन करत वास्तव केले. रामायणातील अनेक निर्णायक प्रसंग याच ठिकाणी घडले, ज्यामुळे पंचवटी हे सत्य, धैर्य आणि करुणा या प्रभू रामांच्या आदर्शांशी जोडलेले एक पूज्यस्थळ मानले जाते.

## एसएमईकरिता दैनंदिन प्रवास सुलभ

छत्रपती संभाजीनगर : टाइड या भारतातील एसएमईकरिता आघाडीच्या आर्थिक व्यवस्थापन प्लॅटफॉर्मने त्यांच्या रूपे-समर्थित एक्स्पेन्स कार्डमध्ये नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड (एनसीएमसी) पाठिंब्याची भर केली आहे, ज्यामुळे लहान व्यवसाय आणि फ्रीलान्सर्सना एकाच कार्डसह टॅप करत प्रवास व व्यवहार करता येईल. टाइड सदस्य आता भारतातील प्रमुख शहरांमध्ये मेट्रो, बस, टोल आणि पार्किंगसाठी पेमेंट करू शकतात, तसेच टाइड अॅपमध्ये विनासायासपणे इन्वॉईसेस, रिइम्बर्समेंट्स (परतफेड) आणि खर्चांचे व्यवस्थापन करू शकतात. भारत सरकारचे पाठबळ असलेल्या एनसीएमसीचे एकीकरण वापरकर्त्यांना एकाच कार्डमध्ये सार्वजनिक परिवहन आणि व्यवसाय-संबंधित प्रवासासाठी पेमेंट करण्याची सुविधा देते. यामुळे विविध ट्रॅव्हल कार्ड्स सोबत ठेवण्याची किंवा पेमेंट अॅप्सदरम्यान स्विच करण्याची गरज भासत नाही. रिअल-टाइममध्ये टाइड अॅपच्या माध्यमातून टॉप-अप्स उपलब्ध असण्यासह सदस्य त्वरित त्यांचे कार्ड्स रिचार्ज करू शकतात, शिल्लक तपासू शकतात आणि ट्रान्झिट गेट्सवर जलदपणे, रांगेशिवाय सुलभ सुविधांचा आनंद घेऊ शकतात.

१०० कुशलतरुणांना जागतिक प्रशिक्षणासाठी जपान ला पाठवले

छत्रपती संभाजीनगर :: टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) यांनी आज जाहीर केले की त्यांच्या१०० सदस्यांना टोयोटा मोटर कॉर्पोरेशन येथे आयोजित ग्लोबल स्किल-अप ट्रेनिंग (जीएसटी)कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी जपानला पाठवले जाईल. ही पुढाकार टीकेएमच्या जागतिक दर्जाचीस्पर्धात्मक कौशल्ये असलेली प्रतिभा विकसित करण्याच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे आणिभारत सरकारच्या स्किल इंडिया मिशन तसेच भारत आणि जपान सरकारांमधील *टेक्निकल इंटर्नट्रेनिंग प्रोग्रॅम (टीआयटीपी) या आंतरराष्ट्रीय कौशल्य विकास आणि प्रतिभा देवाणघेवाणउपक्रमाशी सुसंगत आहे.

## सायकलिंग क्षेत्रात भारत घेणार नवी भरारी

नाशिक : भारताच्या पहिल्या व्यावसायिक प्रो स्टेज एलीट पुरुष सायकलिंग स्पर्धा या आंतरराष्ट्रीय सायकलिंग इव्हेंटचे अधिकृत चिन्ह आणि शुभंकराचे अनावरण उत्साही नागरिकांच्या उपस्थितीत करण्यात आले. या सोबतच पुणे ग्रँड टूर २०२६ या भारतातील पहिल्या जागतिक पातळीच्या सायकलिंग स्पर्धेची घोषणा करण्यात आली.पुणे ग्रँड टूर ही स्पर्धा २०२८ मध्ये होणाऱ्या उन्हाळी ऑलिंपिकसाठी पात्रता फेरी म्हणून स्विकारली जाणार आहे. या अंतर्गत आंतरराष्ट्रीय खेळाडूंना १९ ते २३ जानेवारी २०१६ दरम्यान आयोजित पाच दिवसीय, अनेक टप्प्यांची शर्यत पूर्ण करून महत्त्वाचे रेस-पॉइंट्स मिळवण्याची संधी मिळणार आहे. या प्रसंगी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री व पालकमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत, सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडिया (उऋख), क्रीडा व युवक कल्याण विभाग आणि पुणे जिल्हा प्रशासन यांनी एकत्रितपणे महाराष्ट्रात आणि भारतात सायकलिंग क्रांती घडवण्याची वचनबद्धता व्यक्त केली.

## सचिदानंद उपाध्याय यां ना टाइम मॅगझिनमध्ये दुसऱ्यांदा स्थान

मुंबई: लॉर्ड्स मार्क इंडस्ट्रीज लिमिटेड (एलएमआयएल) चे मॅनेजिंग डायरेक्टर सचिदानंद उपाध्याय यांनी एक उल्लेखनीय कामगिरी साध्य केली आहे - टाइम मॅगझिनमध्ये सलग दुसऱ्यांदा स्थान मिळवून. हा दुर्मीळ सन्मान त्यांना त्या निवडक जागतिक व्यावसायिक नेत्यांच्या गटात स्थान देतो, ज्यात भारतातील काही प्रतिष्ठित उद्योग नेतेही सामील आहेत, ज्यांना उद्योग आणि समाजातील योगदानासाठी दोनदा फीचर केले गेले आहे.

# 'जडऱ्उ आफ्टर ऑपरेशन लंडन कॅफे'चा पोस्टर लॉंच!




छत्रपती संभाजीनगर - गेल्या काही काळापासून 'आफ्टर ऑपरेशन लंडन कॅफे' या चित्रपटाची चर्चा सुरु आहे. नुकतंच या चित्रपटाचं पोस्टर समोर आलं असून येत्या २८ नोव्हेंबरला प्रदर्शित होणार आहे. कवीश शेट्टी, मेघा शेट्टी, शिवानी सुर्वे, विराट मडके अभिनीत 'ऑपरेशन लंडन कॅफे' हा चित्रपट आहे. हा सिनेमा संपूर्ण भारतात मराठी, कन्नड, आणि हिंदी भाषेतही प्रदर्शित होणार आहे. चित्रपटाचं पोस्टर पाहून हा सिनेमा एक्शन पॅक्ड असल्याचं दिसतय. आणि हेच पोस्टर चित्रपटाची उंची, भव्यता दर्शवत आहे. हा चित्रपट कन्नड सिनेसृष्टीतील दिग्दर्शक सदागारा राघवेंद्र यांनी मराठी आणि कन्नड भाषेत दिग्दर्शित केला आहे. कवीश शेट्टी, मेघा शेट्टी, शिवानी सुर्वे, विराट मडके यांच्यासह चित्रपटात प्रसाद खांडेकर, अश्विनी चवरे, शलाका पवार, रुक्मिणी सुतार ही मराठी कलाकारांची फौज पाहायला मिळत आहे. एक्शन पॅक्ड अशा या चित्रपटाला रोमँटिक झालर आहे ती कशी ते मात्र तुम्हाला सिनेमागृहात पाहायला मिळणार आहे. या चित्रपटाचा एक अनोखा पैलू म्हणजे कन्नड कलाकारांनी या चित्रपटासाठी मराठी भाषा शिकली आणि मराठी कलाकारांनी चित्रपटातील भूमिकांसाठी कन्नड भाषा शिकली. चित्रपटाच्या समोर आलेल्या पोस्टरने अर्थात सिनेमाप्रती उत्सुकता वाढविली आहे. पोस्टरवरील कलाकार तर पॉवर पॅक्ड अभिनय देण्यासाठी सज्ज असल्याचं दिसत आहे. कवीश शेट्टी आणि मेघा शेट्टी यांनी त्यांच्या अभिनयाने साऊथ सिनेसृष्टी गाजवली आहे तर शिवानी सुर्वेच्या अभिनयाचा आणि ग्लॅमरसचा केवळ महाराष्ट्रातच नाहीतर महाराष्ट्राबाहेरही मोठा चाहतावर्ग आहे. तर विराट मडकेच्या चित्रपटांच्या यादीत या चित्रपटाची भर पडणार आहे. अश्विनी चवरे हिच्याही अभिनयाची जादू या चित्रपटातून पाहायला मिळणार आहे.

या चित्रपटाची निर्मिती दिपक पांडुरंग राणे, विजय कुमार शेट्टी हवाराल, रमेश कोठारी आणि विजया प्रकाश यांनी 'दिपक राणे फिल्मस' बॅनर आणि 'इंडियन फिल्म फॅक्टरी' अंतर्गत केली आहे. या चित्रपटाचे छायाचित्रण आर.डी. नागार्जुन यांनी केले आहे. येत्या २८ नोव्हेंबरला हा सिनेमा जगभरात मराठी, हिंदी आणि कन्नड भाषेत प्रदर्शित होणार आहे.

# गाई गोठे रद्द पंचायत समिती दालनासमोर शेतकरी आक्रमक



सिल्लोड प्रतिनिधी.

सिल्लोड तालुक्यामध्ये मोगरा रोयोअंतर्गत मजूर झालेल्या वीर गोठे रद्द करण्यात आलेली आहे ते रद्द करण्यात येऊ नये या मागणीसाठी सिल्लोड पंचायत समितीचे गटविकास अधिकारी रत्नाकर पगार यांना जॉब विचारण्यात आला व या ठिकाणी शेतकऱ्यांच्या विहिरी मंजूर झालेल्या व प्रशासकीय मान्यता मिळालेल्या विहिरी रद्द केल्यामुळे शेतकऱ्यावर खूप मोठे संकट या ठिकाणी आलेला आहे आणि काही शेतकऱ्यांनी विहिरी मंजूर झाले असता त्याचं खोदकाम सुद्धा करून ठेवलेला आहे आणि त्यामुळे शेतकऱ्याला आत्महत्या शिवाय कुठलाही पर्याय या ठिकाणी राहिलेला नाही तरी या ठिकाणी अर्ध नग्न आंदोलनाच्या माध्यमातून गटविकास अधिकारी रत्नाकर पगार यांना ज्यावेळी रद्द झाल्या या विहिरी आपण शासन दरबारी या आंदोलनाची आंदोलनाच्या माध्यमातून जी मागणी आहे ही मागणी पोहोचवून विहिरी रद्द करण्यात येऊ नये अशा प्रकारचे या ठिकाणी आंदोलनाच्या माध्यमातून मागणी करण्यात आली यावेळेस उपस्थित शेतकरी गंगाधर भुंगे सागर गवते समाधान पंडित अशोक मोरे अक्षय पाटील सांडू राकडे शिवाजी बनकर अंकुश राकडे काकडे कृष्णा बडा रावसाहेब बडा दादाराव जाधव भानुदास पंडित पुंजाराम आप्पा गरुड कैलास आमटे नामदेव कदम दिलीप कुंटे संजय नाकीरे गंगाधर गोगो.

## संत ज्ञानेश्वर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे जिल्हास्तरीय यश



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.३१ ऑक्टोबर

संत ज्ञानेश्वर महाविद्यालय सोयगाव येथील विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल केले आहे.

इयत्ता १२ वी विज्ञान शाखेतील विद्यार्थी सार्थक कैलास माकोडे याने १०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला असून त्याची बीड येथे होणाऱ्या विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

तसेच इयत्ता ११ वी एम.सी.व्ही.सी.शाखेतील विद्यार्थी वैभव शिंदे याने ३००० मीटर धावण्याच्या स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळवत विभागीय स्तरासाठी पात्रता मिळवली आहे.या उल्लेखनीय यशाबद्दल अजिंठा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष रंगनाथ काळे,सचिव प्रकाश काळे यांनी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिरीष पवार,उपप्राचार्य डॉ.रावसाहेब बारोटे,कनिष्ठ विभाग प्रमुख डॉ. उल्हास पाटील यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या विद्यार्थ्यांना क्रीडा प्रशिक्षण व मार्गदर्शन डॉ. निलेश गाडेकर,प्रा.शेख तौफिक यांनी दिले आहे.

महाविद्यालयातील शिक्षकवृंद व शिक्षकेत्तर कर्मचारीवर्ग डॉ. सुभाष पाटील,प्रा.रवींद्र जाधव,प्रा.दिपक लिंबे,प्रा.शंकर कानडे,प्रा.अन्वर सय्यद,प्रा. विनोद चव्हाण,प्रा.स्वाती देशमुख, प्रा.भारती पाटील,प्रा.अनिल मानकर,बुटोले सर,योगेश काळे,अश्विनी काळे,संदीप निकम,दिपक कल्याणकर दींनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.


## अरिहंतनगर जैन मंदिरात आचार्य प्रणामसागरजी महाराज यांच्या उपस्थितीत सिध्दचक्र महामंडळ विधानास प्रतिसाद



छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी - श्री.१००८ युग प्रवर्तक आदीनाथ दिगंबर जैन मंदिर अरिहंतनगर येथे आचार्य डॉ.प्रणामसागरजी महाराज व अनुष्ठाचार्य कपिलभैया पाटणी यांच्या निर्देशामध्ये चार दिवसीय सिध्दचव्रै महामंडळ विधानाचे आयोजन करण्यात आले असुन दररोज सकाळी ६ वाजता अभिषेक नित्य नियम पुजा आचार्यश्रींचे विशेष प्रवचन त्यानंतर सिध्दचव्रै विधान पुजा आहारचर्या तदनंतर संध्याकाळी आनंदयात्रा भगवंताची आरती व अनुष्ठाचार्य कपिलभैया पाटणी यांच्या वतीने स्वाध्याय प्रवचन होत आहे. यावेळी आचार्यश्रींनी सिध्दचव्रै महामंडळ विधानाची महती उपस्थितांना करैन दिली व दररोज श्रीफळ अर्पण करैन भगवंताची पुजा आरती करण्यात येत आहे. यामध्ये सौधर्म इंद्र इंद्राणी म्हणुन पुष्पाबाई रतनलालजी लिना संदिप, जयश्री सचिव, लोहाडे परिवार हे लाभले आहे. तर कुबेर इंद्र अतुल यावलकर, मैना सुंदरी राजा, श्रीपाल म्हणुन सोनाली आनंद पाटणी विजय रमेश चंद्रकुमार महावीर पाटणी परिवार, भरत चव्रैवर्ती इंद्र उषा बबनलाल चुडीवाल, महायज्ञनायक सुनंदाबाई कैलासंचद पाटणी, ध्वजारोहन मंदाबाई शामलाल प्रशांत सचिन पांडे, इंशान इंद्र सौ.सुनिता संतोषकुमार अजमेरा, सानद इंद्र शांताबाई रमेशचंद अजमेरा, धर्मचक्र वर्ती इंद्र अनिता संजय पहाडे, महेंद्र इंद्र सुनिला संजयकुमार काला, कापिष्ठ इंद्र आशाबाई श्रीपाल गंगवाल, शुव्रै इंद्र किशोर महावीर मोतीलाल रावका, महाशुव्रै सुरेश मयुर अजमेरा, लावंत इंद्र सौ.सिमा निर्मल पांडे, अरनेंद्र इंद्र निलमदेवी दिलीप कासलीवाल, प्राणत इद्रं सरिता रमनलाल काला, आच्युत इंद्र राखी राजेंद्र बाकलीवाल, ब्रम्होत्तर इंद्र छायादेवी अनुप ठोले, ब्रम्हइंद्र बबनलाल राहुल कासलीवाल, सतार इंद्र वर्षा सचिन कासलीवाल आदीच्या वतीने भगवंताची पुजा होत आहे. यावेळी प्रमोद ठोले व सुनंदाबाई कैलासचंद पाटणी परिवाराच्या वतीने आचार्यश्रींचे पादपक्षालन करण्यात आले.

संपुर्ण कार्यकमासाठी अध्यक्ष संतोष अजमेरा, पचायत अध्यक्ष महावीर पाटनी पचायत सचिव प्रकाश अजमेरा सचिव रितेश पहाडे, संयोजक महावीर ठोले, संजय पहाडे, आनंद पांडे, आनंद पाटणी, संदिप लोहाडे, अनिल

## महिलांच्या सक्षमीकरणासाठी आय एम ए चा उपक्रम कौतुकास्पद - जिल्हाधिकाऱ्यांचे मत



छत्रपती संभाजीनगर : इंडियन मेडिकल असोसिएशन, छत्रपती संभाजीनगर शाखेतर्फे जागर स्त्री शक्तीचा - स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियान हा विशेष सामाजिक आणि आरोग्यविषयक उपक्रम अत्यंत यशस्वीपणे राबविण्यात आला. या अभियानाचा उद्देश महिलांच्या आरोग्याबाबत जागरूकता वाढवून त्यांना आत्मनिर्भर आणि सशक्त बनवणे हा होता.


छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी श्री. दिलीप स्वामी यांनी या उपक्रमाचे मनःपूर्वक कौतुक केले. त्यांनी सांगितले, आयएमए छत्रपती संभाजीनगर शाखेने नवरात्रीला खरी सामाजिक दिशा दिली आहे. महिलांचे आरोग्य हे समाजाचे आरसे आहे. अशा उपक्रमांनी शहरात सजगतेचा नवा आदर्श निर्माण केला आहे. आयएमए शाखेचे अध्यक्ष डॉ. अनुपम टाकळकर आणि सचिव डॉ. योगेश लक्कस यांनी या उपक्रमाचे उत्कृष्ट नियोजन व नेतृत्व केले. त्यांच्या कार्यतत्परतेमुळे आणि संघभावनेमुळे सर्व कार्यक्रम सुरळीत पार पडले.

मुख्य समन्वयक डॉ. आसावरी टाकळकर यांनी सांगितले, आयएमए छत्रपती संभाजीनगर शाखेने 'जागर स्त्री शक्तीचा' या अभियानाद्वारे महिलांच्या आरोग्याबरोबरच त्यांचा आत्मसन्मानही वाढविला आहे. प्रत्येक कार्यक्रमात महिलांचा प्रतिसाद पाहून आनंद झाला. आपल्या आरोग्याची जबाबदारी स्वतः घ्यावी, हा संदेश आम्ही प्रत्येक कार्यक्रमातून दिला. जिल्हाधिकाऱ्यांनी या उपक्रमाचे कौतुक केले, ही आमच्या सर्व डॉक्टर सदस्यांसाठी प्रेरणादायी गोष्ट आहे.

त्यांनी पुढे म्हटले, महिला ही कुटुंबाची आणि समाजाची खरी शक्ती आहे. तिचे आरोग्य हेच राष्ट्राच्या प्रगतीचे मूळ आहे. आयएमए शाखा आगामी काळातही अशा सामाजिक अभियानांद्वारे सर्वसामान्यांपर्यंत वैद्यकीय जागरूकता पोहोचवेल.

आयएमए छत्रपती संभाजीनगर शाखेचा हा उपक्रम नवरात्रीचा उत्सव आरोग्याचा उत्सव बनवणारा ठरला आहे.

# मेडिकव्हर हॉस्पिटल मध्ये पक्षाघात दिन साजरा




छत्रपती संभाजीनगर - जग जागतिक पक्षाघात (स्ट्रोक) दिन साजरा करत असताना जागरूकता वाढवण्यासाठी आणि लोकांना स्ट्रोकविरुद्ध कारवाई करण्यास सक्षम करण्यासाठी वचनबद्ध आहे. पक्षाघात विनाशकारी मेंदू विकारा पैकी एक आहे. या वर्षीची थीम - खेळाच्या भावनिक शक्तीला स्ट्रोक जागरूकता वाढविण्यासाठी आणि आपल्या सर्वांना कृती करण्यास प्रेरित करण्यासाठी सूत्रबद्ध करणे. रुग्णालयाच्या विश्वासाचे प्रतिबिंबित करते की स्ट्रोकनंतर पुनर्प्राप्ती, खेळाप्रमाणेच, शक्ती, टीमवर्क आणि लवचिकतेबद्दल आहे.

मेडिकव्हर हॉस्पिटल्समधील वरिष्ठ सल्लागार न्यूरोलॉजिस्ट डॉ.श्रीकांत देशमुख म्हणाले की आज स्ट्रोक केवळ वृद्धांनाच नाही तर तरुणांनाही प्रभावित करतो, विशेषतः त्यांच्या ४० आणि ५० च्या दशकातील प्रौढांना, उच्च रक्तदाब, मधुमेह, लठ्ठपणा, ताण आणि बसून राहण्याच्या सवयींमुळे.स्ट्रोक केअरमध्ये, वेळ हा महत्वाचा भाग आहे पहिल्या तासात उपचार केल्याने चांगला फरक पडू शकतो. मेडिकोव्हरमध्ये, आमची २४ तास स्ट्रोक-रेडी टीम जलद निदान, त्वरित उपचार आणि संपूर्ण पुनर्वसन सुनिश्चित करते. जेणेकरून रुग्ण खरोखरच पुन्हा मजबूत होऊ शकतील, असे ते पुढे म्हणाले.

डॉ जयपाल घुनावत व नारायण देशमुख म्हणाले कि महाराष्ट्रात, स्ट्रोकच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ दिसून आली आहे, मराठवाडा प्रदेशातील आकडेवारीवरून असे दिसून येते की जवळजवळ ८०% स्ट्रोक रुग्ण उच्च रक्तदाबाने ग्रस्त आहेत, अर्ध्याहून अधिक लोकांना मधुमेह आहे आणि एक तृतीयांश धूम्रपान करणारे आहेत. राष्ट्रीय पातळीवर, दरवर्षी प्रति १००,००० लोकांमागे १०५ ते १५२ प्रकरणे स्ट्रोकचा भार आहे. हे आकडे जनजागृतीची आणि वेळेवर वैद्यकीय हस्तक्षेपाची तातडीची गरज अधोरेखित करतात.

मेडिकोव्हर हॉस्पिटल्स, छत्रपती संभाजीनगरने आपत्कालीन, न्यूरोलॉजी आणि पुनर्वसन सेवा एकत्रित करणारी एक व्यापक स्ट्रोक केअर सिस्टम स्थापित केली आहे. रुग्णालय २४/७ न्यूरोइमेजिंग, थ्रोम्बोलिसिस आणि न्यूरोइंटरव्हेन्शन सुविधा देते, त्यानंतर फिजिओथेरपी, स्पीच थेरपी आणि रोबोटिक-सहाय्यित पुनर्वसन सुविधा देते. जागतिक स्ट्रोक दिनानिमित्त, मेडिकव्हर समुदायांमध्ये जागरूकता मोहीम, मोफत जोखीम मूल्यांकन शिबिरे आणि शैक्षणिक सत्रे आयोजित करत आहे, जे लोकांना एफ.ए.एस.टी. तत्त्वाचा वापर करून लवकर चेतावणी चिन्हे ओळखण्यास प्रोत्साहित करते.

चेहरा वाकणे, हात कमकुवत होणे, बोलण्यात अडचण येणे आणि आपत्कालीन उपचार घेण्याचे लक्षणे आहेत. कार्यक्रमास आजारातून बरे झालेल्या रुग्णांनी आपले मनोगत व्यक्त केले. व नातेवाईकांनी कृतज्ञता समारोप भाषणात सेंटर हेड डॉ विशाल कुटे म्हणाले कि वैद्यकीय उत्कृष्टता, जलद प्रतिसाद आणि सहानुभूतीपूर्ण उपचार या वाचना द्वारे, मेडिकव्हर हॉस्पिटल्स, छत्रपती संभाजीनगर, नागरिकांना त्यांच्या आरोग्यावर नियंत्रण ठेवण्यास, वेळेवर कृती करण्यास प्राथमिकता देते. कार्यक्रमास डॉ विशाल कुटे, सेंटर हेड , डॉ मिलिंद दुनाखे , डॉ श्रीकांत देशमुख, डॉ जयपाल घुनावत , डॉ नारायण देशमुख , डॉ अविनाश कचरे, डॉ दीपेन शाह यांची उपस्थिती होती.

## शिवाजी शुगरचा तृतीय अग्नि प्रदिपण उत्साहात



तभा वृत्तसेवा

पैठण दि ३१:- शिवाजीराव अँग्रो इंड्रष्टीज प्रा. ली डेरा नांदरच्या शिवाजी शुगर साखर कारखाण्याच्या तृतीय बॉयलर अग्नि प्रदीपण समारंभ कारखाण्याचे चेअरमन रवींद्र पाटील काळे यांच्याहास्ते सपत्नीक धार्मिक विधिवत उत्साहात पार पडला यावेळी पंचक्रोशीतील ऊस उत्पादक, सभासद, शेतकरी, कामगार मोठया संख्येने उपस्थित होते. ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या सहकार्याने यंदा कारखाण्याची गाळप क्षमता वाढवली जाणार असून शेतकऱ्यांनी शिवाजी शुगरला भरभरून ऊस घालावा असे आवाहन यावेळी चेअरमन रवींद्र पाटील काळे यांनी शेतकऱ्यांशी बोलतांना केले.

या प्रसंगी भाऊसाहेब औटे,रामचंद्र पाटील काळे,सतिष बलदवा, मुख्य कार्यकारी अधिकारी पठाण,मित्रवर्धन पाटील काळे, उदयसेन पाटील काळे,कारभारी लोहकरे,श्याम लोहिया, अशोक जाधव, यशवंतराव काळे,प्रवाहचे संस्थापक रामेश्वर गोर्डे, गोपाळ धारे, सरपंच ज्ञानेश्वर जाधव, उप सरपंच प्रशांत देशमुख, यशवंत राऊत, अँड किशोर वैद्य,देविदास सोनवणे, मच्छिंद्र मिसाळ,गोपाळ वैद्य, भाऊसाहेब सोनवणे, भाऊसाहेब खुळे,ईश्वर भोसले, रमेश ढाकणे,बिलाल पठाण, कारभारी सोनवणे,भागवत मापारी, गणेश कणसे,संजय कापडे, काका नवथर, निजाम शेख,लतीफ शेख, उस्मान शेख, मुख्तर पठाण,प्रभाकर राऊत सह मोठ्या संख्येने ऊस उत्पादक शेतकरी, सभासद, कामगार उपस्थित होते.

## ११ कोटींचे मेगा बक्षीस कोण जिंकेल?

### लॉटरी खरेदीदारांमध्ये वाढली उत्सुकता आणि थरार!

मुंबई: पंजाब स्टेट डियर दिवाळी बंपर २०२५ लॉटरीच्या ११ कोटींच्या पहिल्या बक्षिसाचा विजेता कोण ठरणार, याबाबत लॉटरी खरेदीदारांमध्ये प्रचंड उत्सुकता आणि थरार निर्माण झाला आहे.

ही बाब विशेष लक्षात घेण्यासारखी आहे की हा ड्रॉ फक्त विक्री झालेल्या तिकिटांवरच काढण्यात येणार आहे, त्यामुळे हे निश्चित आहे की ११ कोटींचे मेगा बक्षीस कोणीतरी नक्कीच जिंकणार आहे. हा बहुप्रतीक्षित ड्रॉ शुक्रवार, ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी पंजाब राज्य लॉटरी संचालनालय, लुधियाना (पंजाब) येथे मान्यवरांच्या उपस्थितीत घेण्यात येणार असून, त्याचे थेट प्रक्षेपण यूट्यूबवर करण्यात येणार आहे. ५०० किंमतीची ही तिकिटे महाराष्ट्रातील सर्व भागांमध्ये विक्रीस उपलब्ध आहेत. नागरिकांना या दिवाळीत आपले नशीब आजमावण्याची सुवर्णसंधी आहे. मुख्य बक्षिसासोबतच या तिकिटामध्ये अनेक आकर्षक पारितोषिके आहेत. दुसरे बक्षीस ३ कोटी (१ कोटी ÷ ३ बक्षिसे) आणि तिसरे बक्षीस १.५ कोटी (५० लाख ÷ ३ बक्षिसे) असे निश्चित करण्यात आले असून, त्याशिवाय इतरही अनेक बक्षिसे जिंकण्याची संधी आहे. हे उल्लेखनीय आहे की श्री हरमिंदर सिंग यांनी यापूर्वी पंजाब स्टेट डियर लोहरी मकरसंक्रांत बंपर २०२५ लॉटरीमध्ये १० कोटींचे पहिले बक्षीस जिंकले होते.

आता सर्वांचे लक्ष ३१ ऑक्टोबर २०२५ कडे लागले आहे- या वेळी ११ कोटींचा भाग्यवान विजेता कोण ठरणार हे पाहणे खरोखरच रोमांचक ठरणार आहे. चला पाहूया, या दिवाळीत कोणाचे नशीब उजळते !

## राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट शनिवारी नांदेड दौऱ्यावर

नांदेड, ३१ ऑक्टोबर : राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट हे शनिवार १ नोव्हेंबर २०२५ रोजी नांदेड दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे राहील.

शनिवार १ नोव्हेंबर २०२५ रोजी छत्रपती संभाजीनगर येथून वाहनाने दुपारी ४.३० वा. शासकीय विश्रामगृह नांदेड येथे आगमन. दुपारी ४.३० ते ४.४५ वाजेपर्यंत शासकीय विश्रामगृह नांदेड येथे राखीव. दुपारी ४.४५ ते ५ वाजेपर्यंत नांदेड जिल्ह्यातील शिवसेना पदाधिकारी यांच्यासोबत चर्चा स्थळ-शासकीय विश्रामगृह नांदेड. दुपारी ५.३० वा. शासकीय विश्रामगृह नांदेड येथून वाहनाने समस्त आंबेडकरवादी समाज नांदेडच्यावतीने जाहीर नागरी सत्कार सोहळ्यास उपस्थिती. स्थळ- कै. शंकरराव चव्हाण सभागृह (स्टेडियम) नांदेड. सायंकाळी ७.४५ वा. कै. शंकरराव चव्हाण सभागृह (स्टेडियम) नांदेड येथून वाहनाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरवादी मिशन नांदेडकडे प्रयाण. सायं. ८ वा. डॉ. बाबासाहेब आंबेडकरवादी मिशन नांदेड येथे आगमन. सायं. ८ ते ८.३० वाजेपर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकरवादी मिशन नांदेड येथील विद्यार्थ्यांसोबत चर्चा. सायं. ८.३० वा. डॉ. बाबासाहेब आंबेडकरवादी मिशन नांदेड येथून वाहनाने शासकीय विश्रामगृह नांदेडकडे प्रयाण. सायं. ८.४५ वा. शासकीय विश्रामगृह नांदेड येथे आगमन. सायं. ८.४५ ते ९.१५ वाजेपर्यंत शासकीय विश्रामगृह नांदेड येथे राखीव. रात्री ९.१५ वा. शासकीय विश्रामगृह नांदेड येथून वाहनाने छत्रपती संभाजीनगरकडे प्रयाण करतील.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# गावकऱ्यांनी शिबिराचा लाभ घेऊन पशुधनास योग्य ते उपचार व प्रतिबंधात्मक उपाय करून लाभ घ्यावा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३१ ऑक्टोबर**

गेवराई तालुका गोदावरी व सिंदफणा नदीकाठी वसलेला असल्याने व या वर्षात अति वृष्टी झाल्याने तालुक्यातील पशुधनाची पशुसंवर्धन विभागा मार्फत विशेष काळजी मोहीम शिबिरांच्या माध्यमातून घेण्यात येत आहे.अतिवृष्टी मुळे जनावरांमध्ये लंम्पी रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे.जनावरांना रोग प्रादुर्भाव होऊ नये म्हणून विशेष काळजी घेणे गरजेचे आहे.

सर्व प्रथम जनावरांमध्ये गोचीड गोमाशी निर्मुलन करणे ,गोठ्या मध्ये स्वच्छता ठेवणे ,जंत निर्मुलन ,गोठा फवारणी हे प्रथम स्वरुपात केल्याने रोग प्रादुर्भाव बऱ्या पैकी टाळता येतो.या वरही आजाराने शिरकाव केला तर त्या जनावरास विलग करून ठेवावे.लंम्पी रोगप्रादुर्भाव वाढू नये या साठी तालुक्यास ४०१०० ञ्रेीींझुेींरलललळप प्राप्त झाली असून तालुक्या मध्ये १००टक्के गेवराई तालुका गोदावरी व सिंदफणा नदीकाठी वसलेला असल्याने व या वर्षात अति वृष्टी झाल्याने तालुक्यातील पशुधनाची पशुसंवर्धन विभागा मार्फत विशेष काळजी मोहीम शिबिरांच्या माध्यमातून घेण्यात येत आहे.अतिवृष्टी मुळे जनावरांमध्ये लंम्पी रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे.जनावरांना रोग प्रादुर्भाव होऊ नये म्हणून विशेष काळजी घेणे गरजेचे आहे.

सर्व प्रथम जनावरांमध्ये गोचीड गोमाशी निर्मुलन करणे ,गोठ्या मध्ये स्वच्छता ठेवणे ,जंत निर्मुलन ,गोठा फवारणी हे प्रथम स्वरुपात केल्याने रोग प्रादुर्भाव बऱ्या पैकी टाळता येतो.या वरही आजाराने शिरकाव केला तर त्या जनावरास विलग करून ठेवावे.लंम्पी रोगप्रादुर्भाव वाढू नये या साठी तालुक्यास ४०१०० GoatPoxvaccin प्राप्त झाली असून तालुक्या मध्ये १००%गोवर्गीय लसीकरण पूर्ण झालेले आहे.तालुक्या अंतर्गत एकूण २५ पशुचिकित्सालय आहेत.व गेवराई तालुक्या मध्ये एकूण १९४ गावे आहेत.पशुसंवर्धन खात्या मार्फत नियोजन व टीम तयार करून प्रत्येक गावात शिबिरे आयोजित केलेली आहेत.शिबिरांच्या माध्यमातून औषधोउपचार व पशुपालका मध्ये जनजागृती करण्यात येत आहे.''गाव तेथे शिबीर '' शेतकऱ्याच्या बांधावर गोठ्या मध्ये फिरते पशुवैद्यकीय वहानाच्या माध्यमातून रोगराई मुक्त तालुका हा विडाच पशुसंवर्धन विभागाने उचलला आहे.या मध्ये फिरते पशुवैद्यकीय वहानाच्या माध्यमातून ,प्रतेक्ष भेटी च्या माध्यमातून प्रत्येक गावात रोगमुक्त शिबीर आयोजित करण्यात आलेआहेत.

# विशेष घटक योजनेसाठी ऑनलाईन प्रस्ताव सादर करावेत

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३१ ऑक्टोबर**

विशेष घटक योजनाः (सन २०२५-२६ प्राप्त उद्दीष्ट ०६ लाभार्थी) स्वरूपः- प्रकल्प मर्यादा रु. ५००००/- पर्यंत.प्रकल्प मर्यादेच्या ५० टक्के पर्यंत अनुदान देण्यात येते व राहिलेली ५० टक्के रक्कम

बँके मार्फत देण्यात येते. उदा. (२५ हजार अनुदान २५ हजार बँक रक्कम बँक कर्जावर बँकेच्या नियमा प्रमाणे व्याज आकारण्यात येते.कर्जाची परतफेड सर्वसाधरणपणे ३ वर्षात करण्याची आहे. बीजभांडवलः (सन २०२५-२६ प्राप्त उद्दीष्ट ०६ लाभार्थी)

स्वरूपः-प्रकल्प मर्यादाः- ०५ लाखापर्यंत

प्रकल्प मर्यादेच्या २० टक्के बीजभांडवल कर्ज महामंडळामार्फत ४ टक्के द.सा.द.शे. व्याज दराने देण्यात येते. सदर राशीमध्ये महामंडळाचे अनुदानाचा रु. १०,०००/- चा समावेश आहे.बँकेचे कर्ज ७५ टक्के देण्यात येते व सदर कर्जावर बँकेच्या नियमाप्रमाणे व्याज दर आकारण्यात येतो. महामंडळाचे व बँकेच्या कर्जाची परतफेत एकाच वेळेस ठरवुन दिलेल्या समान मासिक हप्त्यानुसार तीन ते पाच वर्षाच्या आत करावी लागते.अर्जदारास ५ टक्के स्वतः चा सहभाग भरावयाचा आहे. थोडक्यात बँक रक्कम ७५ टक्के महामंडळ २०टक्के व अर्जदाराचा सहभाग ५ टक्के एकूण १०० टक्के ारहरवळीहर.ालिलवल.ळप या संकेतस्थळावर ऑनलाईन (Online) कर्ज मागणी अर्ज उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. तरी इच्छुक अर्जदारांना महामंडळाकडुन खालीलप्रमाणे आवाहन करण्यात येत आहे.अर्जदारांनी त्यांचे स्वतः चे (E-Mail) ई मेल अकाउंट वापरुन ऑनलाईन (Online) पध्दतीने अर्ज करावा व अर्जाची मुळ प्रत व आवश्यक त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती जिल्हा कार्यालयात स्वतः सादर करावी. त्रयस्त व्यक्तीकडुन अर्ज किंवा इतर वैधानिक दस्ताऐवज स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी अधिक माहितीसाठी लाभार्थ्यांनी जिल्हा व्यवस्थापक महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, तळ मजला कार्यालयाशी संपर्क साधावा असे महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाचे व्यवस्थापक यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

# सामाजिक संस्थांनी रक्तदान शिबिरे आयोजन करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३१ ऑक्टोबर**

तरी या पार्श्वभूमीवर जिल्हयातील सर्व सामाजिक संस्था, शैक्षणीक संस्था, स्वयंसेवी संघटना व विविध मंडळ यांनी जास्तीत जास्त रक्तदान शिबीरे आयोजीत करुन या सामाजीक कार्यात सहभाग नोंदवावा असे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक व रक्तपेढी अधिकारी यांनी केले आहे.

रक्तदान शिबीर आयोजीत करु इच्छिणा-या संस्थानी जिल्हा रुग्णालयाच्या रक्तपेढी विभाग येथे संपर्क साधवा रक्तदान शिबीरासाठी आवश्यक सर्व मार्गदर्शन व तांत्रिक सहकार्य रुग्णालया मार्फत करण्यात येईल.जिल्हा रुग्णालय बीड येथे सध्या रक्त संकलन केंद्रामध्ये मोठ्या प्रमाणात रक्ताचा तुटवडा जाणवत असून सद्य:स्थितीमध्ये रक्तदान शिबीरे व रक्तदान करणा-यांची संख्या खूप कमी झाल्यामुळे रक्ताचा तुटवडा जाणवत आहे. रुग्णालयात विविध शस्त्रक्रिया आपत्कालीन रुग्णसेवा तसेच अपघातग्रस्त रुग्णांच्या उपचारासाठी व प्रसुती महिलांना रक्ताची अत्यंत आवश्यकता असते.इच्छुक सामाजिक संस्थानी रक्तदान शिबिरे आयोजनासाठी खालील क्रमांकावर संपर्क साधवा.

# जिल्हास्तरीय लोकशाही दिन 0३ नोव्हेंबर

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.३१ ऑक्टोबर**

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन सोमवार दि. दि. ०३ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी १० ते दुपारी १२ या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालयात करण्यात आले आहे.

अर्जदाराने विहित नमुन्यातील अर्ज १५ दिवस अगोदर दोन प्रतीत सादर करणे आवश्यक आहे. लोकशाही दिनासाठी अर्ज देताना संबंधित तालुक्यातील तिसऱ्या सोमवारी तालुकास्तरीय लोकशाही दिनामध्ये अर्ज दिलेला असावा. तालुकास्तरीय लोकशाही दिनात एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी होऊन देखील कोणतीही कार्यवाही झालेली नसावी, अशाच अर्जदारांनी टोकन क्रमांकाच्या पावतीसह अर्ज दोन प्रतीत सादर करावा.

लोकशाही दिनामध्ये न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्व, अपील, सेवाविषयक, आस्थापनाविषयक बाबी, विहित नमुन्यात नसणारे व आवश्यक ती कागदपत्रे न जोडलेले अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. तालुकास्तरीय लोकशाही दिनातील टोकन क्रमांकाची तहसीलदार यांच्या स्वाक्षरीची पोहोच पावती, दिलेल्या मुदतीत व नमुन्यात ज्यांनी यापूर्वीच्या आवश्यक कागदपत्रासह अर्ज केले असतील त्यांना तक्रार मांडता येईल, असे जिल्हाधिकारी कार्यालयाने कळवले आहे.

# बीड येथे नि:शुल्क निवासी उद्योजकता विकास प्रशिक्षण

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.३१ ऑक्टोबर**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे पुरस्कृत आणि महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र व जिल्हा उद्योग केंद्र बीड यांच्या संयुक्त विद्यमाने अनुसूचित जातीतील युवक, युवती व महिलांसाठी एक महिना कालावधीचे बीड नि:शुल्क निवासी उद्योजकता विकास प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे.

या प्रशिक्षण कार्यक्रमात उद्योगाच्या निवडी पासून ते उभारणीपर्यंत संपूर्ण शास्त्रोक्त प्रशिक्षण देण्यात येणार असून सदरील प्रशिक्षणामध्ये उद्योग संधी लघु उद्योग, सेवा उद्योग, व्यापार उद्योग,उद्योगाची निवड उद्योजकीय गुण विकास, व्यक्तिमत्व विकास, बाजारपेठ पाहणी तंत्र, उद्योग निवड प्रक्रिया, महिला उद्योजकांसाठी धोरणे, उद्योग उभारणी प्रक्रिया, तसेच विविध शासकीय कर्ज व अनुदान योजनांची माहिती देण्यात येईल.

कार्यक्रमात यशस्वी उद्योजकांचे अनुभव, प्रकल्प अहवाल , संवाद व विक्री कौशल्य, तसेच उद्योगाचे व्यवस्थापनाच्या मूलभूत तत्त्वांवर विशेष सत्रे घेतली जाणार आहेत. विविध उद्योग आणि व्यवसाय क्षेत्रांबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात येणार आहे. तसेच दिनांक ४ नोव्हेंबर २०२५ रोजी एम सी ई डी प्रशिक्षण हॉल लोकमत कार्यालयाच्या समोर बलवा बिल्डिंग लक्ष्मी अर्बन बँकेच्या तिसऱ्या मजल्यावर सहयोग नगर बीड येथे एसी प्रवर्गातील लाभार्थींसाठी एक दिवशीय उद्योजकता परिचय कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे. सदरील कार्यक्रमात उद्योग व्यवसाय संदर्भात व प्रशिक्षणाविषयी मार्गदर्शन करून लाभार्थींचे अर्ज भरून घेण्यात येणार आहेत.प्रशिक्षणासाठी पात्रता

वय १८ ते ४५ वयोगटातील एस.एस.सी. उत्तीर्ण युवक, युवती आणि महिला यांनी या प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा, प्रशिक्षणामध्ये ३० लाभार्थी ची प्रत्यक्ष मुलाखती द्वारे निवड करण्यात येणार असून स्वतःचा उद्योग सुरू करू इच्छिणाऱ्या उमेदवारांनी प्रशिक्षण प्रवेश अर्ज भरण्यासाठी दिनांक ०७ नोव्हेंबर २०२५ पर्यंत श्री विजय लोखंडे प्रोग्राम ऑर्गनायझर(एमसीईडी) द्वारा जिल्हा उद्योग केंद्र संचेती बिल्डिंग गुडलक हॉटेल च्या बाजूला जालना रोड बीड येथे संपर्क करावा. असे आवाहन श्री किरण जाधव महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र बीड व दत्तात्रय क्षीरसागर प्रकल्प अधिकारी एमसीईडी बीड, सुदाम थोटे विभागीय अधिकारी एमसीईडी छत्रपती संभाजी नगर यांनी केले आहे.

# केज येथे सोमवारी तात्काळ (इमर्जेन्सी) रक्तदान शिबिराचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.३१ ऑक्टोबर**

येथील रोटरी क्लब ऑफ केज च्या वतीने येत्या सोमवार दि ३ नोव्हेंबर रोजी तातडीचे रक्तदान शिबिर आयोजित केले आहे.

सध्या अंबेजोगाई येथील शासकीय रक्तपेढी मध्ये रक्ताचा तुटवडा निर्माण झाला आहे.अनेक रुग्णांना तात्काळ रक्तपुरवठ्याची गरज आहे. केज शहर व परिसरातील बहुतांश रुग्ण हे अंबेजोगाई शासकीय रुग्णालयात उपचार घेतात,

म्हणून रोटरी क्लब ऑफ केजच्या वतीने सोमवार दि ३ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता हनुमान मंदिर (वकीलवाडी) केज येथे तातडीचे रक्तदान शिबिर आयोजन करण्यात आले आहे. केज रोटरीच्या वतीने सर्व समाजप्रेमी युवक, युवती व नागरिकांनी या रक्तदान शिबिरात सहभागी होऊन रक्तदान करावे व इतरांनाही यासाठी प्रेरित करावे असे आवाहन केले आहे.*रक्तदान-जीवनदान*!

*रक्तदान - सर्वश्रेष्ठ दान !!असल्याचेही आयोजकांनी म्हटले आहे. रक्तदातेच समाजाचे खरे दाते व खरा आधार आहात...! संपर्कासाठी

*रो सत्यवान राऊत*
अध्यक्ष..९६२३६१४०००
*रो प्रवीण देशपांडे*
सचिव..९४२००३१५५५
*रो जितेंद्र देवधारे*
प्रोजेक्ट चेअरमन
*रो अनिकेत पाटील*
प्रोजेक्ट को- चेअरमन
रो हनुमंत भोसले
संस्थापक अध्यक्ष
९४२३७३३८८८ यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# येडेश्वरी साखर कारखान्याच्या गळीत हंगामाचा शुभारंभ

## 'एफआरपी' पेक्षाही जास्त भाव देणार; खा.सोनवणेंनी ठणकावून सांगितले

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.३१ ऑक्टोबर**

ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या आयुष्यात नवीन क्रांती यावी, शेतकऱ्यांचे जीवनमान उंचवावे, असा हेतू डोळ्यासमोर ठेवून येडेश्वरी साखर कारखान्याची उभारणी केली. आजपर्यंत सर्वाधिक ऊसदर देण्याचे काम येडेश्वरी कारखान्याने केलेले असून यावर्षी देखील एफआरपीपेक्षा अधिकचा दर देऊ, असा शब्द खा.बजरंग सोनवणे यांनी उसउत्पादक शेतकऱ्यांना दिला.

येडेश्वरी साखर कारखाना लि.युनिट नं.१, आनंदगाव (सा.), ता. केज येथील सन २०२५-२६ च्या १२ व्या गळीत हंगामाचा शुभारंभ खा.बजरंग सोनवणे यांच्या हस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साही वातावरणात संपन्न झाला. यावेळी खा.सोनवणे बोलत होते. यावेळी पुढे बोलताना ते म्हणाले, गेल्या ११ हंगामांपासून येडेश्वरी साखर कारखाना सातत्याने प्रगतीचा ध्यास घेत कार्यरत आहे. ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या परिश्रमामुळे आणि कारखान्याच्या कार्यक्षम व्यवस्थापनामुळे आज कारखान्याने उत्पादन, कार्यक्षमता आणि शेतकरी हितसंबंध या सर्व क्षेत्रांत उल्लेखनीय यश मिळवले आहे. कारखान्याच्या माध्यमातून



परिसरातील शेतकऱ्यांना वेळेवर ऊस गाळप, योग्य दर, सेंद्रिय शेती व नवीन तंत्रज्ञानाचे मार्गदर्शन केले. आगामी काळात ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या विकासासाठी साखर, इथेनॉल, वीज उत्पादन आणि उपउद्योग यांच्या माध्यमातून आणखी नवे प्रकल्प राबविण्याचा कारखान्याचा संकल्प आहे. आजवर येडेश्वरी कारखान्याने सर्व शेतकरी बांधवांचा ऊस वेळेत घेवून जाण्याचे काम केले आहे. यावर्षी देखील सर्व शेतकऱ्यांचा हा कारखाना घेवून जाईल. शेतकऱ्यांनी कोणतीही अडचण आल्यास कारखान्यावर यंत्रणेशी संपर्क करावा, असे आवाहनही खा.सोनवणे यांनी केले. या शुभारंभ प्रसंगी कारखान्याचे सर्व संचालक, ऊस उत्पादक शेतकरी, नेतेमंडळी, विभागप्रमुख, खातेप्रमुख, कर्मचारी, वाहतूक ठेकेदार, कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ऊसउत्पादकांना बोनसही देणार

येडेश्वरी साखर कारखान्याने आजवर बीड जिल्ह्यात सर्वाधिक भाव देण्याचा प्रयत्न केलेला आहे. यावर्षीही आपण चांगला दर देणार आहोतच, पण या कारखान्यावर माझ्या शेतकऱ्यांचा मोठा विश्वास असून यावर्षी आपण ऊसउत्पादकांना बोनस देण्याचा देखील विचार करत आहोत. शिवाय यापुढे कायमस्वरूपी शेतकऱ्यांना बोनस दिला जाईल, असेही खा.बजरंग सोनवणे म्हणाले.

# शेतकऱ्याच्या चेहऱ्यावर हसू यावं-हाच आमचा दिवाळीचा आनंद

## बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांचा शेतकऱ्यांशी थेट संवाद : अनुदान, नुकसानभरपाई, आणि शेतीविषयक प्रश्नांवर सखोल मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३१ ऑक्टोबर**

शुक्रवार दि ३१ ऑक्टोबर रोजी पांढऱ्याचीवाडी (ता. बीड) येथील सभागृह वेगळ्याच वातावरणाने भरून गेल होत . प्रशासन आणि शेतकरी वर्गाचा थेट संवाद - भावनेने , समजुतीने आणि जबाबदारीने सजलेला . बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी येळंबघाट मंडळातील शेतकऱ्यांशी संवाद साधत अनुदान, नुकसानभरपाई , शेतीतील समस्या आणि शासनाच्या योजनांबाबत सविस्तर मार्गदर्शन केले .

या संवाद सत्रात नांदूर फाटा , धावज्याचीवाडी , खरड्याचीवाडी , चाकरवाडी या गावांतील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते . तहसीलदार शेळके यांनी प्रत्येक शेतकऱ्याचे प्रश्न संयमाने ऐकून घेतले , त्यांच्या अडचणींचे तत्काळ निराकरण करण्याचे आश्वासन दिले . त्यांनी सांगितले - यंदा झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. मुख्यमंत्री महोदय , पालकमंत्री अजितदादा पवार यांचे स्पष्ट निर्देश होते की, शेतकऱ्यांच्या खात्यातील अनुदान दिवाळीपूर्वी जमा व्हावे .त्यानुसार बीड प्रशासनाने त्यासाठी सर्व यंत्रणा सज्ज ठेवली होती . शेळके पुढे म्हणाले - तुमच्या भागातील सुमारे ९० टक्के शेतकऱ्यांच्या खात्यात अनुदान जमा झाले आहे . उर्वरित शेतकऱ्यांनी त्वरित फार्मर आयडी तयार करावेत.तहसीलदार शेळके यांनी यानंतर 'आपले सरकार केंद्र' येथे पाहणी केली . नंतर थेट शेतकऱ्यांच्या शेतात जाऊन सहाय्यक स्तरावरील पीक पाहणीचे प्रात्यक्षिक दाखवले .

शेतीबरोबरच आपल्या मुलांना चांगले शिक्षण द्या , शासनाच्या योजना समजून घ्या आणि गावातील समस्या थेट आमच्यापर्यंत पोचवा - प्रशासन सदैव तुमच्या सेवेसाठी तयार आहे, असे त्यांनी सांगितले.सभागृहात शेतकऱ्यांनीही त्यांना प्रश्न विचारले , काहींनी अनुदान मिळाल्याची माहिती दिली . चेहऱ्यावर आनंदाचे हास्य घेऊन शेतकऱ्यांनी शासन आणि प्रशासनाचे आभार मानले.

यावेळी उपस्थित शेतकऱ्यांनी आपल्याला अनुदान मिळाले असल्याचे सांगून समाधान व्यक्त केले व याबद्दल शासनाचे , जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन , उपविभागीय अधिकारी कविता जाधव , तहसीलदार चंद्रकांत शेळके यांचे व सर्व कनिष्ठ अधिकारी , कर्मचारी यांचे आभार



मानले.यावेळी मंडळ अधिकारी दीपाली आघाव, ग्राम महसूल अधिकारी प्रदीप गर्जे , प्रशांत नलावडे , श्रद्धा जोगदंड , निखिल राऊत , सहाय्यक कृषी अधिकारी सुनील बहिरवाळ, पांढऱ्याचीवाडी चे उद्योजक राजेभाऊ शेळके , तांदळ्याचीवाडी वाडी चे पोलीस पाटील अर्जुन तांदळे , धावज्याचीवाडीचे सरपंच महेंद्र काटकर , चाकरवाडी चे ग्रामस्थ चंद्रकांत डोईफोडे , बाबासाहेब पवार , अक्षय घोडके , अमर हजारे ,विकास पवार , चक्रधर भोसले, योगेश शेळके , धम्मदिप वंजारे , प्रकाश भोसले , रामा रंगा शेळके, दिनकर ताटे इत्यादी उपस्थित होते.समारोपाच्या वेळी तहसीलदार शेळके म्हणाले - आमचं खरं समाधान तेव्हाच आहे, जेव्हा शेतकऱ्याच्या चेहऱ्यावर पुन्हा हसू उमटेल. हेच आमचं ध्येय आहे. या संवाद उपक्रमामुळे शेतकऱ्यांमध्ये आत्मविश्वास वाढला असून, प्रशासनाशी थेट संवाद साधण्याची नवी दारे खुली झाली.

# लंपी आजारावर ग्राहक पंचायत निवेदनानुसार उपाय योजना-अनिल बोर्डे

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.३१ ऑक्टोबर**

जिल्ह्यात लंपी आजार मोठ्या प्रमाणात झाल्यामुळे पशुपालक व शेतकरी ग्राहक मोठ्या प्रमाणात परेशान झाल्यामुळे बीड जिल्हा ग्राहक पंचायत महाराष्ट्र च्या वतीने जिल्हाधिकारी बीड व तहसीलदार गेवराई यांना याबाबत युद्धपातळीवर उपाययोजना करण्याचे निवेदन सादर करण्यात आले होते त्यानुसार जिल्ह्यात ग्रामीण भागात जनजागृती मोहीम सुरू करण्यात आली आहे तसेच ग्रामीण भागात जाऊन पशुपालक व शेतकरी ग्राहक यांना घ्यावयाच्या दक्षता काळजी याबाबत प्रत्यक्ष मार्गदर्शन व औषधोपचार करण्यात येत आहे. तरी संबंधितांनी पशुवैद्यकीय अधिकारी यांच्याशी संपर्क करावा. व हा आजार नियंत्रणात असून पशु मालकाने व शेतकरी ग्राहकाने घाबरून जाऊ नये अशी माहिती डॉ. श्री महेश जी लकडे पशुवैद्यकीय अधिकारी उमापूर यांनी बीड जिल्हा ग्राहक पंचायत उपाध्यक्ष अनिल बोर्डे यांना प्रत्यक्ष दिलेली आहे. पशु मालकांना काही समस्या निर्माण झाल्यास ग्राहक मार्गदर्शन केंद्र प्रमुख अनिल बोर्डे यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे. भ्रमणध्वनी क्रमांक ९४ २१ ३४ ३० ६० .

# रस्त्यांची दुर्दशा आणि अंबाजोगाईकरांचा संताप; शासनाचे करोडो रूपये खड्ड्यात

**अंबाजोगाईत साजरी झाली खड्ड्यांची दिवाळी!**

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.३१ ऑक्टोबर**

दिवाळीच्या दिवशी अंबाजोगाईत दिव्यांनी सजलेले रस्ते हा नेहमीचा अनुभव. मात्र अंबाजोगाईत यंदा दिवे रस्त्यांवर नव्हे तर रस्त्यांच्या खड्ड्यांत पेटले. शहरातील सतत वाढणारे खड्डे, पावसात उखडलेले सिमेंट रस्ते आणि प्रशासनाचे मौन पाहून संतप्त नागरिकांनी दिवे, मेणबत्त्या, रांगोळ्या आणि पुष्पहारांनी खड्ड्यांची पूजा करत अनोखा निषेध नोंदवला. मोठा गाजावाजा आणि अंबाजोगाईतील रस्त्यांसाठी हजारो कोटींचा निधी खर्च झाला हे किती पोकळ व दिखाऊ आहे याचा प्रत्यय आल्याचे संतप्त नागरिकांनी बोलून दाखवले.

अंबाजोगाई शहरात नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या परिक्षेत्रात अधिसुचित विशिष्ट नागरी सेवा, सुविधा पुरविणे योजनेअंतर्गत कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई यांनी काही महिन्यांपूर्वीच तयार केलेल्या रस्त्यांवर मोठं-मोठ्या खड्ड्यांमुळे या नवीन रस्त्यांची अवस्था अक्षरशः दयनीय झाली आहे. त्यामुळे अंबाजोगाई शहरातील नागरिकांना या रस्त्यांवरून धोकादायक प्रवास करावा लागत आहे. खड्ड्यांमुळे अपघाताच्या घटना ही समोर येत आहेत. गणेशोत्सव, दसरा, नवरात्री उत्सव आणि नुकतीच दिवाळी ही झाली. पण, अंबाजोगाई शहरातील रस्त्यांची दैना काही फिटली नाही. शहरातील विविध मार्गावरील दिवसेंदिवस वाढणाऱ्या खड्ड्यांमुळे वाहनधारकांचे मोठे हाल होत आहेत. प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी स्थानिक नागरिकांनी दिवाळी पाडव्यानिमित्त या खराब रस्त्यांवर अनोख्या पद्धतीने निषेध व्यक्त केला. जागोजागी पडलेल्या खड्ड्यांमध्ये पणत्या, दिवे, मेणबत्त्या लावून, फटाके वाजवून आणि काही ठिकाणी तर रांगोळी काढून रस्त्यांची 'दिवाळी' साजरी करीत झोपलेल्या प्रशासनाला जागे करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. या आंदोलनाला स्थानिक ज्येष्ठ नागरिक, युवक, महिला भगिनी यांचाही मोठा प्रतिसाद मिळाला. नागरिकांनी अंबाजोगाईतील रस्त्यांसाठी हजारो कोटींचा निधी आणला असा दावा करणाऱ्यांचा, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि संबंधित गुत्तेदार यांचा अनोख्या पद्धतीने निषेधच व्यक्त केला. अंबाजोगाई शहरातून जाणाऱ्या सिमेंट रस्त्यांवर तब्बल ४०० ते ५०० हून अधिक खड्डे पडले आहेत. काही ठिकाणी मोठ-मोठ्या भेगा तर अर्धा फुटांचे ही खड्डे रस्त्यावर पडले आहेत. त्यात पाणी साचल्याने खड्ड्यांच्या खोलीचा अंदाजही येत नाही. अनेक ठिकाणी रस्ते दुभंगले आहेत. तर खडी उघडी पडली आहे. त्यामुळे अनेकदा दुचाकी वाहनधारक घसरून पडत आहेत. अंबाजोगाईकरांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागतो. दुर्दैवाने काही मोठी दुर्घटना घडली तर त्याची जबाबदारी कोण घेणार? असा संतप्त सवाल नागरिकांकडून केला जात आहे. खड्डे बुजविण्याऐवजी आता आम्हालाच त्यांची पूजा करावी लागते यापेक्षा दुर्दैव ते काय ? आम्ही कर रूपाने शासनाच्या तिजोरीत जमा केलेले कष्टाचे पैसे असे खड्ड्यात जात आहेत. याचे वाईट वाटते. तर विकास कामांचे श्रेय घेणाऱ्यांनी अशा निकृष्ट दर्जाच्या कामांची जबाबदारी ही आता जाहीरपणे स्विकारावी असा टोला सुज्ञ नागरिक संबंधितांना लगावत आहेत. दरम्यान, अंबाजोगाईकरांनी प्रशासनास तातडीने रस्ता दुरूस्त करण्याचे आवाहन केले आहे.



एकाच गुतेदाराकडे सर्व कामे, पार्टनरशिपचे गौडबंगाल?

अंबाजोगाई शहरात रस्ता व नाल्या तयार करण्याचे, पाणी पुरवठा वितरण वाहिन्या अंथरणे, वीज वितरण पोल बसविणे, देखभाल दुरूस्ती करणे, रस्त्याच्या दुतर्फा वृक्षारोपण, शासकीय इमारत बांधकाम, उद्यान सुशोभीकरण ही सर्व कामे एकाच एजन्सीला देण्यामागे नेमके काय गौडबंगाल आहे. कारण, शासनाचे कोणतेही काम असो नेहमीचा एकच गुत्तेदार ठरलेला आहे. त्यामुळे या सर्व कामांमध्ये गुत्तेदारासोबत कोणाची पार्टनरशीप आहे. हे अंबाजोगाईतील सर्व जनतेला माहित झाले आहे. सत्ताधारी पक्षाच्या आमदारांच्या मर्जीतील याच गुत्तेदाराने त्याला वाट्टेल तसे, वाट्टेल तिथे, नागरिकांची मागणी असो किंवा नसो, निराश्रथ कामे करून ठेवल्याचा आरोप माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी केला आहे.

कामाच्या दर्जावर नियंत्रण नाही

कोणतेही मोजमाप, दर्जा, निकष न सांभाळता रातोरात सिमेंट रस्ते व नाल्या तयार केल्या. सिमेंट रस्त्यांचा अट्टाहास कशासाठी..? या सिमेंट रस्ते व नाल्यांना म्हणावी तशी वॉटरींग, फिनिशिंग केलेली नाही. ईस्टीमेट प्रमाणे कामाचा गुणवत्ता व दर्जा ही राखलेला नाही असे दिसते. नगरपालिका हद्दीतील सिमेंट रस्ते व नाल्यांचे कामे करताना नगरपालिका अभियंता यांचे मार्गदर्शन घेतले असेल का प्रश्नच आहे. तसेच ही कामे सुरू असताना सार्वजनिक बांधकामचे कार्यकारी अभियंता तसेच नगरपालिका अभियंता यांनी साधी पाहणी ही केली नाही अशी जनतेत चर्चा आहे. त्यामुळे अंबाजोगाईत अनेक ठिकाणी रस्ता वर आणि नाली खाली, कुठे रस्ता मोठा तर नाली लहान असे प्रकार झाले आहेत.

उंच नाल्यांमुळे घरात, मंदिरात घाण पाणी; हजारो कोटी गेले वाया

नागरिकांच्या निवासी घरांचे उंबरे खाली आणि रस्ता व नाली बांधकाम वर गेले आहे. अशा अनेक निकृष्ट दर्जाच्या कामांमुळे यावर्षी पावसाचे पाणी नालीवाटे न जाता हे घाण पाणी थेट गोरगरीब नागरिकांच्या घरात, व्यापाऱ्यांच्या दुकानात आणि शहरातील काही मंदिरांच्या पवित्र गाभाऱ्यात ही पोहोचले. त्यामुळे शासनाने अंबाजोगाईत रस्ते आणि नाल्यांसाठी दिलेले हजारो कोटी रूपये खड्ड्यात गेले असल्याचेच दिसून येत आहे असेही मोदी म्हणाले.

निकृष्ट दर्जाच्या कामांची पालकमंत्र्यांकडे तक्रार करणार

रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे होणाऱ्या त्रासावर आणि अपघातांवर निषेध व्यक्त करण्यासाठी अंबाजोगाईकरांनी दिवाळीच्या निमित्ताने या खड्ड्यांमध्ये दिवे लावून, रांगोळ्या काढून 'खड्ड्यांची दिवाळी' साजरी केली. प्रशासनाचे लक्ष या गंभीर समस्येकडे वेधून रस्त्यांवरील खड्डे बुजविण्यासाठी आणि दुरूस्तीसाठी कृती करण्यास भाग पाडणे यासाठीहे आंदोलन होते. मात्र याची सार्वजनिक बांधकाम विभाग व संबंधित प्रशासनाने कोणतीही दखल घेतली नसल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. याप्रकरणी लवकरच आपण राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार साहेब यांच्याकडे अंबाजोगाईतील निकृष्ट दर्जाच्या रस्ता व नाली बांधकामांची पालकमंत्र्यांकडे रितसर तक्रार करणार आहे.

राजकिशोर मोदी, माजी नगराध्यक्ष अंबाजोगाई

बीड विभागीय कार्यालय : आदर्शनगर गणपती मंदिरासमोर पांगरी रोड, बीड मो.९४०३२६४९३०, E-Mail - jagannathdeshmukh2020@gmail.com

## अग्रलेख...

# स्वत:ची(च) काळजी वाहणारी नोकरशाही

भारतात सर्वांत सुरक्षित, सर्वाधिक लाभ मिळविणारा आणि सर्वांत कमी जबाबदारी पाळणारा कोणता वर्ग असेल, तर तो आहे सरकारी कर्मचारी! याला अगदी थोडे लोक अपवाद. एरवी भरपूर सुट्या, उत्तम वेतन, कामाचे निश्चित तास, आरोग्यासह विविध प्रकारच्या सोयीसुविधा आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे नियत वेळी वेतनवाढ मिळणारा हा एकमेव वर्ग. देशभरात केंद्र आणि राज्य सरकारच्या कर्मचाऱ्यांची संख्या फार मोठी आहे. केंद्र सरकारचे कर्मचारी ३५ लाखांवर, तर सर्व राज्य सरकारांचे कर्मचारी पावणे दोन कोटींच्या वर. महाराष्ट्रात राज्य सरकारी कर्मचाऱ्यांची संख्या आहे पावणे पाच लाखांच्या आसपास. सरकार आणि प्रशासन सुरू आहे, याचा अर्थ सरकारी कर्मचारी काम करीत आहेत, असा घेतला जाऊ शकतो. वास्तवात, उच्चपदस्थ कर्मचारी सोडले, तर बहुतांशी कर्मचाऱ्यांना कशासाठीही जबाबदार धरले जात नाही. त्यांच्या कामाचा हिशेब घेण्याची पद्धत नाही. त्यांच्या सुट्या ठरलेल्या, वेतन ठरलेले आणि सन्माननीय अपवाद वगळता बहुतेकांची उदासिनताही ठरलेली. अशा वर्गाकडे सरकारी कमाईचा अर्थात करदात्यांच्या खिशातून येणाऱ्या पैशाचा मोठा वाटा वेतनवाढीच्या स्वरुपात दिला जातो. सरकारी भाषेत याला 'कमिटेड एक्सपेंडिचर' अर्थात् अपरिहार्य असे खर्च म्हणतात. वेतन, पेन्शन आणि कर्जावरील व्याज हा अपरिहार्य खर्च एवढा मोठा असतो, की विकास प्रक्रियेसाठी फारसा पैसा ऊरत नाही. केंद्र सरकारने आठव्या वेतन आयोगाचे सूतोवाच केले आहे. हा आयोग आधी केंद्र सरकारच्या कर्मचाऱ्यांना व नंतर राज्याच्या कर्मचाऱ्यांना लागू होणार आहे. आतापर्यंतच्या सर्व आयोगांचे कामकाज पाहिले, तर त्यात एक साम्य दिसते आणि ते म्हणजे पगारवाढ हा कर्मचाऱ्यांचा अधिकार असल्याचे तत्त्व मान्य करणे. वाढत्या महागाईसोबत पगारवाढ व्हायलाच हवी, यात वाद नाही. पण, ती किती, कशी व कोणत्या मुद्यावर करायची, हे आता तरी ठरले पाहिजे. वर्तमानात खाजगी क्षेत्रात वरिष्ठ व्यवस्थापकीय पदांवर काम करणाऱ्यांचे वेतन देखील केंद्र सरकारातील चपराशांच्या वेतनापेक्षा कमी आहे, हे विसंगतीचे एक साधे उदाहरण. १२ महिने राबणाऱ्या शेतकऱ्याला सरकारमधील बाबूपेक्षा कमी उत्पन्न मिळते, हे दुसरे उदाहरण. अशी उदाहरणे असंख्य देता येतील. आठव्या वेतन आयोगानंतर केंद्र सरकारचा वेतन व पेन्शन खर्च दीड पटीहून अधिक वाढणार आहे. स्वाभाविकच राज्य सरकारांना हा खर्च काही ना काही करून करावाच लागेल. महाराष्ट्र, तामिळनाडू, केरळ, पश्चिम बंगाल यासारख्या राज्यांमध्ये ७५ टक्के महसूल हा पगार, पेन्शन व व्याजावर खर्च होतो. विकासासाठी उरतात फक्त १५ ते २० टक्के. त्यातून सिंचन प्रकल्प करायचे, शाळा दुरुस्त करायच्या, मास्तर नेमायचे की दवाखाने अपग्रेड करायचे की पाणीपुरवठ्याच्या योजना करायच्या?

एका सर्वेक्षणानुसार, खाजगी क्षेत्रातील सरासरी मासिक उत्पन्न २७,००० ते ३५,००० रुपये आहे, तर केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांचा सरासरी पगार ८५,००० रुपये आहे. उच्चपदस्थ अधिकाऱ्यांचा पगार २ ते २.५ लाख रुपये मासिक आहे. अगदी चपराशापासून सुरुवात केली तरी त्याला महिन्याकाठी ३० ते ४० हजार रुपये सहज मिळतात. हा साराच अनुत्पादक खर्च आहे, असे सरसकट म्हणणे योग्य नाही. परंतु, सरकारी कर्मचारी खरोखर किती काम करतात, हा प्रश्न विचारणे गैर नाही. उत्पादनक्षमता, जबाबदारी, कार्यप्रदर्शन यांच्या कसोट्यांवर त्यांचे योगदान किती, या प्रश्नाचे साधे उत्तर 'अत्यल्प' असे आहे. खाजगी क्षेत्रात एखादी चूक झाल्यास थेट नोकरी जाते. सरकारी क्षेत्रात मात्र काम येत नाही किंवा काम करीत नाही, या मुद्यावर कुणाचीच नोकरी जात नाही. सरकारी कार्यालयातली फाईल वजन ठेवल्याखेरीज हलत नाही, तरीही सरकारी कर्मचाऱ्यांना लाडावले जाते. कारण हे कर्मचारी आणि त्यांचे कुटुंबीय मिळून एक प्रचंड मतदारसंख्या तयार होते. त्यामुळे कोणतेही सरकार त्यांना नाराज करायचे धाडस करीत नाही. व्यवस्थित वेतन सरकारी कर्मचाऱ्यांना, महागाई भत्ता सरकारी कर्मचाऱ्यांना, पेन्शन सरकारी कर्मचाऱ्यांना. जणू, इतरांना महागाईची झळ बसत नाही आणि इतर कुणाला पेन्शनची गरजच नसते. महागाई भत्ता हे तर 'स्वयंचलित वेतनवाढ यंत्र' आहे. कार्यक्षमता आणि उत्पादन वाढो अथवा घटो, करसंकलन कमी पडो, तरी तो आपोआप वाढत असतो. सरकारी कर्मचाऱ्यांचा वर्ग आता केवळ आर्थिक नव्हे, तर सामाजिकदृष्ट्याही स्वतंत्र 'क्लास' बनला आहे. त्यांना शासकीय क्वार्टर्स, आरोग्य विमा, प्रवास भत्ता, निवृत्तीनंतर पेन्शन असे सर्व काही मिळते. करदाते हा खर्च सोसत राहतात. काही वेळा असेही म्हटले जाते की, नागरिकांना चांगली सेवा मिळावी, लाचखोरी कमी व्हावी आणि कार्यक्षमता वाढावी म्हणून वेतनवाढ दिली जाते. यातले काहीही आतापर्यंतच्या वेतनवाढीतून साध्य झालेले नाही. लाचखोरी सतत वाढते आहे आणि कार्यक्षमतेत वाढ होताना दिसत नाही. यामुळे देशात नवी विषमता तयार झाली आहे. ती अशी की, एक वर्ग सतत कर देतो आणि दुसरा त्या करावर सतत जगत असतो. ही विषमता नैतिकदृष्ट्या अत्यंत धोकादायक आहे. ती परिश्रमाचे मूल्य कमी करणारी आहे. ही व्यवस्था एकप्रकारे जनतेच्या परिश्रमाचा उपभोग घेण्याचा अधिकार सरकारी कर्मचाऱ्यांना देणारी आहे. सरकारी कर्मचाऱ्यांचे वेतन आणि पेन्शन यामुळे सरकारची आर्थिक शिस्त बिघडत असल्याचा इशारा अनेक अर्थतज्ज्ञांनी यापूर्वी दिला आहे. काही अर्थतज्ज्ञ असे म्हणतात की, वेतनवाढीचे हे चक्र असेच सुरू राहिले, तर केंद्र व राज्यांचा एकत्रित वेतन खर्च सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या १२ टक्क्यांहून अधिक होईल. म्हणजे शिक्षण, आरोग्यासारख्या मूलभूत व्यवस्था राहिल्या बाजूला. असेच होत राहिले तर सरकार किंवा प्रशासन म्हणजे सरकारी कर्मचाऱ्यांनी, सरकारी कर्मचाऱ्यांसाठी सरकारी व्यवस्थेच्या माध्यमातून चालविलेली लाभ उकळणारी राजवट असे चित्र निर्माण होईल. जगातील बहुतांश प्रगत देशांनी सरकारी क्षेत्रात कामगिरी-आधारित (परफॉर्मन्स बेस्ड) वेतनपद्धती लागू केली आहे. ब्रिटनमध्ये पीआरपी अर्थात् परफॉर्मन्स रिलेटेड पे पद्धत आहे. तेथे कर्मचाऱ्याला उद्दिष्ट दिले जाते व त्यानुसार त्याचा पगार ठरतो. सिंगापूरमध्ये प्रत्येकाला 'की रिझल्ट एरियाज' दिले जातात, म्हणजे नेमके कोणते काम किती प्रभावीपणे करायचे आहे, हे सांगितले जाते. ऑस्ट्रेलियात दरवर्षी कर्मचाऱ्यांचे मूल्यमापन करून बढती-वेतनवाढ ठरविली जाते. भारतात मात्र असा विचार राजकीयदृष्ट्या 'धोकादायक' मानला जातो. कारण, तो नोकरशाहीची मक्तेदारी संपविणारा अर्थात् मतदारांना नाराज करणारा ठरू शकतो. पण, देशाला खरोखर उत्पादकता वाढवायची असेल, तर असा बदल करणे अपरिहार्य आहे. भारतात सुमारे ७ कोटी लोक नियमितपणे आयकर भरतात. १४० कोटींच्या देशात फक्त ५ टक्के जनता सरकारला थेट आर्थिक योगदान देते आणि त्या ५ टक्के लोकांच्या पैशातून नोकरशाहीचा पगार दिला जातो. करदात्याला ना निर्णय प्रक्रियेत स्थान आहे, ना त्याच्या पैशाच्या वापरावर त्याचे नियंत्रण आहे. अशा स्थितीत सरकारी कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीचा विषय नव्या नजरेतून पाहिला जाण्याची गरज आहे. वेतन आयोगाची संकल्पना निकालात काढण्याची गरज नाही. पण, प्रत्येक कर्मचाऱ्याला कामानुसार पगार, भत्ते, बोनस मिळेल, अशी व्यवस्था निर्माण केली गेली पाहिजे. लोकशाहीतील महत्त्वाचा स्तंभ असलेल्या नोकरशाहीकडून उत्तरदायित्व अपेक्षित आहे. पण, त्याचा लवलेशही नोकरशाहीत आढळत नाही. सदैव स्वत:ची काळजी वाहणारा वर्ग असेच नोकरशाहीचे स्वरूप आहे. प्रश्न आठव्या वेतन आयोगाचा नाही. पगारवाढीला विरोध करण्याचा किंवा पगारवाढीचे महत्त्व नाकारण्याचाही नाही. प्रश्न आहे तो सरकारी कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या लाभांच्या तुलनेत अत्यंत असमाधानकारक असलेल्या त्यांच्या कामगिरीचा आणि तरीही सरकारकडून होत असलेल्या त्यांच्या लाड-कौतुकाचा. हे लाड-कौतुक कामगिरीच्या नजरेने पाहण्याचा विवेक शासकांमध्ये येईल तोच सुदिन!

## प्रासंगिक

विनोद देशमुख

# सरदार पटेल नसते तर... आम्ही पाकिस्तानी असतो!

भारताचे पहिले उपपंतप्रधान आणि गृहमंत्री लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांचे नाव उच्चारताच निझामग्रस्त राजुरा तालुका, वऱ्हाडचा काही भाग आणि मराठवाडा येथील जनतेची मान आजही कृतज्ञतेच्या भावनेने झुकते, इतके त्यांचे आमच्यावर उपकार आहेत. कारण, सरदारांनी निझाम स्टेट बरखास्त करून स्वतंत्र भारतात विलीन करण्यासाठी पोलिस ॲक्शन (ऑपरेशन पोलो) केली नसती तर, वरील भागातील आम्ही लोक आज (दक्षिण) पाकिस्तानचे नागरिक राहिलो असतो आणि हिंदू अल्पसंख्यक म्हणून आमची दैनाच झाली असती, यात संशय नाही. यातून आम्ही वाचलो, हे निव्वळ पटेलांचे उपकार. ते आमच्या पुढच्या पिढ्यांनाही कधीही न विसरता येण्यासारखेच आहेत. त्यासाठी आम्ही सारे माजी निझाम स्टेटवाले सरदार पटेलांच्या कायम ऋणात राहू इच्छितो आणि आज त्यांच्या १५० व्या जन्मदिनी त्यांच्या स्मरणार्थ नतमस्तक होत आहोत.

शेवटचा निझाम मिर उस्मान अली खान अतिशय धूर्त होता. अखंड भारताच्या फाळणीच्या वेळी त्याला भारतात विलीन व्हायचे नव्हते. परंतु, आपले राज्य भारताच्या मध्यस्थानी असल्याने ही गोष्ट सहजशक्य नाही, याचीही त्याला कल्पना होती. म्हणून त्याने आधीच मुस्लिम युवकांचे निमलष्करी दल (रझाकार) उभारण्यास प्रोत्साहन देऊन हिंदू जनतेवर अत्याचार सुरू केले. याच्या विरोधात काँग्रेस नेते स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वात जनतेने गावोगावी लढा दिला, सशस्त्र संघर्ष करून रझाकारांचा कडवा प्रतिकार केला. त्यामुळे निझामाला शरणागती पत्करणे शेवटी भाग पडले.

या यशाचा अंतिम अंक मात्र सरदार पटेलांनी लिहिला, हे आता ऐतिहासिक सत्य आहे. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारतात सामील व्हायला निझाम तयार नव्हता आणि रझाकारांना मदत करीत निझाम स्टेटमध्ये अत्याचारांचा नंगानाच घालत होता. परंतु, भारतीय नेते काहीही करू शकत नव्हते. कारण, ब्रिटिश



गव्हर्नर जनरल लॉर्ड माऊंटबॅटन, पंडित नेहरू आणि बॅ. जिना यांचे एकमत होत नव्हते. शेवटी निझाम स्टेट, काश्मीर आणि जुनागढ या तीन संस्थानांचा प्रश्न अधांतरी ठेवून १४-१५ ऑगस्टला भारत-पाकिस्तान वेगळे करण्यात आले.

स्वतंत्र भारताचे पहिले गृहमंत्रिपद सरदार पटेल यांच्याकडे आल्यानंतर त्यांनी वरील तीनही संस्थानांचा प्रश्न प्राधान्याने हाती घेतला. काश्मीरचे महाराजा हरिसिंग यांनी भारतात येण्याचे मान्य केले. परंतु, जुनागढच्या नवाबाने पाकिस्तानमध्ये जाणे पसंत केले होते. त्यावर पटेलांनी जुनागढ ताब्यात घेऊन तेथे जनमताचा कौल भारताच्या बाजूने मिळवून घेतला. प्रश्न राहिला निझामाचा. कासीम रिझवीच्या पाठिंब्यावर निझाम नकारघंटा वाजवत होता. यावर तोडगा काढण्यासाठी निझामाशी चर्चा करण्यावर नेहरूंचा भर होता, तर पटेल मात्र लष्करी कारवाईच्या मूडमध्ये होते. तशी संधी त्यांना एक वर्ष उलटल्यानंतर मिळाली आणि त्याच्या परिणामी आम्ही उशिरा का होईना, स्वतंत्र होऊन भारताचे नागरिक बनू शकलो.

सप्टेंबर १९४८ मध्ये नेहरू परदेश दौऱ्यावर गेले आणि ही संधी साधून पटेलांनी पोलिस ॲक्शन करीत चार दिवसांत (१३ ते १७ सप्टेंबर) निझाम स्टेटवर ताबा मिळविला अन् ते भारतात विलीनही करून घेतले. बहुतांश भारताचा स्वातंत्र्यदिन १५ ऑगस्टला साजरा होत असताना माजी निझाम स्टेटमध्ये (महाराष्ट्राचे वरील तीन भाग, तेलंगणा, आंध्रप्रदेश, कर्नाटकचा काही भाग) मात्र स्वातंत्र्यदिन १७ सप्टेंबरला होतो, तो यामुळेच. याला हैदराबाद मुक्ती दिन, मराठवाडा मुक्ती दिन, राजुरा मुक्ती दिन असे संबोधले जाते, तर या स्वातंत्र्यासाठी झालेल्या जनतेच्या लढ्याला त्या-त्या भागातील मुक्ती संग्राम म्हणतात.

हे शक्य झाले सरदार वल्लभभाई पटेल यांच्यासारख्या कणखर, प्रसंगावधानी अन् दूरदृष्टीच्या नेत्यामुळेच. भारत आधी स्वतंत्र झाल्यामुळे निझाम स्टेटमध्ये लष्करी कारवाई करणे नव-भारताला शक्य नव्हते. कारण, आंतरराष्ट्रीय नियमानुसार, तो निझाम स्टेटवर हल्ला ठरला असता आणि प्रश्न चिघळून हाताबाहेर गेला असता. तसे होऊ नये म्हणून पटेलांनी पूर्ण काळजी घेतली. या कारवाईला त्यांनी पोलिस ॲक्शन असे नाव दिले आणि जनतेलाही सोबत घेत प्रत्यक्षात लष्कराचाच वापर केला! या डावपेचामुळे निझामाची गोची होऊन त्याला शेवटी पटेलांपुढे नाक घासावे लागले!!

एकूण, सरदार पटेलांच्या दृढ निश्चयामुळेच आज आम्ही भारतात आहोत आणि मानाने जगत आहोत. अन्यथा, बांगलादेशासारखे तिसरे पाकिस्तान आमच्या नशिबी आले असते आणि कायमचे हाल झाले असते. त्यातून आम्हाला वाचविणाऱ्या या लोहपुरुषाला आज दीडशेव्या जयंतिदिनी कोटी कोटी प्रणाम.

९८५०५८७६२२

## वेध

रेवती जोशी-अंधारे

# आता ट्रेंड स्नॅक्स टूरिझमचा!

'नित्य नूतन हिंडावे, उदंड देशाटन करावे' समर्थ रामदास स्वामींची ही उक्ती आजचे मिलेनियल्स आणि जेन झी खऱ्या अर्थाने सार्थ ठरवित आहेत. देश-विदेशात फिरून मनुष्याला येणारा विवेक त्याला सुजाण बनवितो, ही मान्यता! पर्यटन कशासाठी तर शिक्षणासाठी, निसर्गसौंदर्यासाठी, प्राचीन वास्तूंच्या अभ्यासासाठी, आरामासाठी आणि क्वचित वैद्यकीय उपचारांसाठी सुद्धा! पण, आता ठिकठिकाणचे स्नॅक्स खाण्यासाठी पर्यटनाचा ट्रेंड आला आहे. 'फिरायला जाणे' यामागची संकल्पनाच बदलून गेली आहे. प्रत्येक १० मैलांवर भाषा बदलते, तशी खाद्य संस्कृतीही बदलते. फिरायला गेल्यानंतर एखाद-दुसरा स्थानिक पदार्थ चाखायचा, ही रूढी मोडित काढून, कुठे आणि काय चांगले खायला मिळते? तिथे फिरायला जायचा ट्रेंड आहे. सोशल मीडियावर व्हायरल रिल्स, स्नॅक्स बनवितानाचे किंवा त्यांचे अन बॉक्सिंग करतानाचे व्हिडीओज् कल्पनेपलीकडे लोकप्रिय आहेत. एका ताज्या आकडेवारीनुसार, परदेशात पर्यटनाला जाण्यापूर्वी ४७ टक्के पर्यटक, स्थानिक पेय-पदार्थ आणि स्नॅक्सच्या पर्यायांचा प्राधान्याने विचार करतात. त्यात स्वित्झर्लंडचे चॉकलेट बुटीक, जपानचे किटकॅट, कोरियाई हनी बटर चिप्स, इटालियन ट्रफल क्रिस्प्स, थायलॅण्डचे प्रिंगल्स, तायवानचा बबल टी, टोकियोतील विविध चवींचे सकुरा, सेऊलच्या पेस्ट्री, दुबईचे कुनाफा चॉकलेट, फ्रूट आईस्क्रीम अशी ही यादी न संपणारी आहे.

एखाद्या ठिकाणी फिरायला गेल्यावर काय बघायचं? तिथली वनराई, जंगल सफारी, संग्रहालय, ऐतिहासिक वास्तू, प्राणी संग्रहालय, गगनचुंबी इमारती आणि तारांकीत हॉटेल्स? नाही! एखाद्या लहानशा गल्लीत मिचमिच्या डोळ्यांच्या आजीबाईने बनवलेली पेस्ट्री, रस्त्याच्या कडेला उभ्या हातगाडीवर बनविलेला पास्ता, एखाद्या सुपर मार्केटमध्ये मिळणारी स्थानिक फळांपासून बनविलेला खमंग चवीचा एखादा पदार्थ हे नव्या काळातील 'ट्रॅव्हल गोल' आहे.

एखाद्या चॉकलेट किंवा विशिष्ट सॅण्डविचसाठी परदेश प्रवास करण्यासाठी तयार असलेली आताची पिढी, खाण्याच्या अनुभवातून त्या ठिकाणच्या संस्कृतीशी जोडली जाण्यास उत्सुक आहे. ही खऱ्या अर्थाने 'वसुधैव कुटूंबकम्'ची सुरुवात आहे. देशोदेशीच्या प्रस्थापित पर्यटनस्थळांऐवजी स्थानिक खाद्यपदार्थ आता टुरिस्ट डेस्टिनेशन 'ठरवत' आहेत. यात जेन झीसोबतच मिलेनियल्स म्हणजे गेल्या शतकातील ८०च्या दशकात जन्मलेली मंडळीसुद्धा पुढे आहेत. दहापैकी ६ पर्यटक स्थानिक व्यंजनांच्या माहितीवर त्या पर्यटन स्थळी जायचं किंवा नाही, हे ठरवितात. जवळपास ७० टक्के पर्यटक असे खास पदार्थ विकत घेण्यासाठी वेगळं बजेटसुद्धा प्लॅन करतात. जास्त शेल्फ लाईफ असलेले पदार्थ विकत घेऊन, मायदेशी भेट म्हणून देण्याकडेही पर्यटकांचा कल वाढला आहे.

रस्त्याच्या कडेला उभ्या असणाऱ्या हातगाड्यांप्रमाणेच स्थानिक सुपरमार्केट किंवा लहान खाणावळींनाही पर्यटक आवर्जून भेट देत आहेत. 'बिल्डींग बघण्यापेक्षा बर्गर महत्त्वाचा' असा ट्रॅव्हल फंडा आहे. पॅरीसमध्ये जाऊन आयफेल टॉवर बघितला नाही तर काय बघितलं? हे मानणारी पिढी आता संपतेय्. एकूण जेन झी पर्यटकांपैकी ३८ टक्के, आयफेल टॉवर बघण्यापेक्षा, खास आणि अस्सल चवीचे फ्रेंच पदार्थ खायला प्राधान्य देतात. व्हायरल व्हिडीओज बघून त्या ठिकाणी पोहचलेले हे पर्यटक त्या स्नॅक्ससाठी अगदी रांगा लावून उभे राहतात.

महागडी हॉटेल्स आणि तिथलं जेवण पर्यटकांच्या पसंतीक्रमातून हद्दपार झालं आहे. दक्षिण आशियातील गल्लीबोळात '७ इलेव्हन' नावाची स्थानिक खाणावळ शोधत भटकणाऱ्या आणि दुबईच्या कुनाफाची चव सांगताना न थकणाऱ्या 'हिस्टेरिक' पर्यटकांचे व्हिडीओज एका क्लिकवर आहेत. पर्यटनाचे निमित्त आता निसर्गसौंदर्याची विहंगम दृश्ये नसून, देशी चवीचे पदार्थ झाले आहेत. सोशल मीडियावरील व्हायरल व्हिडीओजमुळे ही क्रेझ निर्माण झाल्याचं तज्ज्ञांचे मत असले, तरी पर्यटकांच्या मनापर्यंतचा मार्गही आता त्यांच्या पोटातून जातो, ही नवी संकल्पना मूळ धरत आहे. येणाऱ्या दशकात 'स्नॅक टुरिझम' हा ट्रॅव्हल इंडस्ट्रीचा ट्रेंड सेटर ठरणार आहे.

९८५०३३९२४०

## दखल

मोरेश्वर बडगे

# गृहमंत्र्यांच्या वक्तव्याचा अर्थ

देशाचे गृहमंत्री अमित शाह यांना 'चाणक्य' म्हणून देश ओळखतो. त्यांनी भाजपाचे काम देशभर वाढवले. शतप्रतिशत, पंचायत ते पार्लमेंट हा विषय त्यांनीच मांडला. भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष झाल्यानंतर त्यांनी घेतलेल्या परिश्रमातूनच भाजपा आज दिसतो त्या स्वरूपात उभा आहे. अमित शाह नुकतेच मुंबईत येऊन गेले. तेथे त्यांनी केलेल्या एक वक्तव्याची चर्चा आहे. 'चाणक्य'चे बोलणे-वागणे हलक्यात घ्यायचे नसते. तो बोलतो त्याच्या प्रत्येक शब्दाकडे गंभीरपणे बघायचे असते. पण समोरचा माणूस काहीही बोलला तरी त्याचा विपर्यास करून सांगणं ही अनेकांची हौस फिटत नसते. 'शिल्लक शिवसेने'चे अध्यक्ष उद्धव ठाकरे, त्यांचे हनुमान खासदार संजय राऊत हे त्यातलेच. प्रदेश भाजपाच्या मुंबईतल्या नव्या कार्यालय इमारतीच्या भूमिपूजनाला शाह आले होते. त्यावेळी केलेल्या भाषणात 'महाराष्ट्रात भाजपाला आता कोणत्याही कुबड्यांची गरज उरलेली नाही' असे वक्तव्य शाह यांनी केले. त्यांच्या या वक्तव्याचा काहींनी विपर्यास केला. उपमुख्यमंत्रिद्वय एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांना उद्देशून त्यांचे वक्तव्य होते का? अशी चर्चाही राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. त्यामुळे हा संभ्रम प्रथम दूर करणे आवश्यक आहे. 'कुबड्यांची गरज नाही' याचा अर्थ एकनाथ शिंदे किंवा अजितदादा यांची गरज उरली नाही, असा अजिबात नाही. शिंदे किंवा दादा हे कुबड्या नाहीत. तसे पाहिले तर भाजपाचे आज १३३ आमदार आहेत. आणखी १०-१२ जमवले तर सरकार चालवण्यासाठी पुरेसे आहेत. भाजपाला ते करायचे नाही. अजितदादांना सोबत घेणे भाजपामधल्या अनेकांना आवडले नाही. पण शरद पवारांची 'कुबडी' काढून घेण्यासाठी ते आवश्यक होते, हे 'चाणक्य'च ओळखू शकतो. उद्धव ठाकरे यांची मस्ती जिरवण्यासाठी एकनाथ शिंदेंचे राजकीय महत्त्व शाहच ओळखू शकतात. पण कुबड्या नकोत म्हणजे 'शिंदे-दादा आऊट' असा अर्थ सांगितला जात आहे. तसे वास्तव नाही, हे स्पष्ट केले पाहिजे. 'शिवसेनेची कुबडी घेऊन भाजपा उभा राहिला. शिवसेनेचं बोट पकडलं म्हणून भाजपा उभा होऊ शकला' असे उद्धव ठाकरे नित्यनियमाने सांगत असतात. ते वास्तव नाही. भाजपा आज जो दिसतो त्यामागे २०-२५ वर्षांची हजारो कार्यकर्ते-नेते यांची तपश्चर्या आहे. उद्धव ठाकरेंनी काय केले? पिताश्रींची स्वयंभू संघटना उद्धव यांनी पार पंगू करून टाकली. मुख्यमंत्री होण्याच्या हव्यासापोटी त्यांनी वडिलांच्या पक्षाचे मातेरे केले. काय मिळवले? अडीच वर्षांतच घरी बसावे लागले. राष्ट्रवादी आणि काँग्रेसची कुबडी घेतल्याशिवाय त्यांना आज चालता येत नाही. राज ठाकरे या २० वर्षांपूर्वी वेगळ्या झालेल्या आपल्या चुलत भावाला उद्धव जवळ करत आहेत. हीच ती मनसे आहे, जिच्यावर बोलताना, 'संपलेल्या पक्षाबद्दल आपण बोलत नाही' असे आदित्य ठाकरे म्हणाले होते. तरीही टेन्शन आहेच. भाऊ अजून तोंड उघडायला तयार नाही. युतीचं बोलत नाही. दुसरे म्हणजे राज यांना जवळ घेतले तर काँग्रेसची हुकमी मतं हातची जातील, मुस्लिम मतंही दूर जातील, हे उद्धव यांना मोठे टेन्शन आहे. १९८५ मध्ये स्वबळावर मुंबई महापालिका स्वबळावर जिंकणारी ठाकरेंची शिवसेना आज कुबड्यांच्या शोधात आहे. आपण लंगडे झालो आहोत, आपण का लंगडे झालो, आपल्याला कोणी लंगडे केले हे समजून घ्यायचे सोडून अमित शाह यांच्या वक्तव्याचा विपर्यास करायचा हट्ट उद्धव यांच्याकडून सोडवत नसेल तर हेच होणार.





उद्धव ठाकरे यांनी अमित शाह यांना 'ॲनाकोंडा' म्हटले. या नावाचा महाभयंकर साप आहे. तो समोरच्याला गिळून टाकतो. त्या हिशोबाने ठाकरेंनी शाहांना 'ॲनाकोंडा' म्हटले. पण भाजपाने किंवा अमित शाह यांनी कोणत्या पक्षाला गिळले, याचे एकही उदाहरण ठाकरे देऊ शकले नाहीत. कसे देतील? असेल तर देतील ना. १९८० मध्ये भाजपाने गुजरातमध्ये उठायला सुरुवात केली. गुजरातमध्ये कित्येक वर्षे भाजपाची सत्ता आहे. तिथे भाजपाने कोणाला गिळले? ११ वर्षांपासून भाजपाची देशावर सत्ता आहे. नरेंद्र मोदींनी कोणाला गिळले? भाजपाने गिळले असा एक पक्ष सांगा. जून २०२२ मध्ये हे होऊ शकलं असतं. एकनाथ शिंदे ४० आमदार घेऊन फुटले होते, त्यांना सहज खिशात टाकता आलं असतं, पण भाजपा त्या मोहात गेली नाही. गुजरातमध्ये नितीशकुमार यांचा जनता दल युनायटेड भाजपाला सहजपणे गिळता आला असता. पण भाजपा त्या भानगडीत पडला नाही. याउलट, काँग्रेसचा काय रेकॉर्ड आहे? काँग्रेसने अर्धा डझन पक्ष गिळले आहेत. हे सांगताना हरयाणाचे उदाहरण प्रामुख्याने दिले जाते. तेथे भजनलाल यांचा संपूर्ण पक्ष काँग्रेसने गिळंकृत केला होता. उद्धव ठाकरेंची अडचण वेगळी आहे, त्यांना जिंकायचं कसं? ते अजून कळलेले नाही. वडिलोपार्जित पक्ष होता. त्या पुण्याईवर तब्बल २५ वर्षे मुंबई ठाकरे कुटुंबाकडे राहिली. ती पुण्याई आता सरत आली आहे. उद्धव ठाकरे यांना तर मुळात राजकारण किती कळतं? हाच प्रश्न आहे. त्यांना जिंकायचं कळत नाही. मात्र पक्ष कसा संपवायचा? हे छान कळते. त्यासाठी जे जे करता येईल ते ते करण्याचा चंग उद्धव यांनी बांधला आहे, असे अलिकडच्या त्यांच्या वर्तनावरून ध्यानात येते.

महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाहीर झाल्या आहेत. कुठल्याही परिस्थितीत त्या येत्या ३१ जानेवारीपूर्वी उरकून घ्या, असा दम सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. त्या हिशोबाने निवडणूक आयोग कामाला लागला आहे. सारे राजकीय पक्षही तयारीला भिडले आहेत. त्यामुळेच सध्या राजकारण तापलेले दिसते. खरी हाणामारी महापालिका निवडणुकांमध्ये होईल. २७ महापालिकांच्या निवडणुका सर्वात शेवटी घेण्याचे ठरले आहे. त्या हिशोबाने महापालिकांच्या निवडणुकीला नववर्ष उजाडेल. महापालिकांमध्ये मुंबईची निवडणूक सर्वाधिक चुरशीची होईल. एकदम 'करो वा मरो.' ठाकरेसेनेचे प्राण मुंबईमध्ये आहेत. राज्यातली ही सर्वात श्रीमंत महापालिका गेली २५ वर्षे त्यांच्या ताब्यात होती. पुढेही ती राहावी यासाठी उद्धव यांनी कंबर कसली आहे. गेल्या निवडणुकीत शिवसेना अखंड होती. सरकारमध्ये हे दोघे युतीत असतानाही शिवसेना आणि भाजपा आमनेसामने लढले. शिवसेनेला ८४ ते भाजपाला ८२ जागा मिळाल्या. महापालिका ठाकरेंकडे गेली. यावेळी कुठल्याही परिस्थितीत मुंबई जिंकायचीच ह्या जिद्दीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस भिडले आहेत. महायुती विरुद्ध महाविकास आघाडी असा सामना अपेक्षित आहे. यावेळी राज ठाकरे यांना सोबत घेण्याची रणनीती उद्धव यांनी आखली आहे. पण काँग्रेसला राज ठाकरे चालतील का? त्यावर सारा खेळ आहे. १४ नोव्हेंबरला बिहारच्या निवडणुकीचा निकाल आहे. त्यानंतर काँग्रेस आपले पत्ते खुले करील. मुंबईच्या निवडणुकीत विरोधकांचे नेतृत्व मनसे सुप्रीमो राज ठाकरे यांनी हायजॅक केले आहे. 'मतदार याद्यांमधल्या त्रुटी दूर केल्याशिवाय निवडणूक होऊ देणार नाही' अशी घोषणा राज ठाकरेंनी मागेच केली आहे. मात्र किती विरोध पक्ष या मुद्यावर त्यांच्या पाठीशी राहतात हा प्रश्नच आहे. निवडणुकाच लढायच्या नाहीत हा मुद्दा विरोधी पक्षांच्या किती पचनी पडेल ते पाहायचे. निवडणूक न लढवणे राज ठाकरेंना परवडू शकते. इतरांना ही चैन मानवेल काय? विरोधी पक्ष राज यांच्या मागे फरफटत जातात काय? मुंबईच्या निवडणुकीत बरेच काही घडणार आणि बिघडणार आहे.

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

## विद्यामंदिर की भ्रष्टाचाराचा अड्डा?



नागपूर जिल्ह्यातील बारा शाळांनी तीन कोटींचे अनुदान घेऊन सरकारची फसवणूक केली. बालक मंदिर, शाळा, महाविद्यालये हे पवित्र विद्यामंदिर आहे. पूर्वी वर्गात प्रवेश करण्यापूर्वी पायातील चप्पल, बूट काढून नंतर वर्गात प्रवेश व्हायचा. या मंदिरातच खोटे बोलू नका, चोरी करू नका, वडील माणसाला मान द्या, हे जीवनाचे प्राथमिक शिक्षण मिळे. परंतु आता शिकवणारेच भ्रष्टाचारी झाले आहेत. बहुतेक ठिकाणी लाच घेऊन प्रवेश देतात. त्यामुळे गरीब मुलांचे नुकसान होते. हे शिक्षणाच्या बाबतीत उदासीन असतात. नीट, यूजीसीच्या परीक्षेत एक कोटी रुपयांपर्यंत पैसे घेऊन गुण वाढविल्याचे ऐकले होते. बुद्धीपेक्षा पैसा श्रेष्ठ झाला आहे. नीतिमत्ता शिकविणारे अनीतीने वागतात. मग मुलांना योग्य शिक्षण, संस्कार कुठे मिळणार? विद्या क्षेत्रात तरी भ्रष्टाचाराला स्थान नको. ज्यांनी भ्रष्टाचार केला त्यांचे नाव जाहीर करावे, त्यांची संपत्ती सरकारजमा करावी, त्यांना तुरुंगात टाकावे. तेथे श्रीमंत, प्रतिष्ठित वगैरे बघू नये.

**निर्मला गांधी**/९११२२७५२८४

## वाचक पत्रे

### आवळा नवमीचे महत्त्व

आपली भारतीय संस्कृती ही निसर्गाशी घट्ट जोडलेली आहे. हिंदू धर्मात निसर्गाला देवत्व दिलं गेलं आहे. झाडं, नद्या, पर्वत, प्राणी, सूर्य, चंद्र या सगळ्यात देवाचं दर्शन घडतं. अशाच निसर्गाशी निगडित सणांपैकी एक म्हणजे आवळा नवमी, जी ऑक्टोबर महिन्यातील कार्तिक शुक्ल नवमी या दिवशी साजरी केली जाते. या दिवसाला कुष्मांड नवमी असेही म्हणतात. 'आवळा म्हणजे पृथ्वीवरील अमृत!' असे आयुर्वेदात म्हटले जाते. तो शारीरिक, मानसिक त्रास दूर करणारा आहे; म्हणूनच त्याला 'औषधांचा राजा' म्हणतात. थंडीच्या दिवसांत आवळ्याचे सेवन केल्याने रोगप्रतिकारकशक्ती वाढते. आयुर्वेदाच्या तत्त्वानुसार आवळा पित्त, बद्धकोष्ठता, त्वचारोग, केस गळणे, अकाली केस पिकणे आणि जीवनसत्त्व 'सी'ची कमतरता या सर्वांवर रामबाण उपाय आहे. आमला एकादशीच्या दिवशी भगवान श्रीविष्णूला आवळा अर्पण करतात आणि तुळशी विवाहातही आवळ्याचा वापर करतात. कारण आवळ्यात विष्णुतत्त्व मुबलक प्रमाणात असते. आवळा पूजनाची पौराणिक कथा आहे. एकदा देवी लक्ष्मी पृथ्वीवर भ्रमण करत असताना त्यांनी भगवान विष्णू आणि भगवान शिव या दोघांची एकत्र पूजा करण्याची इच्छा व्यक्त केली. ते कसे शक्य आहे, असा विचार करताना त्यांना लक्षात आले की तुळशी (विष्णूला प्रिय) आणि बेलपत्र (शिवाला प्रिय) या दोन्हींचे गुणधर्म आवळ्याच्या झाडात एकत्र आढळतात. म्हणून देवी लक्ष्मीने आवळ्याच्या झाडाची पूजा केली. या पूजेमुळे भगवान विष्णू आणि भगवान शिव दोघेही प्रसन्न होऊन प्रकट झाले. देवी लक्ष्मीने आवळ्याच्या झाडाखाली त्यांना अन्न अर्पण केले. त्या दिवसापासून म्हणजेच कार्तिक शुक्ल नवमीपासून आवळ्याची पूजा करण्याची परंपरा सुरू झाली. आवळा नवमी पूजेचा विधी असा आहे. या दिवशी सकाळी स्नान करून व्रताचा संकल्प करावा. त्यानंतर आवळ्याच्या झाडाखाली पूर्वाभिमुख बसून 'ॐ धात्र्यै नमः' हा मंत्र म्हणावा. झाडाच्या मुळाशी दूध, पाणी, फुले, अक्षता अर्पण करून कापूर आणि तुपाचा दिवा लावावा. आरती करून झाडाला पिवळा धागा बांधत प्रदक्षिणा घालावी. गोड पदार्थाचा नैवेद्य दाखवतात, काही ठिकाणी झाडाच्या सावलीत ब्राह्मण भोजन दिले जाते. आवळा नवमी हा केवळ एक धार्मिक सण नाही, तर तो निसर्ग, आरोग्य आणि अध्यात्म यांचा सुंदर संगम आहे.



**रमा देशमुख**/नागपूर

## आजचे संघगीत-२८

शुक्रवार, ३१ ऑक्टोबर २०२५

### मी युग नव निर्मीन

मी युग नव निर्मीन मी युग नव निर्मीन ॥धृ.॥

रुखल्या सुखल्या भूमीवरती सद्भावाने करुनी वसती
संस्कारांचे जल सिंचुनिया सोनमळे पिकवीन ॥१॥

शांत सागरा जवळी जाउन वडवाग्नीची ओळख सांगुन
सत्कार्याच्या प्रचंड लाटा उसळत मी ठेवीन ॥२॥

येता कल्पांताची चाहुल, जन होती भयकंपित व्याकुळ
जनशक्तीला जागृत करुनी गोवर्धन उचलीन ॥३॥

कोटि कोटि मम बाहू उभवुन नभ कोसळते अलगद झेलुन
विश्वासाचे उषः किरण दिग् दिगंतरी उधळीन ॥४॥

ज्या एका स्वप्नाचा औरस भारतीय मी म्हणुनी
वारस पुनः जगाच्या जीवनात साक्षात्कार बघेन ॥५॥

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त पोलिस दलाच्यावतीने रन फॉर युनिटी मॅरेथॉनला उत्स्फूर्त प्रतिसाद







**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३१ आक्टोबर**

देशाचे माजी गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंती निमित्त रन फॉर युनिटीचे आयोजन पोलिस दलाच्यावतीने करण्यात आले होते. या एकता दौडला भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी हिरवी झेंडी दाखवली.

लोहपुरूष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त दि ३१ आक्टोबर रोजी पोलिस दलाच्यावतीने एकता दौडचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे, जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, समादेशक संजय तिडके, सहायक समादेशक रामकृष्ण दामनवाड, पोलिस उपअधीक्षक दत्ता केंद्रे, पोनि श्यामकुमार डोंगरे, दिलीप मोरे, भाजपचे जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, पोनि मोहन भोसले, पोनि अशोक मोदे यांच्यासह पोलिस अधिकारी उपस्थित होते.

सरदार वल्लभ भाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय एकता दिवस साजरा करण्यात आला. एकता दौड छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून पोस्ट ऑफीस रोड, जवाहर रोड, गांधी चौक, इंदिरा गांधी चौक, मार्गे संत नामदेव पोलिस कवायत मैदानावर संपन्न करण्यात आली. या दौडमध्ये सामान्य नागरिक, युवक-युवती, पोलिस अंमलदार, अधिकारी तसेच पोलिस भरतीची तयारी करणारे युवक-युवती आणि धावपटूंनी मोठ्या उत्साहात सहभाग घेतला होता. एकता दौडमध्ये महिला गटात प्रथम पार्वती डाखोरे, द्वितीय अनुराधा जगताप, तृतीय निकीता शिंदे तर पुरूष गटात प्रथम सतीश चव्हाण, द्वितीय संतोष लाखाडे, तृतीय शेख रजीक इसराईल यांनी विजय मिळवला. यावेळी विजेत्यांना जिल्हाधिकारी राहुल गुप्ता आणि पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्याहस्ते प्रमाणपत्र आणि सन्मानचिन्हत वितरीत करण्यात आले. सरदार वल्लभभाई पटेल यांची वेशभूषा साकारणाऱ्या राम नागरे यांचाही सत्कार मान्यवरांच्याहस्ते करण्यात आला. यावेळी स्पर्धकांना अल्पोपहार देण्यात आला. यावेळी पोनि श्यामकुमार डोंगरे, दिलीप मोरे, भाजपचे जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, पोनि मोहन भोसले, पोनि अशोक मोदे, उपनि माधव जिव्हारे, सपोनि शिवसांब घेवारे, उपनि विक्रम विठुबोने, नागेश पवार, बाबुराव जाधव यांच्यासह राज्य राखीव दलाचे जवान, पोलिस दलातील जवान तसेच स्पर्धकांची उपस्थिती होती. ही एकता दौड यशस्वी करण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक मोहन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली उपनि दिलीप मोरे यांनी परिश्रम घेतले.

## उमेदवारांनी कुठल्याही आमिषाला बळी पडू नये- कोकाटे

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३१ आक्टोबर**



पोलिस भरतीसाठी अनेक युवक-युवती जीवापाड मेहनत घेत आहेत. त्यांच्या क्षमतेनुसारच त्यांची निवड ही होत असते. त्यामुळे भरती प्रशिक्षण देणाऱ्या प्रशिक्षक आणि उमेदवारांनी कुठल्याही आमिषाला बळी पडू नये असे आवाहन पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी केले.

येथील संत नामदेव पोलिस कवायत मैदानावर सरदार वल्लभ भाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय एकता दौडचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलतांना पोलिस अधीक्षक कोकाटे म्हणाले की, आपण देशाची अखंडता आणि एकता मजबुत केली पाहीजे. लोकशाही बळकट करण्यासाठी सर्व नागरिकांनी प्रयत्न केले पाहीजे, लोकशाहीचे पालन करीत मुल्ये जपली पाहीजेत. या एकता दौडमध्ये मोठ्या संख्येने पोलिस भरतीचे प्रशिक्षण घेणारे युवक-युवती तसेच त्यांचे प्रशिक्षक सहभागी झाले आहेत. त्यांचे आभार मानीत त्यांनी आगामी काळात पोलिस भरती होणार आहे. ही भरती पारदर्शक आणि तांत्रिक पध्दतीने होणार आहे. त्यामुळे प्रशिक्षक किंवा उमेदवारांनी कुठल्याही आमिषाला बळी न पडता कठोर परिश्रम करीत यश संपादन करावे. यापूर्वी चुकीच्या पध्दतीने भरती झालेल्यांवर गुन्हे दाखल झाले आहेत. कुणी आमिष दाखवत असेल तर लाचलुचपत प्रतिबंधक विभाग आणि पोलिस विभागाला त्याची तत्काळ माहीती देण्याचे आवाहनही कोकाटे यांनी केले.



**हिंगोली- नर्सी फाटा ते सावरखेडा राष्ट्रीय महामार्गापर्यंत शहरातून जाणाऱ्या रस्त्याच्या चौपदरीकरणासाठी तसेच कयाधू नदीवरील पूल, खटकाळी कडील रेल्वे उड्डाणपूलासाठी आ. तान्हाजीराव मुटकुळे यांच्या प्रयत्नामुळे २५१ कोटी रूपयांचा निधी मंजूर झाला. त्याबद्दल आ. मुटकुळे यांचा सत्कार करतांना बळसोंडचे सरपंच शैलेश जयस्वाल, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, शरद जयस्वाल आदी. छाया- विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### मदरशांना अनुदानासाठी १४ नोव्हेंबरपर्यंत मुदत

हिंगोली- डॉ.झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजनेंतर्गत सन २०२५-२६ या वर्षात नोंदणीकृत निवासी मदरशांचे नवीन प्रस्ताव सादर करावेत. अल्पसंख्यांक विकास विभागाच्या दि. २२ डिसेंबर, २०२३ च्या शासन निर्णयानुसार धर्मादाय आयुक्त अथवा वक्फ बोर्डाकडे नोंदणी असलेल्या निवासी मदरशांना १० लाख रुपयांच्या मर्यादेत अनुदान अनुज्ञेय करण्यात आले आहेत. तसेच दि. २१ ऑगस्ट, २०२४ च्या शासन निर्णयानुसार पायाभूत सोयीसुविधांमध्ये वाढ करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना सन २०२५-२६ या वर्षात अनुदान प्राप्त करण्यासाठी इच्छूक मदरशांना दि. ११ जुलै, २०१८ च्या शासन पत्रानुसार व दि. ११ ऑक्टोबर, २०२३ च्या शासन निर्णयानुसार विहित केलेली योजनेची कार्यपध्दती, पात्रता, अटी व शर्ती कायम राहतील. दि. २१ ऑगस्ट, २०२४ च्या शासन निर्णयात नमूद १२ पायाभूत सोयी-सुविधांसाठी अनुदान प्राप्त करण्यासाठी इच्छूक मदरशांनी दि. ११ ऑक्टोबर, २०१३ च्या शासन निर्णयातील विहित नमुन्यातील परिशिष्ट-अ व प्रपत्र १ ते ५ मध्ये माहिती संगणकीकृत करुन आवश्यक त्या कागदपत्रासह सविस्तर प्रस्ताव जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली येथे दि. १४ नोव्हेंबर, २०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावेत. यानंतर प्राप्त होणारे प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत, असे जिल्हा अल्पसंख्यांक अधिकारी तथा जिल्हा नियोजन अधिकारी, हिंगोली यांनी कळविले आहे.

### कोनाथा येथे अखंड हरिनाम सप्ताह



वसमत- श्री ओमकारनाथ संस्थान कोनाथा येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे दिनांक ३, सोमवार पासून सुरुवात होणार आहे. ओमकारनाथ संस्थान मंदिरामध्ये ब्राह्मणाच्या हस्ते देवाची महापूजा करून सप्ताहाला सुरुवात करण्यात येणार आहे. अकरा ब्राह्मणाच्या हस्ते देवाची महापूजा करून येजेमानाच्या हस्ते महाआरती होणार आहे. दैनंदिन कार्यक्रम दररोज सात दिवस कीर्तन दि ३, सोमवार ह भ प ज्ञानेश्वर महाराज व दि ४ मंगळवार ह भ प माऊली महाराज यांचे होईल दि पाच ह भ प नंदकिशोर महाराज यांचे होईल दि ६, गुरुवार ह भ प सोपान महाराज मोरे दि सात, शुक्रवार ह भ प प्रभाकर महाराज यांचे होईल दि ८, शनिवार ह भ प त्र्यंबक महाराज यांचे होईल दि नऊ रविवार ह भ प शिवाजी महाराज यांचे काल्याचे किर्तन सकाळी ११ ते एक या वेळेस होईल नंतर महाप्रसाद होईल. देवाची भव्य मिरवणूक गावांमध्ये निघणार आहे. या कार्यक्रमाचा व अखंड हरिनाम सप्ताह वसमत तालुक्यातील भक्तांनी व पंचक्रोशीतील भक्त मंडळींनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन देवस्थानच्या वतीने करण्यात आले आहे. सकाळी ११ ते २ या वेळेस देवाचे रुद्र अभिषेक तीन वाजता देवाची महाआरती नंतर महाप्रसाद व सहा ते आठ हरिपाठ आठ ते दहा किर्तन नंतर हरी जागरण करण्यात येईल.

## श्रीमद् भागवत कथा ज्ञान यज्ञ आयोजनासंदर्भात हिंगोलीत बैठक



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३१ आक्टोबर**

आंतरराष्ट्रीय कथाकार, परमपूज्य भाई श्री रमेश भाई ओझा यांनी कथन केलेली ही कथा श्री गजराज बाल गणेश मंडळाने आयोजित केली आहे. हा कथा ज्ञान यज्ञ १९ मार्च ते २५ मार्च दरम्यान, चैत्र महिन्यात हिंदू नववर्ष, गुढी पाडव्याच्या निमित्ताने आयोजित केला जाईल. या भव्य कार्यक्रमाच्या तयारीसाठी ३० ऑक्टोबर रोजी सर्व भाविकांची बैठक आयोजित करण्यात आली होती. पोस्ट ऑफिस रोडवरील तुलसी मानस मंडळ सभागृहात झालेल्या या बैठकीची सुरुवात भगवान श्री राम आणि हनुमान यांच्या आरतीने झाली. त्यानंतर, भगवद् कथेच्या आयोजनाबाबत सखोल चर्चा झाली आणि सर्वांच्या सूचना ऐकण्यात आल्या. शहरातील कार्यक्रमासाठी योग्य ठिकाणी चर्चा करण्यात आली, तसेच मुख्य यजमान आणि तीन दैनंदिन यजमान आणि त्यांची बसण्याची व्यवस्था, भाविकांसाठी बसण्याची व्यवस्था, प्रसाद, महाप्रसाद वाटप इत्यादींबाबत सूचना मागवण्यात आल्या. बैठकीत मुख्य आयोजक श्री गजराज बाल गणेश मंडळासह तुलसी मानस मंडळ, श्री वैष्णव नवदुर्गा मंडळ, विशाल व्यायाम शाळा इत्यादींचे सदस्य उपस्थित होते. आयोजक गजराज बाल गणेश मंडळाने सर्व शहरवासीयांना या भव्य श्रीमद् भागवत कथेत उत्साहाने सहभागी होण्याचे आवाहन केले.

## जिल्ह्यातील अवैध धंद्याविरोधात हिंगोली पोलिसांची विशेष मोहीम

### ७ लाख ६७ हजारांचा मुद्देमाल केला जप्त

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३१ आक्टोबर**



जिल्ह्यामध्ये अवैध दारू गाळप-विक्री, मटका, जुगार, गुटखा/कोटपा विरोधात पोलिस दलाने विशेष मोहीम राबवीत ५५ ठिकाणी छापे मारून ५५ जणांविरूध्द गुन्हे दाखल करीत ७ लाख ६७ हजार ३३० रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात अवैध धंद्याविरोधात पोलिसांनी विशेष मोहीम राबवली आहे. यामध्ये जिल्ह्यातील सर्व उपविभागीय पोलिस अधिकारी, स्थानिक गुन्हे शाखा तसेच १३ पोलिस ठाण्यांचे प्रभारी पोलिस अधिकारी, दुय्यम अधिकारी असे ४५ अधिकारी आणि १०२ अंमलदार यांचा समावेश होता.

पोलिसांनी जिल्ह्यातील अवैध हातभट्टीचे गाळप व विक्री करणाऱ्या ठिकाणी कार्यवाही करून सदर ठिकाणचे हातभट्टीसाठीचे लागणारे रसायन व इतर साहित्य नष्ट करून प्रभारी कार्यवाही केली. सदर मोहीमेत हातभट्टी दारू एकूण १३ लिटर तसेच सदर मोहीमेत अवैध देशीदारू विक्रीच्या ४३ ठिकाणी ६८२ देशी दारू बॉटल जप्त करून कार्यवाही केली आहे. तसेच मटका व जुगार विरूध्द ४ ठिकाणी कार्यवाही करून ५४५० रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून गुटखा/कोटपा प्रमाणे ७ ठिकाणी कार्यवाही करून ५२१० रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. जिल्ह्यातील पोलिस ठाण्यांतर्गत एकूण ५५ आरोपी विरोधात गुन्हे दाखल करण्यात आले असून ७ लाख ६७ हजार ३३० रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

## आदर्शमध्ये सरदार वल्लभभाई पटेल जयंती

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३१ आक्टोबर**



येथील आदर्श महाविद्यालयातलोहपुरुष सरदार वल्लभाई पटेल यांची जयंती व आयर्न लेडी माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली.

याप्रसंगी आदर्श शिक्षण संस्थेचे अध्यक्ष कमलकिशोर काबरा यांनी सरदार वल्लभभाई पटेल व माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी प्राचार्य प्रो. डॉ.विलास आघाव, प्राचार्य डॉ.किशोर गंगाखेडकर प्रतिभा निकेतन महाविद्यालय नांदेड, प्रो.डॉ.बी एस सुरवसे संचालक स्कूल ऑफ लाइफ सायन्स स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड, प्रो.डॉ. श्रीनिवास केशेट्टी शिवाजी महाविद्यालय परभणी, प्रो. डॉ.साहेबराव शिंदे यशवंत महाविद्यालय नांदेड, प्रो. डॉ.देविदास केंद्रे ग्रामीण महाविद्यालय वसंत नगर मुखेड, प्रो.डॉ.स्वामी दयानंद महाविद्यालय लातूर, उपप्राचार्य डॉ. प्रा.सुरेंद्र शाहू कार्यालयीन अधीक्षक दिलीप दुबे, स्टाफ सचिव डॉ. सचिन हटकर, प्रा. मेजर पंढरीनाथ घुगे, विलास पवार, प्रा. गजानन चव्हाण, डॉ. सोनलकुमार नगरकर, डॉ. सत्यजित चव्हाण, विजय पाठक, बालाजी घुगे, प्रवीण दुबे आदी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

सरदार वल्लभभाई पटेल हे भारताचे लोहपुरुष म्हणून ओळखले जातात. सरदार वल्लभभाई पटेल हे देशाच्या एकीकरणाचे शिल्पकार होते. त्यांनी संस्थानांचे विलिनीकरण करून अखंड भारताची पायाभरणी केली. तसेच माजी पंतप्रधान इंदिरा गांधी ह्या भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान, दृढनिश्चयी व दूरदर्शी नेत्या होत्या. त्यांच्या कार्यकाळात देशाने अणुशक्ती संपादन केली आणि हरित क्रांतीचा पाया घातला.दोन्ही विभूती यांच्या विषयीचा संक्षिप्त कार्याचा आढावा याप्रसंगी डॉ. सचिन हटकर यांनी घेतला व विनम्र अभिवादन केले. याप्रसंगी आदर्श महाविद्यालयाचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## श्याम बाबा मंदिराचे थाटात भूमीपूजन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३१ आक्टोबर**

कारवाडी अंतर्गत गंगा नगर भागातील राणीसती मंदिरात शनिवारी श्याम बाबा मंदिराच्या बांधकामाचे भूमीपूजन थाटात करण्यात आले

यावेळी आ. संतोष बांगर, रामचंद्र कयाल, रमेशंचद्र बगडीया, भाजपचे जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, श्रीराम बांगर, राम कदम यांच्यासह मोठ्या संख्येने व्यापारी तसेच भाविक उपस्थित होते. लवकरच शाम बाबा मंदिराची भव्य वास्तू बांधकामाला सुरूवात होणार असून यासाठी भाविकांनी तन मन धनाने मदत करण्याचे आवाहन समितीच्यावतीने करण्यात आले आहे.

www.tarunbharat.net
तरुण भारत
# कृषी
शनिवार, दि. ०१ नोव्हेंबर २०२५
६

**पेरणी करताना घ्यावयाची काळजी**

- पेरणीसाठी जमिनीची योग्य मशागत केलेली असावी.
- यंत्र चालवण्यासाठी कुशल चालकाची निवड करावी.
- पेरणी करताना यंत्राचा वेग मध्यम ठेवावा.
- पेरणी करताना समप्रमाणात बियाणे व खते पढताय काय याची दक्षत घ्यावी.
- पेरणी करताना या यत्रास इतर कुठली यत्रना जोडू नये.
- पेरणीपूर्वी यंत्र शेतात नेऊन कॅलीब्रेशन करावे.

# बी.बी.एफ. पद्धतीने हरभऱ्याची पेरणी

**कृषी तंत्रज्ञान**

हरभरा हे रबी हंगामातील एक महत्त्वाचे डाळवर्गीय पीक असून, महाराष्ट्रात नाशिक, जलगाव, पुणे, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, परभणी तसेच विदर्भात प्रामुख्याने हरभरा पिकाची पेरणी सर्वांत जास्त क्षेत्रात केली जाते. अपेक्षित पर्जन्यमानानुसार पश्चिम महाराष्ट्र तसेच मराठवाड्यात देखील या पिकाखालील बागायती क्षेत्रासोबतच कोरडवाहू क्षेत्रातही दरवर्षी वाढ होत असल्याच दिसून येत आहे. वर्ष २०२३-२४ च्या सांख्यिकीय आकडेवारीचे अवलोकन केले असता, राज्यात हरभरा पिकाखाली २६.८७ लाख हे क्षेत्राची नोंद झाली असून, उत्पादन २८.३५ लाख टन, तर उत्पादकता १०५५ किलो प्रती हेक्टर असल्याचे दिसून येते.

**बी.बी.एफ. पेरणी पद्धत म्हणजे काय?**


केंद्रीय कोरडवाहू शेती संशोधन संस्था, हैदराबाद यांनी बीबीएफ (ब्रॉड बेड फरो म्हणजे रुंद वरंबा सरी) यंत्र विकसित केले आहे. हे ट्रॅक्टरचलित पेरणी यंत्र असून, रुंद वरंबे व सऱ्या पाडणे, पेरणी आणि खते देणे अशी तिन्ही कामे एकाच वेळी केली जातात. यात दोन फाळ आणि पेरणीचे फण यातील अंतर गरजेनुसार कमी जास्त करता येते तसेच सऱ्यांची रुंदीही कमी जास्त करता येते.

कोरडवाहू शेतीत जलसंधारणाच्या दृष्टीने बीबीएफ पद्धत अतिशय उपयुक्त आहे तसेच अधिक व सततच्या पावसात अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याच्या दृष्टीने बीबीएफ पद्धत उपयोगी आहे. या पद्धतीमुळे सर्वसाधारणपणे २० ते २७ टक्क्यांपर्यंत जलसंधारण, तर २५ टक्के उत्पादनात वाढ दिसून येते.



**बीबीएफ यंत्रा बद्दल माहिती**

- केंद्रीय कोरडवाहू शेती संशोधन संस्था, हैदराबादने बीबीएफ यंत्र विकसित केले आहे.
- या यंत्रासोबत बियाणे, खतपेटी विविध कप्प्यासह उपलब्ध असते.
- या यंत्रात २ फाळा, ४ छोटी पेरणीचे फण, खोली नियंत्रण करणारी २ चाके तसेच गती देणारे चाक असे विविध भाग आहे.
- हे यंत्र चालविण्यासाठी ३५ ते ४५ ते ५० अश्वशक्तीचा ट्रॅक्टर पुरेसा ठरतो.
- बीबीएफ यंत्राची लांबी २२५० मि.मी., रुंदी ११३३ मि.मी., तर उंची साधारण ८६८ मि.मी. आहे. त्याची चौकट २२५० मि.मी. लांबीची, ४८० मि.मी. रुंदीची असून, वजन २८५ किलो इतके असते.




रुंद वरंबा सरी यंत्र

**रुंद वरंबा सरी पद्धतीचे फायदे**


- पावसाचे पाणी सऱ्यामध्ये मुरते, त्यामुळे मूलस्थानी जलसंवर्धन होते. कोरडवाहू शेतीत पावसाच्या दीर्घकालीन खंड काळात याचा लाभ होतो.
- आंतरपीक पद्धतीचा अवलंब करून अधिकचे उत्पन्न घेता येते.
- बीबीएफ पद्धतीने शेती निविष्ठा खर्चात (बियाणे, खते इ.)२० टक्के बचत होते.
- खत व बियाणे एकाच वेळी पेरल्यामुळे खताचा कार्यक्षम वापर होतो.
- उत्पन्नात २० ते २५ टक्के वाढ दिसून येते.
- वरंब्यावर ओलावा टिकवून ठेवला जात असल्याने पर्जन्यामान खंडाच्या कालावधीत सुद्धा पाण्याचा ताणाची तीव्रता कमी होते.
- जास्त पर्जन्यमान झाल्यास या पद्धतीमधील सरीमधून अतिरिक्त पाणी वाहून जाण्यास मदत होते.
- पिकास मुबलक हवा सूर्यप्रकाश मिळाल्याने पिकाची जोमदार वाढ होऊन पीक कीड रोगास बळी पडत नाही.
- पिकात आंतर मशागत करणे उभ्या पिकांस सरीमधून ट्रॅक्टर/मनुष्य चलीत फवारणी यंत्राव्दारे कीटकनाशक आणि तननाशके फवारणे शक्य होते.
- या पद्धतीचा अवलंब केल्याने जमिनीची धूप कमी प्रमाणात होऊन सेंद्रीय कर्बाचा ऱ्हास थांबल्याने जमिनीची जलधारण क्षमता वाढते.
- या पद्धतीमुळे जमिनीची सच्छिद्रता वाढून जमीन भुसभुशीत होते. परिणामी पिकाची वाढ उत्तम होते.
- तण नियंत्रण व आतरमशागतीच्या दृष्टीने ट्रॅक्टरचलित बीबीएफ यंत्राचा वापर करता येतो. यात पेरणीचे फण काढून तेथे आतरमशागत आणि तण नियंत्रणासाठी, व्ही आकाराची पास बसविता येते तसेच सरीमध्ये रिजर ठेवून आंतर मशागत होते.

**हरभरा लागवडीच्या पद्धती :**

**१. चार ओळी (३० सें.मी.)** : यात तयार केलेल्या एका वरंब्यावर हरभऱ्याच्या चार ओळी ३० सें. मी. अंतराने घ्यायचे असल्यास, सरी घेण्यासाठी फाळामधील अंतर १५० सें.मी. म्हणजे १.५ मीटर ठेवावे लागेल. ट्रक्टरचलीत बीबीएफ यंत्र फाळाचा मध्य खुणेवर घेऊन चालकाने चालवावे. यामुळे १२० सें.मी. रुंद वरंबा तयार होते. अशाप्रकारे हरभरा पिकाच्या ४ ओळी ३० सें.मी. अंतराने बसतात आणि याचवेळी दोन्ही बाजूच्या सरी ३० सें.मी. रुंदीच्या पडतात.



रुंद वरंबा सरी पद्धतीने हरभरा पिकांची लागवड (४ ओळी)



रुंद वरंबा सरी पद्धतीने हरभरा पिकांची लागवड (३ ओळी)

**२. तीन ओळी (३० सें.मी.)** : एका वरंब्यावर ३० सें.मी. अंतरावर हरभरा पिकाच्या ३ ओळी घेत असताना, ९० सें.मी. रुंदीचा वरंबा तयार करावा लागतो. त्यात जमिनीच्या प्रकारानुसार दोन्ही बाजूच्या सरी ३० सें.मी. रुंदीच्या मिळू शकतात. त्यासाठी फाळातील अंतर १२० सें.मी. ठेवून बीबीएफ यंत्र (फाळांच्या मध्य खुणेवर ठेऊन) चालवावे लागते.

यावेळी सरीच्या फाळामुळे तयार होणाऱ्या दोन्ही बाजूंच्या सरी या गरजेनुसार ३० सें.मी. किंवा कमी जास्त रुंदीच्या मिळू शकतात.

**३. तीन ओळी (४५ सें.मी.)** : एका वरंब्यावर ४५ सें.मी. अंतरावर हरभरा पिकाच्या ३ ओळी घ्यावयाच्या असल्यास, त्यासाठी १३५ सें.मी. रुंदीचा वरंबा तयार करतात. त्यासाठी दोन फाळामधील अंतर १८० सें.मी. ठेवून बीबीएफ यंत्र फाळाच्या मध्य खुणेवर घेऊन चालवावे. यावेळी दोन्ही बाजूच्या सरी या ४५ सें.मी. रुंदीच्या पडतात त्यांची रुंदी कमी जास्त करता येते.

● **कुणाल एन. गावंडे**
सहा. प्राध्यापक, कृषी विद्या, श्री सं शं. म. कृषी महाविद्यालय, पिंपळखुटा, ता. धामणगाव (रे), जि. अमरावती

● **निखिल रमेश यादव**
एमएससी ॲग्री, डॉ. पंदेकृवी अकोला.

# मक्यावरील लष्करी अळीचे एकात्मिक व्यवस्थापन

**कीड व्यवस्थापन**

धान आणि गहू पिकानंतर मका हे भारतातील तिसऱ्या क्रमांकाचे महत्त्वाचे धान्य पीक आहे. १९५० नंतर मक्याचे उत्पादन सुमारे १६ टक्क्यांनी वाढले असून, २०२५-२६ मध्ये त्याचे क्षेत्रफळ ९४.६२ लाख हेक्टरपर्यंत पोहोचले आहे. संकरित वाण आणि आधुनिक तंत्रज्ञानामुळे उत्पादनात सातत्याने वाढ होत आहे. मका पिकाचा वापर जनावरांचा चारा, कुक्कुट आहार, पशुखाद्य, इथेनॉल, स्टार्च आणि प्लॅस्टिक उद्योगासाठी होत असल्याने त्याचे आर्थिक महत्त्व वाढत आहे.

अलिकडच्या काही वर्षांत महाराष्ट्रासह देशाच्या विविध भागांमध्ये लष्करी अळी या किडीचा प्रादुर्भाव वाढलेला दिसून येतो. ही अळी मक्याबरोबरच ज्वारी, ऊस, कपाशी, भुईमूग, बटाटा आणि गहू यासह ८० हून अधिक पिकांवर उपजीविका करते. या किडीमुळे ३० ते ६० टक्क्यांपर्यंत उत्पादनात घट येऊ शकते. त्यामुळे तिचे एकात्मिक व्यवस्थापन अत्यावश्यक आहे.



**किडीची ओळख**

या किडीचा जीवनक्रम चार टप्प्यांचा असतो. अंडी, अळी, कोष आणि पतंग.

- **पतंग** : करड्या-तपकिरी रंगाचा, पंखांवर पांढरे ठिपके असतात. एका रात्रीत तो सुमारे १०० किमी उडू शकतो. मादी पतंग १००० ते १५०० अंडी घालते.
- **अंडी** : १०० ते २०० अंड्यांचे पुंजके केसाळ आवरणाने झाकलेले असतात. अंडी अवस्था २-३ दिवसांची असते.
- **अळी** : सहा अवस्थांची असते. लांबी ३ ते ४ सें.मी. असते. पाठीवर पिवळसर तीन रेषा व डोक्यावर इंग्रजी ध आकाराची खूण दिसते. अळी अवस्था १४-३० दिवसांची असते.
- **कोष** : लालसर तपकिरी रंगाचा, ८-१० दिवसांत पतंग बाहेर पडतो.

**नुकसानाची लक्षणे**

सुरुवातीच्या अवस्थेत अळी पानांचा हिरवा भाग खरडून खाते, ज्यामुळे पांढरे चट्टे दिसतात. पुढील अवस्थेत पानांवर छिद्रे पडतात आणि पोंग्यात शिरून आतील भाग खाते. नंतरच्या अवस्थेत अळी कणसातील दाण्यावर उपजीविका करते.

**निरीक्षण व आर्थिक नुकसान पातळी**

शेतात इंग्रजी डब्ल्यू आकारात दररोज निरीक्षण करावे. प्रत्येक ओळीतून ५ झाडे निवडून २० झाडांचे निरीक्षण घ्यावे. त्यापैकी २ झाडांवर प्रादुर्भाव असल्यास १० टक्के नुकसान पातळी समजावी.

**एकात्मिक कीड व्यवस्थापन**

- **मशागत पद्धत** : पिकाचे अवशेष नष्ट करून उन्हाळ्यात खोल नांगरणी करावी. फेरपालट पिके (भुईमूग, सूर्यफूल, तूर, उडीद) घ्यावी.
- वेळेवर आणि एकाच वेळी पेरणी करावी.
- सापळा पीक म्हणून नेपियर गवत लावावे.
- संतुलित खतांचा वापर करावा.

**यांत्रिक पद्धत :**

- पेरणीनंतर एकरी १० पक्षी थांबे व ५ कामगंध सापळे लावावे.
- अंडी आणि अळ्या हाताने नष्ट कराव्या.

**भौतिक पद्धत :**

- पिकाच्या ३० दिवसानंतर राख/चुना वाळूच्या मिश्रणासह (९:१) पोंग्यात टाकावे.

**जैविक पद्धत :**

- परभक्षी व परोपजीवी कीटक जसे ट्रायकोग्रामा, टिलोनेमस, कॅम्पोलेटीस यांचे ४०-५० हजार अंडी प्रती एकर दोन वेळा सोडावेत.
- निंबोळी अर्क ५ टक्के किंवा ॲझाडीरॅक्टीन (१५०० पीपीएम) ५ मिली प्रतिलिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.
- बिवेरीया बॅसियाना (ब्रिगेड-बी/ब्रीग बॉस) ५ ग्रॅम/५ मिली प्रतिलिटर पाण्यात मिसळून वापरावे.

**रासायनिक पद्धत :**

- बीजप्रक्रियेसाठी सायॲट्रानिप्रोल (१९.८ टक्के) + थायमेथोक्झाम (१९.८ टक्के एफएस) ६ मिली/किलो बियाणे वापरावे.
- प्रादुर्भाव दिसल्यास स्पीनेटोरम (११.७ एससी) ०.४ मिली किंवा थायमेथोक्झाम + लॅम्डा सायहॅलोथ्रीन (०.५ मिली) प्रतिलिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

**निष्कर्ष**

लष्करी अळीच्या प्रभावी नियंत्रणासाठी केवळ रासायनिक उपाय नव्हे, तर जैविक, यांत्रिक आणि सांस्कृतिक पद्धतींचा एकत्रित वापर आवश्यक आहे. शेतकरी नियमित निरीक्षण करून वेळेवर उपाययोजना केल्यास मोठे नुकसान टाळता येते आणि शाश्वत उत्पादन मिळते.

● **डॉ. समीर बा. झाडे**
कृषीशास्त्रज्ञ
(वनस्पती रोगशास्त्र विभाग)

● **डॉ. श्रीकांत ब्राह्मणकर**
प्राध्यापक
(वनस्पती रोगशास्त्र विभाग)
डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला

# दोन्ही समुद्रात चक्रवात प्रणाली

**कृषी हवामान**

मागील अंकात दिलेल्या अंदाजानुसार दिवाळीच्या काळात बऱ्याच भागांत पाऊस झाला. आता पुढीलप्रमाणे परिस्थिति:

**शेतकऱ्यांची चिंता वाढणार**




**भौगोलिक घडामोडी :**

बंगालच्या पश्चिम-मध्य आणि आग्नेय उपसागराच्या नैऋत्य आणि लगतच्या भागात मोंथा चक्रीवादळ उत्तर वायव्येकडे सरकत आहे, ज्याचा मार्ग आंध्रप्रदेश किनारपट्टीवरील काकीनाडा, मछिलिपत्तनम ते छत्तीसगडमार्गे बांगलादेशकडे जाण्याची शक्यता आहे.

पूर्व मध्य अरबी समुद्रावरील कमी दाबाचा पट्टा ईशान्य दिशेने सरकला असून, तो गोवा, मंगळुरू, कर्नाटककडे सरकून पुन्हा उत्तरेकडे सरकण्याची शक्यता आहे.

मोंथा चक्रीवादळ नंतर एक लांब ब्रेक घेईल आणि नोव्हेंबरच्या शेवटी पुन्हा सक्रिय होईल. पश्चिमेकडील वाऱ्याची विसंगती पहिल्या आठवड्याच्या अखेरपर्यंत कायम राहील.

वरील सर्व स्थितीमुळे राज्यात काही भागांत पुन्हा जोरदार पावसाची शक्यता राहील.

**विदर्भ साप्ताहिक अंदाज**

**२९ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर** : मोंथा चक्रीवादळाचा मार्ग बघता याचा प्रभाव पूर्व विदर्भात भंडारा, नागपूर, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, चंद्रपूरकडे जास्त जाणवणार आहे, ज्यात मध्यम ते जोरदार पावसाची शक्यता राहील. पश्चिम विदर्भात ढगाळ परिस्थिती राहून स्थानिक वातावरणात अमरावती, बुलढाणा, वाशीम आणि अकोला येथे काही काळ जोरदार पाऊस राहील.

**३ ते ७ नोव्हेंबर** : ढगाळ आणि सूर्यप्रकाश राहील. थंडीची चाहुल सुरू होईल.

**उत्तर महाराष्ट्र**

**२९ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर** : दरम्यान अरबी समुद्रावरील प्रणालीमुळे नाशिक, अहिल्यानगर, धुळे, नंदुरबार, जळगावपर्यंत जास्त प्रभाव राहील आणि जोरदार पावसाची शक्यता असेल.

**३ ते ७ नोव्हेंबर** : तुटक स्वरूपात स्थानिक वातावरणत पाऊस राहील.

**मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्र**

**२९ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर** : चक्रीवादळाच्या प्रभावामुळे नांदेड, लातूर, हिंगोली, परभणी जिल्ह्यात पुन्हा जोरदार पावसाची शक्यता आहे.

**उर्वरित भागांत**

**१ ते ५ नोव्हेंबर** : तुटक स्वरूपात स्थानिक वातावरणात पाऊस राहील. राज्यात थंडीची चाहुल पुन्हा ७ नोव्हेंबरपासून जाणवेल.

● **अभिषेक खेरडे**
हवामान अभ्यासक, अचलपूर

# कपाशी पिकावरील तंबाखूची पाने खाणाऱ्या अळीची ओळख व व्यवस्थापन

सद्यस्थितीत कपाशी पिकावर काही ठिकाणी तंबाखूची पाने खाणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. या किडीला शास्त्रीय भाषेत स्पोडोप्टेरा लिटुरा या नावाने ओळखतात. या किडीचा पतंग मजबूत बांध्याचा २२ मिमी लांब असून, पुढील पंख सोनेरी व करड्या तांबड्या रंगाची असतात. या किडीचा मादी पंतग कपाशी पानावर खालच्या बाजूने पुंजक्यात अंडी घालतो. एका पुंजक्यात ८० ते १०० अंडी असतात. एक मादी सरासरी ३०० ते ४०० अंडी घालते. अंडी अवस्था तीन ते चार दिवस तर अळी अवस्था २१ ते २२ दिवसांची असते. पूर्ण वाढ झालेली अळी जमिनीत कोषावस्थेत जाते. कोष जमिनीत ३ ते १० से. मी. खोलवर असतात. कोषावस्था ९ ते १० दिवस असते, प्रौढ अवस्था जवळजवळ ६ ते ७ दिवसांची असते. मादी प्रौढ कोषातून बाहेर येताच पानाच्या खालच्या बाजूला अंडी घालण्यास सुरुवात करते तसेच एक पिढी पूर्ण होण्यास सर्वसाधारणपणे ३२ ते ४० दिवस लागतात.





**नुकसानीचा प्रकार**

या किडीने पुंजक्यात घातलेल्या अंड्यांमधून लहान-लहान अळ्या समूहात बाहेर येतात व प्रथमतः त्याच पानातील हरितद्रव्य मागील बाजूने राहून खातात. पान जाळीदार होतात. या अळ्या नंतर मोठ्या होऊन स्वतंत्रपणे पाने, शेंडे, फुले, पात्या व बोंडे पोखरूण खातात. ही बहुभक्षीय कीड असल्यामुळे अनेक पिकांवर आढळून येते.

**व्यवस्थापन उपाययोजना**

१. बांधावरील तणावा नायनाट करावा.
२. पक्ष्यांना बसण्यासाठी शेतात हेक्टरी १५ ते २० पक्षी थांबे लावावे, म्हणजे त्यावर बसणारे पक्षी शेतातील अळ्या टिपून खातील.
३. तंबाखूची पाने खाणारी अळी एकाच पानावर पुंजक्याने अंडी घालतात, त्यामुळे अशी अंडी व अळीग्रस्त पाने तोडून किडीसह नष्ट करावी.
४. तंबाखूची पाने खाणारी अळी या किडीच्या प्रादुर्भावाची पातळी समजण्यासाठी सर्वेक्षणाकरिता प्रत्येक किडीसाठी हेक्टरी १० कामगंध सापळे शेतात लावावे.
५. सापळ्यात दररोज ८ ते १० पतंग २ ते ३ दिवस आढळल्यास किडीच्या नियंत्रणासाठी उपायोजना करावी आणि सापळ्यात जमा झालेले पतंग रॉकेलमिश्रित पाण्यात टाकून नष्ट करावे.
६. तंबाखूची पाने खाणारी अळीची आर्थिक नुकसान संकेत पातळी (५ टक्के पाते, फुले व बोंडांचे नुकसान) दिसून येताच क्लोरॅट्रानिलीप्रोल १८.५ टक्के एससी ६० मिली प्रति एकर किंवा स्पिनोटोरम ११.७० टक्के एससी २०० मिली प्रति एकर किंवा सायंट्रानिलीप्रोल १०.२६ ओडी ३७५ मिली प्रति एकर किंवा क्लोरोपायरीफॉस ५० टक्के ईसी + सायपरमेथ्रीन ५ टक्के ईसी ४०० मिली प्रति एकर यापैकी कोणत्याही एको किटकनाशकाची फवारणी करावी.

**सौजन्य : डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला**

# रबी पिकांना दिलासा

**कृषी माहिती**

करडईसाठी ६०० रुपये, मसूर ३०० रुपये, हरभरा २२५ रुपयांची वाढ; शेतकऱ्यांना उत्पादन खर्चावर ५० ते १०९% नफा

आर्थिक व्यवहार विषयक मंत्रिमंडळ समितीच्या (सीसीईए) बैठकीत विपणन हंगाम २०२६-२७ साठी सर्व प्रमुख रबी पिकांच्या किमान आधारभूत किमतींमध्ये (एमएसपी) वाढ करण्यास मंजुरी दिली आहे. ही वाढ शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाचा योग्य दर मिळावा आणि पिकांमधील विविधता वाढावी या उद्देशाने करण्यात आली असून, करडईसाठी सर्वाधिक ६०० रुपये प्रति क्विंटल वाढ जाहीर करण्यात आली आहे.

**सरकारचा उद्देश**

कृषी मंत्रालयानुसार, ही वाढ २०१८-१९ च्या अर्थसंकल्पातील घोषणेनुसार शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चाच्या किमान १.५ पट दराने एमएसपी ठरविण्याच्या धोरणाला अनुसरून आहे. यामुळे शेतकऱ्यांना उत्पादनावर लाभदायक दर मिळेल, पिकांच्या विविधतेला चालना मिळेल आणि देशातील तेलबिया व डाळींच्या उत्पादनात स्वावलंबन वाढेल.

**करडईत सर्वाधिक वाढ**

तेलबियांच्या उत्पादनाला चालना देण्यासाठी करडईच्या एमएसपीत ६०० रुपयांची वाढ जाहीर करण्यात आली आहे. तज्ज्ञांच्या मते, या निर्णयामुळे महाराष्ट्र, मध्यप्रदेश आणि राजस्थानमधील करडई उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळेल.

**हरभरा आणि मसूर उत्पादकांसाठीही आनंदवार्ता**

डाळींच्या वाढत्या मागणीचा विचार करता, हरभरा आणि मसूर या पिकांमध्ये अनुक्रमे २२५ रुपये आणि ३०० रुपयांची वाढ करण्यात आली आहे. यामुळे रबी हंगामात डाळवर्गीय पिकांचे उत्पादन आणि क्षेत्रफळ वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



एमएसपी वाढ ही केवळ भाववाढ नाही, तर ती शाश्वत शेतीसाठी आत्मविश्वासाचा टप्पा आहे. उत्पादन खर्च, बाजारभाव आणि शेतकऱ्यांच्या जीवनमानात संतुलन साधण्यासाठी ही वाढ उपयुक्त ठरेल.

रबी पिकांसाठी जाहीर केलेल्या या दरवाढीमुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना, शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ आणि शाश्वत शेतीकडे वाटचाल होण्यास हातभार लागणार आहे.

# तूर कीड व्यवस्थापनाकरिता पीक संरक्षण संदेश

**कृषी वार्ता**

शेतकरी बंधूंनो, तूर पिकासंदर्भात वेळोवेळी सर्वेक्षण करून प्रादुर्भाव ओळखून आवश्यकतेनुसार व्यवस्थापन करण्याचा हा कालावधी आहे. तुरीवर शेंगा पोखरणारी अळी (घाटे अळी), पिसारी पतंग व शेंग माशी या तिन्ही किडी कळ्या, फूल व शेंगावर आक्रमण करून तुरीच्या उत्पादनात लक्षणीय घट आणू शकतात. तेव्हा शेतकऱ्यांनी जागरूक राहून या तीनही किडीच्या व्यवस्थापनासाठी आवश्यकतेनुसार खालील एकात्मिक व्यवस्थापन योजनेचा अंगीकार करावा.

(१)तुरीच्या शेतात साधारणतः प्रति एकर आठ ते दहा पक्षी थांबे त्वरित उभारावे. उंचीवर शेंगा पोखरणाऱ्या अळीच्या संनियंत्रणाकरिता (घाटे अळीकरिता) एकरी दोन ते तीन कामगंध सापळे हेलीलूर या कामगंध गोळीसह शेतात लावावे व या कामगंध सापळ्यात सतत दोन ते तीन दिवस सरासरी आठ ते दहा घाटे अळीचे नर पतंग आढळून आल्यास उपाययोजना अंमलात आणावयाची आहे, असा त्याचा संकेत घ्यावा.

(३) तूर पिकात ५० टक्के फुलोरा अवस्थेत पहिल्या फवारणीत खालीलपैकी कोणत्याही एका कीटकनाशकाची आवश्यकतेनुसार फवारणी करावी.

(४)५ टक्के निंबोळी अर्काची फवारणी

पीपीएम २५ मिली अधिक १० लिटर पाणी या प्रमाणात घेऊन फवारणी करावी.

किंवा क्विनोलफोस २५ टक्के प्रवाही २८ मिली अधिक १० लिटर पाणी यापैकी कोणत्याही एका बाबीची निर्देशित प्रमाणात घेऊन फवारणी करावी.

(५) तूर पिकात साधारणतः पहिल्या फवारणीनंतर १५ दिवसांनी किडींची आर्थिक नुकसानीची पातळी लक्षात घेऊन आवश्यकतेनुसार खालीलपैकी



एसजी ४.४ ग्रॅम अधिक १० लिटर पाणी किंवा इथिओन ५० टक्के ईसी २० मिली अधिक १० लिटर पाणी किंवा क्लोरॅट्रॅनिलीप्रोट १८.५ एससी टक्के २.५ मिली अधिक १० लिटर पाणी या प्रमाणात घेऊन कोणत्याही एका कीटकनाशकाची आवश्यकतेनुसार

आल्यास तुरीच्या झाडाखाली पोते टाकून तुरीचे झाड हलवा आणि या पोत्यावर गोळा झालेल्या अळ्या नष्ट कराव्या.

शेतकरी बंधूंनो, तज्ज्ञांचा सल्ला घेऊन गरजेनुसार रसायनाचे अद्यावत लेबल क्लेम शिफारशीची शहानिशा करून वर निर्देशित उपायोजनांची अंमलबजावणी करावी.

टीप : (१) कोणतीही रसायने फवारण्यापूर्वी अद्यावत लेबल क्लेम शिफारशीचा संदर्भ घेऊन लेबल क्लेम शिफारशी प्रमाणेच रसायने फवारणी करावी.

(२) रसायने फवारणी करताना सुरक्षित कीटनाशक फवारणी तंत्राचा अंगीकार करावा. अनेक रसायनांचे एकत्र मिश्रण करून फवारणी टाळावी व प्रमाण पाळावे.

(३) रसायने वापरण्यापूर्वी प्रत्यक्ष तज्ज्ञांचा सल्ला घेऊन योग्य निदान करून अद्यावत लेबल क्लेम शिफारशीप्रमाणेच वापरणे गरजेचे आहे.

www.tarunbharat.net
तरुण भारत
धर्म अध्यात्म
शनिवार, दि. ०१ नोव्हेंबर २०२५
संयोजक : शिल्पा विवेक कवठेकर/९८२३२६४६२६


श्री नवनाथ भक्तिसार

स्मिता देशमुख/९९२३१६८६८६

**गोरक्ष किमयागिरी या अप्राप्य ग्रंथाच्या आधारे धुंडिसुत श्री मालूकवींनी 'बासर' या पवित्र क्षेत्री 'श्री नवनाथ भक्तिसार' या प्रासादिक ग्रंथाचे दोनशे वर्षांपूर्वी लेखन केले. या सिद्ध ग्रंथातील चाळीस अध्यायांचे ओवीबद्ध लेखन मालूकवींनी इतके सुलभ व रसाळ केले आहे की वाचताना तो प्रसंग डोळ्यासमोर उभा होतो. आजपासून प्रारंभ होत असलेल्या या लेखमालेच्या निमित्ताने जाणून घेऊया.**

**संयोजिका**



# श्री नवनाथ भक्तिसार

(अध्याय पहिला)

### अवताराची पूर्व कथा

'श्री नवनाथ भक्तिसार'च्या पहिल्या अध्यायात नवनारायणांची अवतार कथा, भगवान शंकराकडून पार्वती देवीस उपदेश आणि चैतन्य मच्छिंद्रनाथांचा जन्म अशा कथांचे वर्णन आहे. कलियुगाच्या सुरुवातीचा काळ होता. द्वापारयुग संपले होते. भगवान श्रीकृष्णाने द्वारकेला एक विशेष सभा आयोजित करून त्यासाठी नवनारायणांना आमंत्रित केले होते. अनेक ऋषी व मान्यवरसुद्धा उपस्थित होते. भगवंताने नवनारायणांची षोडशोपचारे पूजा करून बोलावण्याचे कारण सांगितले. कलियुगात जनसामान्यांना कलीचा दाह होऊ नये तसेच भक्तिमहात्म्य वाढून त्यांचा उद्धार व्हावा म्हणून तुम्ही सर्व नवनारायणांनी विविध रूपाने अवतार घ्यावे आणि नवनाथ पंथाची स्थापना करावी. तुमच्यासोबत देवगण आणि इतर ऋषीमुनीसुद्धा विविध रूपाने अवतार घेतील आणि जनकल्याणाचे कार्य करतील.

भगवान श्रीकृष्ण म्हणाले, नवनारायणांपैकी कवीने मच्छिंद्र, हरीने गोरक्ष, अंतरिक्षाने जालिंदर, प्रबुद्धाने कानिफ, पिप्पलायनाने चर्पटी, अविर्होत्राने वटसिद्ध नागनाथ, दुर्मिलाने भर्तरी, चमसाने रेवण व करभंजनाने गहिनीनाथ या नावाने प्रगट व्हावे आणि नवनाथ पंथाची स्थापना करून धर्मकार्य करावे. यानंतर भगवान म्हणाले, कवी वाल्मीकि तुलसीदास, शुकमुनी कबीर, व्यासमुनी जयदेव, उद्धव नामदेव आणि जांबुवंत नरहरी होईल. माझा बंधू बलराम पुंडलिक तर भगवान शंकर, मी स्वतः, ब्रह्मदेव आणि आदिमाया हे सर्व निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान आणि मुक्ताबाई म्हणून जन्म घेतील. हनुमंत राय रामदास, तर कुब्जा ही जनाबाई होईल.

### शंकराकडून पार्वती देवीस उपदेश

एके दिवशी भगवान शंकर कैलास पर्वतावर बसले असताना पार्वती देवीने म्हटले, आपण ज्या पवित्र मंत्राचा जप करता त्याचा उपदेश मला द्यावा. तेव्हा भगवान म्हणाले की, हे अतिशय गुह्य असे ज्ञान आहे. तेव्हा यमुनेच्या काठी एकांत स्थान पाहून त्यांनी ब्रह्मज्ञानाचा उपदेश केला. तो बीजमंत्र पार्वतीला सांगितला आणि काय बोध झाला, हे मला सांग, असे विचारले. तेव्हा यमुनेच्या पाण्यातून मासोळीच्या उदरातून आवाज आला, सर्व ब्रह्मरूप आहे. हे ऐकून भगवान शंकरांनी जाणले व पार्वतीला सांगितले की, कवी नारायणाने मासोळीच्या उदरात जन्म घेतलेला आहे. त्याने हे गुप्त ज्ञान ऐकल्यामुळे असे उत्तर दिले. भगवान शंकर कवी नारायणांना, 'तू पुढे बद्रिकाश्रमास ये. तेथे मी भगवान दत्तात्रयांकडून तुला प्रत्यक्ष उपदेश देववीन', असे सांगून पार्वतीसह कैलास पर्वतावर निघून गेले.

### मच्छिंद्रनाथांचा जन्म

काही दिवसांनी वर उल्लेख केलेल्या मासोळीने तो गर्भ अंड्यासहित यमुना नदीच्या तीरावर वाळूमध्ये टाकला. बकपक्षांनी त्याला फोडताच त्यातून दिव्य असे बालक प्रकट झाले. त्याचवेळी कामिक नावाचा कोळी तेथे होता. त्याला बालकाच्या रडण्याचा आवाज आला, तेव्हा आकाशवाणी झाली. हे कामिका, तुझ्या कडेवर असलेले हे बालक साधेसुधे नसून, प्रत्यक्ष कवी नारायणाचा अवतार आहे. तू या बालकास स्वगृही घेऊन जा आणि त्याचे व्यवस्थित पालनपोषण करून मच्छिंद्रनाथ असे नामकरण कर, कुठलीही शंका ठेवू नको. कामिकाला मूलबाळ नव्हते. त्याला व त्याच्या पत्नीला यामुळे आनंद झाला व मच्छिंद्रनाथ असे नामकरण करून अतिशय उत्तम सांभाळ केला. मच्छिंद्रनाथांच्या बाललीला कामिक व त्याच्या पत्नीला बघायला मिळत असे.

एके दिवशी बाल मच्छिंद्राने पाच वर्षांचा असताना मासे पकडण्यासाठी नदीवर घेऊन चलण्याचा हट्ट केला. कामिकाने मासे पकडण्यासाठी जाळे फेकले तेव्हा बरेच मासे जाळ्यात अडकले व ते त्यांनी नदीकिनारी आणून ठेवले. पुन्हा मासे पकडण्यासाठी नदीत गेले. इकडे तडफडणाऱ्या जाळ्यातील मासे बघून बाल मच्छिंद्राचा जीव कासावीस व्हायला लागला. तो एकेक मासा पाण्यात फेकायला लागला. मग कामिक जेव्हा परत मासे टाकण्यासाठी आला तेव्हा बाल मच्छिंद्राचे हे कृत्य पाहून त्याचा राग अनावर झाला व त्याला एक चपराक देऊन म्हणाले, अरे, जर मासे पाण्यात फेकून दिले तर आपण खाणार काय? आपल्याला काय भीक मागून जगायचे काय? वडिलांच्या या कठोर बोलण्याने बाल मच्छिंद्राने ठरवले की, आता आपण भिक्षा मागूनच जीवन जगायचे. ते तेथून निघाले आणि पवित्र अशा बद्रिकाश्रमाला येऊन पोहोचले. या तीर्थक्षेत्राचे पावित्र्य व प्रसन्नता पाहून त्यांनी तेथे तपश्चर्या करण्याचे ठरविले. निराहार राहून बारा वर्षे घोर अशी तपश्चर्या केली. त्यामुळे त्यांचा देह अस्थिपंजर व काष्ठवत परंतु तेजःपुंज झाला होता.

**अवधूतचिंतन श्री गुरुदेव दत्त !**

# तुळस नावाच्या लेकीचा विवाह



परसदारी वृंदावन, त्यात डुलणारी तुळस असे मनोहर आणि प्रसन्न दृश्य आपल्या मराठी घराघरांतून दिसते. अगदी आजच्या फ्लॅट सिस्टीमच्या काळातही गॅलरी वा बाल्कनीत तुळशीवृंदावन पहायला मिळते. गृहलक्ष्मीकडून सकाळी सडासंमार्जन करून घातलेली रांगोळी, परसदारी असलेल्या वृंदावनातील तुळशीला पाणी घालणे, पूजा करणे आणि संध्याकाळी 'शुभं करोति कल्याणम्' म्हणत याच तुळशीसमोर लावला जाणारा दिवा, हीच तर आपल्या मराठी संस्कृतीची खरी ओळख! वृंदावनातील तुळस पावित्र्याचे, सौभाग्याचे आणि मांगल्याचे प्रतीकच. अंगणात कितीही झाडे असली तरी तुळशीच्या झाडाची तुलना कुणासोबतच होऊ शकत नाही. 'तुझ्यासम तूच असशी, म्हणून तुलसी' असं म्हटलं जातं. या झाडाची पाने, फुले म्हणजे मंजिऱ्या, बिया सगळं पवित्र आणि औषधीयुक्त. तिच्या ठिकाणी मुळापासून अग्रापर्यंत देव वास करतात, अशी आपली भावना आहे.

तुळशीचं आणि आपलं नातं हे विविधांगी आहे. तुळशीकडे आपण माता म्हणून बघतो, पण काही ओव्यांमध्ये तिचा लेक म्हणूनही उल्लेख पाहायला मिळतो.

ज्याला नाही लेक, त्यानं तुळस लावावी ।
सावळे श्रीकृष्ण, घरी आणावे जावई ॥

लेक म्हणून उल्लेख करतानाच तुळशीविवाहाचा संदर्भ या ओव्यांमधून सापडतो. पेशवाईच्या काळात देखील तुलसी विवाह थाटाने साजरा केल्याची वर्णने आहेत. याशिवाय पद्मपुराण व शिवपुराणात या तुलसी विवाहाची एक कथा सांगितलेली आहे.


जालंधराची पतिव्रता पत्नी, वृंदेचे प्रतीक म्हणजेच हे विष्णूला प्रिय असलेले तुळशीचे रोपटे. पुढे याच वृंदेने रुक्मिणीचा अवतार घेऊन कार्तिक महिन्याच्या शुद्ध द्वादशीला श्रीकृष्णाशी विवाह केला, तोच हा तुलसी विवाह. म्हणूनच यावेळी 'राधा दामोदर प्रसन्न' असे संबोधून तुळशी विवाह केला जातो.

दुर्गाबाई भागवत लिहितात, पंढरपुरातील वृंदा नावाच्या एका काळ्यासावळ्या, गरीब व घरच्यांनी वाऱ्यावर सोडलेल्या मुलीला विठोबाने आश्रय देऊन तुझ्याशी लग्न करेल, असे आश्वासन दिले. पण रुक्मिणीला वृंदेचा मत्सर वाटला. यामुळे निराश झालेल्या वृंदेने धरणीमातेला तिच्यात सामावून घेण्याची प्रार्थना केली. वृंदा धरणीत गडप होताना विठुराया तिथे पोचले. त्यांनी तिला केसांनी पकडले. त्यांच्या हातात केस नाही, पण तुळशीचे झाड आले. हातात काही मंजिरी आल्या. ते तुळशीचे झाड म्हणजे पूर्वजन्मीची वृंदा आणि तिला दिलेलं हे वचन पूर्ण करायचं म्हणून विठुरायांनी तिला आशीर्वाद दिला की, माझी कोणतीही पूजा तुळशीशिवाय पूर्ण होणार नाही. दरवर्षी माझे भक्त तुझा आणि माझा विवाह घडवून आणतील. तोच हा तुलसी विवाह आणि याच कारणाने आपण जिथे तुळस लावतो, त्या ठिकाणाला वृंदेची आठवण म्हणून वृंदावन म्हणतो.

कार्तिक शुद्ध प्रतिपदेपासून पौर्णिमेपर्यंत तुळशी विवाहाचा सोहळा मोठ्या उत्साहाने प्रत्येक मराठी अंगणात दरवर्षी रंगतो. तुळशी विवाहाची वेळ ही गोधुळीची, म्हणजे गाई रानातून चरून घरी येण्याची अर्थात् सायंकाळची असते. या निमित्ताने तुळशी वृंदावन स्वच्छ करून, रंगरंगोटी करून सजवलं जातं. ऊस किंवा धांड्याचे मांडव त्याभोवती उभारले जातात. तुळशीला नवे वस्त्र अर्पण केले जाते. हल्ली तर तिचा नववधूसारखा शृंगारदेखील केला जातो. मंगलाष्टके गायली जातात. श्रीकृष्णाची, तुळशीची आरती म्हटली जाते. तुलसीआख्यान वाचले वा ऐकले जाते. प्रसाद वितरण होते. अशारीतीने श्रीकृष्ण व तुळशीचा विवाह मोठ्या थाटात संपन्न होतो. हिंदू धर्मातील १६ संस्कारांपैकी एक संस्कार म्हणजे विवाह. कुटुंब व्यवस्थेचा पाया असलेला हा संस्कार तुलसी विवाहाच्या रूपाने पौराणिक काळापासूनच प्रवाहित होत आलेला आहे. आपल्या मराठी संस्कृतीची ओळख असलेली अशी ही तुळस आपल्या प्रत्येकाच्या अंगणात असावी व तिने आपल्या सर्वांना सौख्याचा आशीर्वाद द्यावा, हीच तुळशी मातेला प्रार्थना.

**- कल्याणी देशपांडे**
९८५०३६९४०४

# गुरुनानक : 'एक ओंकार सतनाम'



गुरुनानक देवजी यांनी 'एक ओंकार सतनाम' हा संदेश दिला. परमेश्वर एकच आहे आणि तो सर्वत्र आहे. गुरुनानक देवजी हे शीख धर्माचे संस्थापक आणि पहिले गुरू होते. त्यांचा जन्म इ. स. १४६९ मध्ये तळवंडी नावाच्या गावात झाला. हे गाव सध्याच्या पाकिस्तानमधील लाहोरजवळ असून, आता त्याला ननकाना साहिब म्हणतात. त्यांच्या वडिलांचे नाव मेहता कालू आणि आईचे नाव त्रिप्ता देवी होते. लहानपणापासूनच नानकजी अत्यंत बुद्धिमान, संवेदनशील आणि धार्मिक वृत्तीचे होते.

त्यांना लहानपणापासूनच भौतिक संपत्तीपेक्षा आध्यात्मिक विचार अधिक प्रिय होते. त्यांनी समाजातील विषमता, जातीभेद, अंधश्रद्धा, अन्याय, खोट्या प्रथा यांचा तीव्र निषेध केला. सर्व मानव एकाच परमेश्वराची संतती आहेत आणि सर्वांमध्ये ईश्वराचा अंश आहे, म्हणूनच त्यांनी एक ओंकार सतनाम हा विचार मांडला.

नानकदेवांनी भारतासह, तिबेट, श्रीलंका, अरब इ. देशांचा प्रवास करून लोकांना प्रेम, सत्य आणि समानतेचा संदेश दिला. त्यांच्या या यात्रांना उदास्या असे म्हटले जाते. त्यांनी आपल्या सहकारी भाई मर्दाना यांच्यासोबत प्रवास करून प्रत्येक ठिकाणी भजन, कीर्तनाद्वारे लोकांना जागृत केले. त्यांनी शिकविलेल्या प्रामाणिकपणे श्रम करावेत (किरत करो), इतरांशी वाटून घ्यावे (वंड छको) आणि सदैव ईश्वराचे स्मरण करावे (नाम जपो), या तीन तत्त्वांवरच शीख पंथाची पायाभरणी झाली.

त्यांनी कोणत्याही उपासनापंथाला कमी न समजता सर्व चांगल्या गोष्टी स्वीकारल्या. त्यांच्यासाठी मानवता हीच खरी पूजा होती. गुरुनानकदेवजींचे विचार त्या काळात अत्यंत क्रांतिकारक होते, कारण समाजात जातीभेद आणि धार्मिक अहंकार फार वाढला होता. त्यांनी मंदिर-मशीद, हिंदू-मुसलमान असा भेद न मानता सर्वांना एकतेचा संदेश दिला. त्यांनी सांगितले की, देवाकडे जाण्याचा मार्ग भक्ती, प्रामाणिकपणा आणि निस्वार्थ सेवा हाच आहे. त्यांचे जीवन अत्यंत साधे होते. सत्य, अहिंसा, दया, क्षमा आणि सेवा या मूल्यांचे पालन करीत त्यांनी लोकांना मानवसेवा म्हणजेच परमेश्वर सेवा होय, हे शिकवले. गुरुनानक यांची भजने व शिकवणींचा संग्रह गुरुग्रंथसाहिब या पवित्र ग्रंथात आढळतो. हा ग्रंथ आज शीखांसाठी सर्वोच्च ग्रंथ मानला जातो. गुरुनानक देवजींचे निधन इ. स. १५३९ मध्ये कार्तिक महिन्यात झाले. त्यांचा संदेश आजही मानवतेचा दीप म्हणून जगभर प्रकाशमान आहे. त्यांनी दाखवलेला सत्य, प्रेम आणि समानतेचा मार्ग आजही प्रत्येकासाठी प्रेरणादायी आहे.

**- पवन थोटे**
९४०४५२६७७७

श्रीरामस्पर्शाने पावनस्थळे

अपर्णा एकतारे/९०२८२६८५७८

# कोडीकराई



रामाच्या प्रवासातील जवळजवळ अंतिम टप्प्यातील हे स्थान. अत्यंत रमणीय स्थळांपैकी एक स्थळ. रामेश्वरम्पासून साधारणतः २५० किलोमीटर आधी ही जागा असून, भौगोलिकदृष्ट्या वेलांकिनी या समुद्रापासून दक्षिणेकडे तर पूर्वेस बंगालच्या उपसागराला आणि दक्षिणेस पाल्कच्या सामुद्रधुनीशी जोडली गेली आहे. हा संपूर्ण परिसर घनदाट जंगलाने व्यापलेला आहे. या ठिकाणी रामाची सेना सुग्रीवाच्या नेतृत्वात जमा झाली आहे.

रामचरितमानसमध्ये तुलसीदास याचे वर्णन करताना म्हणतात,

**असं मैं सुना दसकंधर**
**पदुम अठराह जुथप बंदर ।**
**नाथ कटक मह हो कपिल**
**जों न तुम्हीही रण माही ॥**

रावणाचा हेर रामाच्या सैन्याची संख्या आणि त्यांच्या सामर्थ्याचे वर्णन करताना म्हणतो, १८ पद्म संख्या आणि प्रत्यक्ष तुला पराभूत करण्याची त्यांची तयारी आहे. रामाच्या सैन्यातील महत्त्वाच्या वीरांच्या नावांचा उल्लेख बघितला तर खरंच या शब्दांचे सामर्थ्य लक्षात येते.

**द्विबीद, मयंद, नील, नल,**
**अंगद, गद बिकटासि ।**
**दधिमुख, केसरी, निसठ,**
**सठ, जामबंत बलरासि ॥**

आता आपण युद्धनीतीच्या दृष्टीने विचार केला, तर असे लक्षात येते की, या ठिकाणी वानरसेनेच्या भोजनाची व्यवस्था करणं सहज शक्य झाले आणि वानरसेनेला घनदाट जंगलात हालचाल करणं सहज शक्य झाले.

या ठिकाणी रामाच्या सैन्याची पुढील कामगिरी, वाटचाल ठरवण्यासाठी एक बैठक झाली. त्यावेळी असं लक्षात आले की, ही जागा समुद्र ओलांडण्यासाठी अयोग्य आहे आणि रामाचे सैन्य रामेश्वराच्या दिशेने वाटचाल करू लागले. भारतीयांच्या मनात अंतर्मनात हिचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. या ठिकाणी एका उंच डोंगरावर दोन पावलं उमटली आहे. वदंता अशी आहे की, रामाने इथे उभं राहून लंकेची पाहणी केली होती.



हा संपूर्ण परिसर चोल राजवटींच्या ताब्यात होता. इथे चोल वंशजांनी बांधलेले दीपगृह त्या काळातील संपन्न वारसा सांगत उभे आहेत. कुझगर शिवमंदिर आजही राजपरंपरेनुसार चालू आहे. येथील पूजा अर्चा आणि वार्षिक उत्सवाला जगभरातील विविध लोकांची उपस्थिती असते. नागापिपट्टम् या बंदरातून पोर्तुगीज लोकांनी भारतीय लोकांशी व्यावसायिक संबंध प्रस्थापित केले. सद्यःस्थितीत ही जागा रामसर क्षेत्र म्हणून संरक्षित केली आहे. इथे एक अभयारण्य आणि पक्षी निरीक्षण क्षेत्र आहे. २००२च्या त्सुनामीमध्ये इथे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले होते. आता ही जागा स्थलांतरित पक्ष्यांच्या अभ्यासासाठी विकसित करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

कार्तिकी एकादशी विशेष

शशिकांत तोटे/९१३०८३५४५८

# विठ्ठल जळी, स्थळी भरला



**विठ्ठल जळी स्थळी भरला ।**
**रिता ठाव नाही उरला ॥**

चराचरात वास करणारी एकमेव अशी भगवंत शक्ती आहे. भगवंत चेतन व अचेतन अणुरेणूने व्यापलेला आहे, असे आपल्या संतांनी अनुभवातून सिद्ध केले आहे. 'जगी विठ्ठल रुक्मिणी, हेचि अखंड स्मरा ध्यानी' असा उपदेश संत जनाबाई एका अभंगातून करतात. तर संत तुकाराम म्हणतात, 'तरीच जन्मां यावे, दास विठोबाचे व्हावे । नाही तरी काय श्वान सुकरे बापुडी ॥'

जीवनात भगवंताविषयी प्रेम, निष्ठा, सन्मान, आदरभाव नसेल, सेवाभाव नसेल, त्याला आपलंसं करण्याची इच्छाही नसेल किंबहुना असा प्रयत्नसुद्धा केला नसेल; तर मानवाचे जीवन व्यर्थ होय, असे संत तुकाराम सांगतात. भगवंताच्या भक्तीविना जीवन नरकासमान आहे, असे संत सांगून जातात. संतांचे वचन मानवास अंगवळणी पडायला अवकाश लागेल, परंतु तसा सायास न करणे अविवेकीपणाचे ठरेल. भगवंताच्या भक्ती सेवार्थभावाने अविवेकावर मात करणे शक्य आहे. आज अविवेकामुळे मनुष्याची दृष्टी विषयसुखाच्या पलीकडे गेलीच नाही. 'तरी काय श्वान सुकरे बापुडी' यातून संत तुकाराम म्हणतात, डुकराला विष्ठेच्या पलीकडे काही रुचकर पदार्थ आहेत, याची साधी कल्पनाही नसते म्हणून या जीवनरूपी नरकात तो पिचत असतो.

विषयसुखाच्या पलीकडे अत्यंत श्रेष्ठ असा प्रेमानंद आहे, याची कल्पना माणूरूपी श्वान सुकरांना नसावी म्हणून ते सुखदुःखाच्या अव्याहत चक्रात पिचत पडतात. अशा विकारातून मुक्त होण्याचे सामर्थ केवळ भगवंताचे दास होण्यात आणि अमृतासमान भगवंताच्या नामस्मरणात आहे. नामाशिवाय मानवाचे जीवन व्यर्थ आहे, असे आत्मभान संत ज्ञानेश्वर माउलींना झाल्यानंतर त्यांच्या सद्गुरूंनी त्यांना 'रामकृष्णहरी' हा नाममंत्र दिला. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माउली हरिपाठ, स्वानुभव व्यक्त करताना म्हणतात, 'ज्ञानदेवा फळ नारायण पाठ, सर्वत्र वैकुंठ केले ऐसे.' नारायण नाम किंबहुना विठ्ठल नामपाठाच्या फळाने; सर्व जग हे वैकुंठासमान दिसते, अशी संतांची अनुभूती आहे.

वारकरी परंपरेच्या मालिकेतील संतांनी आपल्या कुळात विठ्ठलभक्तीचा वारसा जपला होता आणि पुढील पिढ्यांनी कायम ठेवला. जेव्हा शांतीब्रह्म संत एकनाथांची दृष्टी भक्तीरसाने द्वैतभाव सोडून जाते, तेव्हा हरीहराची एकसंघता त्यांच्या वाङ्मयातून प्रतीत होते. मनोभावे विठ्ठलाचे दास झालेल्या एकनाथांचे काव्य, भारुड, गवळणी, अभंग, हरिपाठ, भागवत भक्तीरसाने डोलू लागतात आणि पुढे भक्तीमार्ग दर्शविण्यासाठी त्यांची वचनाक्षरे अक्षय ऊर्जा प्रदान करणारी ठरतात. भक्तीरसाने धुंद झाल्यानंतर अंतर्बाह्य हरिदृष्टीस पडणे स्वाभाविकच आहे. हरिरूपदृष्टी झालेल्या एकनाथांना पंढरपूर क्षेत्र तुमच्या माझ्या देहातच विराजित कसे आहे,हे पुढील अभंगरचनेतून नमूद करतात...

**काया ही पंढरी आत्मा हा विठ्ठल**
**नांदतो केवळ पांडुरंग ।**
**भावभक्ती भीमा उदक ते वाहे**
**बरवा शोभताहे पांडुरंग ।**
**दया क्षमा शांती हेचि वाळवंट**
**मिळालासे थाट वैष्णवांचा ।**
**ज्ञान ध्यान पूजा विवेक आनंद**
**हाती वेणूनाद शोभतसे ।**
**दश इंद्रियांचा एक मेळा केला**
**ऐसा गोपाळकाला होत असे ।**
**देखिली पंढरी देही जनी वनी**
**एका जनार्दनी वारी करी ।**

शांतीब्रह्म एकनाथ महाराज उपरोक्त अभंगरचनेतून म्हणत की, माझी ही काया ही काया माझी नसून देवाची आहे. कारण यात विठ्ठल परमात्मा दिव्य प्रकाश रूपाने नांदतो आहे. कायारूपाच्या पंढरीत भावभक्ती रूपाची भीमा नदी आहे आणि त्या भीमाच्या किनाऱ्यावर आत्मारूपी पांडुरंग विटेवर हात ठेवून उभा आहे. या भीमेकाठी भावभक्तीचा विस्तीर्ण वाळवंट आहे. जिथे वैष्णवांच्या सत्संगाचा लाभ होतो. अशा सत्संगामुळे मनातील सर्व विकार गळून पडतात. या कायारूपी पंढरीत ज्ञान, पूजा, भाव, विवेक, आनंदाचा सुमधुर वेणूनाद घुमतो. कायारूपी पंढरीत गोपाळकालासुद्धा अद्भुत आहे. हा गोपाळकाला पंच ज्ञानेंद्रीय व कर्मेंद्रिये मिळून दशइंद्रियांचा आहे. ज्याप्रमाणे गोपाळ काल्याचे स्वाद असतात तसेच दहा इंद्रियांचे सुद्धा वेगवेगळ्या विषयांसाठी भिन्न भिन्न रसस्वाद आहेत. परंतु संतांच्या दृष्टीने हे इंद्रिये गौण वाटतात. कारण, 'विषय तो त्यांचा झाला नारायण, नावडे जन धन माता-पिता.'

जो भगवंताला अनन्यभावाने शरण गेला, त्याला इतर बाह्य विषय कटू वाटतात. अशा भगवंत भक्तांचा एकच विषय शिल्लक असतो, तो म्हणजे पांडुरंग परमात्म्याचे गुणगान आणि त्याच्या भक्तीरसाचा आस्वाद घेणे. अशी ही चैतन्यरूपी पंढरी प्रत्येकाच्या देहात विराजित आहे. संत ज्ञानेश्वरांना तर 'सबाह्य अभ्यंतरी, अवघा व्यापक मुरारी' असा अनुभव येतो. 'देह ही पंढरी, आत्मा पांडुरंग' अशी अनुभूती संत चोखोबांना येते. नामयाची दासी म्हणून गणल्या जाणारी संत जनाबाई तर भावभक्तीच्या अधिकारी बळावर म्हणते,

**धरीला पंढरीचा चोर, गळा बांधुनिया दोर ।**
**हृदय बंदीखाना केला, आंत विठ्ठल कोंडीला ।**

असा हा विठ्ठल परमात्मा जळी, स्थळी, व्यापक आहे.

# संतशिरोमणी नामदेव



संत नामदेवांचा उल्लेख होतो तेव्हा, आपण जणू भक्तीच्या गंगेत मनसोक्त डुंबून जातो. त्यांची विठ्ठलावरची प्रेममयी भक्ती, ज्ञानोबा, निवृत्तीनाथ, मुक्ताबाई, सोपानदेव, जनाबाईसारख्यांचा लाभलेला सहवास, सारेच अद्भूत आहे. प्रपंच करताना भक्ती आणि भक्ती करताना प्रपंच हे अशक्यप्राय असलेलं कोडं कसं सोडवायचं, ते फक्त नामदेवांना उमगलं. भक्तीची जोड लाभते तेव्हा प्रपंच पवित्र बनतो. गोरोबाकाकांनी केलेली नामदेवांच्या भोळ्या भक्तीची थट्टा, 'नामा म्हणजे कच्च मडकं' हे सारं त्यांनी हसत स्वीकारलं.

ज्ञानेश्वरांसोबत तीर्थयात्रेला जाण्याची त्यांना मुळीच इच्छा नव्हती. पांडुरंगाला सोडून एक क्षणही राहणे अशक्य होते. तेव्हा माउलींनी त्यांना स्वयं पांडुरंगाची आज्ञा घ्यावी, असे सांगितले. नामदेव पांडुरंगासमोर उभे ठाकले. पांडुरंगाने होकार दिल्यावर स्वारी तीर्थयात्रेला निघाली. नामदेवांचे वडील पांडुरंगाला नित्य नैवेद्य दाखवायचे. काही कारणाने ते बाहेरगावी गेल्यामुळे ही जबाबदारी बाळ नामावर आली. नैवेद्याची वाटी घेऊन त्यांनी पांडुरंगापुढे ठेवली, आस्वाद घ्यावा म्हणून प्रार्थना केली, पण काळा दगडाचा विठोबा खीर खाणार तरी कशी? हट्ट केला, खीर खाणार नाही, तर मी देखील उपाशी राहणार. शेवटी विठ्ठल उठले. त्यांनी ती आनंदाने खाल्ली, असे म्हटले जाते. ठायी ठायी असणारा विठ्ठल मला प्रत्यक्ष दिसायला हवा, हा अट्टाहास करणारा नामा आणि तो पुरवणारा विठ्ठल जणू एकच आहे, ही प्रचिती येते.

आरती केल्यानंतर मंत्रपुष्पांजलीच्या आधी 'घालीन लोटांगण वंदीन चरणं' ही प्रार्थना जेव्हा केली जाते, तेव्हा म्हणे नामा आपल्याला आठवतो. भागवत धर्माची पताका फक्त महाराष्ट्रापुरती मर्यादित नसून, अखिल भारतीय स्तरावर नेण्याचे श्रेय नामदेवांना आहे. ज्ञानेश्वर माउलींनी समाधी घेतल्यानंतर विठ्ठलाच्या आज्ञेप्रमाणे ते पंजाबला गेले. गुरुमुखी शिकले. सगुण, निर्गुण भक्तीची भजने, अभंग लिहिले. त्यांची वाणी गुरुवाणी समजून पवित्र गुरू ग्रंथसाहिबमध्ये समाविष्ट केली आहे. नामदेव महाराष्ट्रातच नव्हे, तर पंजाबातही तितकेच लाडके आहेत. नामा भक्त आहे, कवी आहे, कीर्तनकार आहे, भजनगायक आहे, तपस्वी साधू आहे, उपदेशक आहे, टीकाकार आहे आणि त्यासोबत प्रपंच करणारा गृहस्थपण आहे. नामा काय नाही ? म्हणूनच विठ्ठल मंदिराची पहिली पायरी ही नामदेवांना समर्पित केली आहे, जिथे फक्त तेच उभे राहू शकतात, अन्य कोणी नाही.

**- प्रकाश केवडे**/९७६४६७८१३०

# भये हूँ उदास राम, मेरे आस रावरी..!

श्रीरामचरितमानस (भाग ८)

**भये हूँ उदास राम, मेरे आस रावरी ।**
**आरत स्वारथी सब कहै बात बावरी ॥१॥**
**जीवन को दानी घन कहा ताहि चाहिये ।**
**प्रेम-नेम के निबाहे चातक सराहिए ॥२॥**
**मीन तें न लाभ-लेस पानी पुन्य पीनको ।**
**जल बिनु थल कहा मीचु बिनु मीनको ॥३॥**
**बड़े ही की ओट, बलि, बाँचि आये छोटे हैं ।**
**चलत खरे के संग जहाँ-तहाँ खोटे हैं ॥४॥**
**यहि दरबार भलो दाहिनेहुँ-बाम को ।**
**मोको सुभदायक भरोसो राम नामको ॥५॥**
**कहत नसानी है हिये नाथ, नीकी है ।**
**जानत कृपानिधान तुलसी के जी की है ॥६॥**
**(गोस्वामी तुलसीदास)**

हे रामा...! तू माझ्या बाबतीत कितीही उदास असलास, तरी मी केवळ तुझ्यावर अन् तुझ्यावरच विसंबून आहे. माझं आशास्थान म्हणजे एकमेव तू. अन्य कुठल्याही आश्रयाला जाण्याचा काही प्रश्नच नाही.

जगाला जीवन देणारा मेघ. सरसकट सगळ्यांनाच पाणी देत असतो. इतरांना देतो तसंच ते चातकालाही मिळतं. पण केवळ स्वाती नक्षत्रातल्याच जलधारांनी तो आपली तहान भागवतो. त्याच्या या प्रेम, निष्ठेची दखल घेत जग चातकाचीच स्तुती करते. साऱ्या पृथ्वीवर सर्वांना जीवन देणाऱ्या पाण्यापेक्षा कौतुक चातकाचेच होतं. म्हणजे देणाऱ्याचं कौतुक कमी अन् घेणाऱ्याचीच प्रशंसा अधिक.

पवित्र, शुद्ध पाण्याला त्यातील माशांबद्दल भानही नसेल. त्यांची दखल घ्यावी, असं त्याच्या बाबतीत काहीही नाही. पण मासे पाण्याशिवाय अन्य कुठे जगू शकतील...? त्यांच्या पाण्याशी असलेल्या जीवननिष्ठेचा, त्यांच्या प्रेमाचा म्हणूनच गौरव होत असतो.

प्रभू रामचंद्रा...! तुझ्यावरून जीव ओवाळून टाकावा. खरं म्हणजे लहान लहान जीव मोठ्यांच्या आश्रयानंच जगत असतात. जगाच्या या व्यवहारात चांगल्या, खऱ्या चलनातच खोटं नाणं चालवलं जातं, चालून जातं. रामा...! मी तुझ्या भक्तांसारखा अस्सल बावनकशी सोन्यासारखा नसेनही. मी आहे खोटं नाणं... पण तुझ्या सच्च्या भक्तांबरोबर चालून जावं. त्यासोबत हा संसारसागर तरून जाईन अशी आशा आहे. रघुनाथा...! मी पाहतो तुझा दरबार अन् मला आता भक्कम भरवसा वाटतो. चांगले वाईट, भलेबुरे असे सर्व भक्त वावरत असतात, अन् तरूनही जातात. यात सारेच तुझे निस्सीम भक्त असतात असं नाही.

रामा...! या बोलण्याच्या गोष्टी नाहीत, पण काय करू? मी आर्त आहे, स्वार्थी आहे. हे मी मनातच ठेवलं पाहिजे. कारण प्रभू तू अंतर्यामी आहेस. या तुलसीदासाला तू पूर्णपणे जाणून आहेस. मला काय हवं ते तू जाणतोस. तुझ्या या भक्तावर कृपा कर. बस एवढंच...!

**डॉ. शरद् कळणावत**

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
https://epaper.dainiktarunbharat.com



## हानेगाव येथे मरखेल पोलीस स्टेशन अंतर्गत राष्ट्रीय एकता दिवस साजरा

**हाणेगाव-** हाणेगाव येथे मरखेल पोलीस स्टेशनच्या वतीने राष्ट्रीय एकता दिवस व तसेच सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त रन फॉर युनिटी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मरखेल पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र हुंडेकर यांनी आपल्या सहकार्यासोबत या विभागात या कार्यक्रमाचा प्रचार व प्रसार करून अनेकांना या कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्यास विनंती केली आणि या विनंतीला अनेक सामाजिक कार्यकर्ते विविध क्षेत्रातील पदाधिकारी उद्योजक ,व्यापारी, सामाजिक कार्यकर्ते, व युवा वर्ग तसेच बालक वर्ग उपस्थित राहून हा कार्यक्रम यशस्वी करण्यात आला. यावेळी हाणेगाव येथील वझर टी पॉइंट येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी सर्व उपस्थित मान्यवरांना रवींद्र हुंडेकर यांनी राष्ट्रीय एकता दिवस व तसेच सरदार वल्लभभाई पटेल यांच्या कार्याविषयी माहिती दिली तर यावेळी चलवे सर यांनी पण उपस्थित मान्यवरांना मार्गदर्शन केले आणि सर्व लहान बालक मुले मुली व युवा वर्ग यांचे सह धावण्याची शर्यत ठेवण्यात आली व प्रथम पारितोषिक द्वितीय ,तृतीय ,आलेल्या छोट्या बालकांना युवा वर्गांना मरखेल पोलीस स्टेशनच्या वतीने सन्मानपत्र देण्यात आले यावेळी हाणेगाव विभागातील सर्वच क्षेत्रातील कार्यकर्ते उपस्थित होते यावेळी आवर्जून सर्व गावचे पोलीस पाटील उपस्थित होते यावेळी कु, केशवी राजेश पंधरगे,अंजली अक्कमगिरे, यांनी प्रथम द्वितीय पारितोषिक मिळविले तरी या कार्यक्रमाला विवेक पडकंठवार, दिलीप बंदखडके, डॉ, व्ही व्ही धुमाळे, मुक्तार पाटील, मौलाना सज्जाद खासमी ,राजेश पंधरगे प्रा, प्रभाकर भालके संजय काडगे पुरुषोत्तम अंसापुरे, प्राचार्य फुलसिंग राठोड, संतोष राठोड ,वसंत आडेकर , मोसिन मुजावर, सौ,मनीषा संजय वसुरकर पोलीस पाटील, ज्योती गोखले पोलीस पाटील वझर, गजेंद्र पाटील लोणी, एकनाथ रेडी मरतोळी तानाजी देवकते, कविता अशोक दोगाले बीजलवाडी, सिंधुताई धर्मावाड येडूर, संदीप बाळासाहेब देशमुख शिळवणी, आदी जण उपस्थित होते तर या कार्यक्रमाचं आयोजन हाणेगाव दूरपरिक्षेत्राचे जमादार दत्ता पाटील नारायण यंगाले यांनी सुंदर असं नियोजन केले तर सर्व मान्यवरांच्या वतीने मरखेल पोलीस स्टेशनचे सहाय्यक निरीक्षक रवींद्र हुंडेकर यांचे आभार व्यक्त करण्यात आले.

## मुक्रमाबाद पोलिस ठाणेतर्फे आयोजित मॅरेथानला उत्स्फूर्त प्रतिसाद

**मुक्रमाबाद** -नांदेड जिल्हा पोलिस व मुक्रमाबाद पोलिस ठाणे तर्फे दि.३१ रोजी राष्ट्रीय एकता दिवस आणि सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त रन फॉर युनिटी मॅरेथान आयोजित करण्यात आली होती.हि मॅरेथान नांदेड - बिदर- राष्ट्रीय महामार्गावरील लखमापूर फाटा ते डोरनाळी पर्यंत काढण्यात आली.यावेळी पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरिक्षक राजू चव्हाण साहेब यांनी रन फॉर युनिटी मॅरेथान बद्दल माहिती सांगून मॅरेथान ला सूरुवात केली. याप्रसंगी धिरज पाटील गोजेगावकर, कपिल पाटील ईटग्याळकर, जयपाल दापकेकर, नामदेव सुर्यवंशी, हेमंत खंकरे, बालाजी पसरगे, अँड.सुरेश राचलवार, पोलिस पाटील सुनील रोठेवाड, संतोष वट्टमवार, पत्रकार अशोक लोणीकर, रज्जाक कुरेशी,शाकेर काझी, बस्वराज वंटगीरे,आदिनी रन फॉर युनिटी मॅरेथान मध्ये सहभाग नोंदवला. आयोजित रन फॉर युनिटी मॅरेथान यशस्वीतेसाठी ठाण्याचे प्रभारी सहाय्यक पोलिस निरीक्षक राजू चव्हाण साहेब, गोपनीय शाखेचे माधव मलगीरवार, दिलिप तग्याळकर, गजानन ढगे, योगेश महेंद्रकर, सुभाष सिद्धेश्वरे, बबरुवान लुंगारे, माधव जळकोटे, लायकोनिसा शेख,सुनिता गज्जलवाड,सुहानी पंचबुद्धे. आदी पोलिस कर्मचारी सहभागी होऊन परिश्रम घेतले.

## पंचशील विद्यालयात दिवंगत गृहमंत्री सरदार पटेल अभिवादन

**हदगाव** -शहरातील पंचशील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात देशाचे पहिले गृहमंत्री व उपपंतप्रधान भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती आणि देशाच्या पहिल्या महिला पंतप्रधान दिवंगत भारतरत्न श्रीमती इंदिरा गांधी यांच्या स्मृतिदिनानिमित्त संस्थेचे सचिव सुनील हरिहरराव सोनूले यांनी प्रतिमा पुजन करुन अभिवादन केले. याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक बंड्रेवार,जेष्ठ शिक्षक दिगंबर ताडेवाड,परीक्षा विभाग सहाय्यक सुनील सूर्यवंशी,ग्रंथपाल सतीश प्यादेकर,प्रयोगशाळा सहाय्यक वैभव टाले, प्रमोद जाधव,परमेश्वर वाकोडे,शोभाबाई सुर्यवंशी,ममताबाई,पुजा जंगवाड सह आदि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी प्रतिमा पूजन करून अभिवादन केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनीषा हुलकाने यांनी केले.

## सरदार वल्लभभाई पटेल जयंतीनिमित्त रन फॉर युनिटी कार्यक्रम

**माहूर** -ज्येष्ठ भारतीय स्वातंत्र्यसैनिक आणि राजकारणी,स्वतंत्र भारताचे पहिले उपपंतप्रधान आणि गृहमंत्री.ज्यांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीत महत्त्वपूर्ण योगदान दिले.स्वातंत्र्यानंतर, भारताच्या संस्थानांचे एकत्रीकरण करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली असे भारताचे 'लोह पुरुष' सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंती निमित्त माहूर पोलीस ठाण्याच्या वतीने वसंतराव नाईक चौक ते बस स्थानक पर्यंतच्या रस्त्यावरुन 'रन फॉर युनिटी' (एकता दौड) कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यामध्ये उपविभागीय पोलीस अधिकारी किरण कुमार भोंडवे यांचेसह अधिकारी, कर्मचारी, प्रतिष्ठीत नागरिक व व्यापाऱ्यांनी सहभाग घेतला.

माहूर येथे आयोजित या कार्यक्रमात धावण्यासोबतच, राष्ट्रीय एकात्मतेची शपथ घेत सरदार पटेल यांना पुष्पांजली अर्पण करण्यात आली. यावेळी ०७:३० ते ०८:०० वा. दरम्यान सह्याद्री टी पॉइंट येथून सरदार वल्लभाई पटेल यांच्या जयंती निमित्त रन फॉर युनिटी चे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमात उपविभागीय पोलीस अधिकारी किरण कुमार भोंडवे,सपोनि शरद घोडके, पोलीस उपनिरीक्षक पालसिंग ब्राह्मण, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक बाबू जाधव, पोलीस अंमलदार जाधव, राऊत, कोरडे, मुहूरले,कावडे, सोनसळे,खंदाडे, महिला अंमलदार शिल्पा राठोड, शिवानंदा जाधव,सोनू भुरके,सारिका राठोड, मनीषा चव्हाण, नीलम राठोड यंनी सहभाग घेतला.

## पूर नुकसानीचे खोटे पंचनामे करणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाई कराः खिराडे

**नांदेड-** पुराच्या पाण्याने नुकसान झाल्याचा खोटा अहवाल सादर करुन शासनाची दिशाभूल करणाऱ्या मनपा आयुक्तांसह अन्य अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते सुरज खिराडे यांनी एका निवेदनाव्दारे जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे केली आहे.


ऑगस्ट २५ मध्ये गोदावरी नदीला पूर आल्यानंतर अनेक भागात पुराचे पाणी गेल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. परंतु याचा गैरफायदा घेत मनपातील अधिकाऱ्यांनी ज्यांच्या घरात पाणी गेले नाही किंवा त्यांचे कुठलेही नुकसान झाले नाही अशा ठराविक लोकांचे खोटे पंचनामे करुन अहवाल सादर केला आहे. २९४ पानांच्या या अहवालात १४ हजार ३४१ लोकांची नावे टाकून शासनाची फसवणूक केली आहे. अहवालातील २९, ३०, ३१, १६९, १७०, १७२,१७३,१७४ व १७५ या पानावर ठराविक लोकांची खोटी नावे टाकून शासनाची फसवणूक केली असून या प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करुन गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते सुरज खिराडे यांनी केली आहे.

# नांदेड - पुणे वंदे भारत लवकर सुरु होणार : खा.डॉ. अजित गोपछडे यांचे सातत्याने प्रयत्न

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ३१ ऑक्टोबर-**

नांदेड - पुणे रेल्वे प्रवास आता अति जलद गतीने होणार असून या मार्गावर लवकरच वंदे भारत एक्सप्रेस धावणार आहे. खा. डॉ. अजित गोपछडे यांच्या प्रयत्नांना यश येत असून केंद्रीय रेल्वे मंत्रालयाने नांदेड - पुणे वंदे भारत एक्स्प्रेसला ग्रीन सिग्नल दिला आहे.

मराठवाड्यातील रेल्वे प्रवाशांना अधिकाधिक रेल्वे सुविधा मिळावी , मराठवाड्याचा जलद गतीने विकास व्हावा आणि जलद रेल्वे सेवा उपलब्ध व्हावी यासाठी खा. डॉ. अजित गोपछडे यांचे सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. नांदेड - मुंबई वंदे भारत एक्स्प्रेस सुरू करून घेतल्यानंतर खा. डॉ .अजित गोपछडे आता नांदेड - पुणे आणि नांदेड - हैदराबाद वंदे भारत एक्सप्रेस साठी प्रयत्न करत आहेत. या अनुषंगाने केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेऊन त्यांनी पत्र दिले होते.खा. डॉ. अजित गोपछडे यांच्या निवेदनानुसार केंद्रीय रेल्वे मंत्रालयाने नांदेड - पुणे वंदे भारत एक्सप्रेस ला ग्रीन सिग्नल दिला असून आता या मार्गावर लवकरच अति जलद प्रवास सुरू होणार आहे.



पुणे शहर महाराष्ट्रातील शैक्षणिक पंढरी असल्याने या ठिकाणी नांदेड आणि मराठवाड्यातील असंख्य विद्यार्थी शिक्षणासाठी आहेत. नोकरी , व्यवसायासाठी , उद्योगधंद्यासाठी ही असंख्य व्यापारी , उद्योजक , नागरिक पुण्यामध्ये वास्तव्यास आहेत . त्यामुळे पुणे , मराठवाडा आणि नांदेडची मोठी कनेक्टिव्हिटी असून वंदे भारत एक्सप्रेसमुळे ही कनेक्टिव्हिटी अधिक मजबूत होणार आहे. वंदे भारत एक्सप्रेसमुळे मराठवाड्याच्या व्यावसायिक वृद्धीसाठी मोठी मदत होणार असल्याने मराठवाड्याच्या विकासाला आणखीन एक जलद गतीचा नवा मार्ग मिळेल असा विश्वास खा. डॉ. अजित गोपछडे यांनी व्यक्त केला आहे.

# मुख्य मार्गावरील खाजगी ट्रॅव्हलसच्या थांब्यामुळे वाहनांची कोंडी

**तभा वृतसेवा**
**मुखेड, दि. ३१ ऑक्टोबर-**

शहरात मागील काही दिवस पासून दिवाळी उत्सव चे धामधुमीत प्रचंड गर्दी वाढली असून सन उत्सव निमित्त बाहेर गावी जाण्याची आणि बाहेरून गावी येणाऱ्या ची रेलचेल सुरू आहे. ह्यातच वाहन वर्दळ होत असल्याने वाहतूक कोंडी निर्माण झाली आहे पुणे मुंबई कडे जाणाऱ्या मोठ्या खाजगी ट्रॅव्हलस शहरात मुख्य मार्गावर थांबा मुळे वाहतूक कोंडी मोठया प्रमाणावर निर्माण झाली आहे.त्यातच हातगाडे मुळे आणखीन परिस्थिती बिकट होत आहे शहर चे बाहेर मुखेड हुन नांदेड कडे जाणारे ट्रवव्हलस वाहतूक ऑटो रिक्षा खाजगी वाहने सह खाजगी ट्रव्हलस चे थांबा निर्माण करून वाहतूक कोंडी सोडून शहराच श्वास मोकळा करावा अशी मागणी नारिकांमधून होत आहे याबाबत प्रादेशिक परिवहन विभाग चे उच्च पदस्थ अधिकारी सह पोलिस प्रशासन तहसील प्रशासन आणि लोकप्रतिनिधी ने लक्ष द्यावी अशी मागणी होत आहे आ डॉ तुषार राठोड यांनी ही समस्या सोडवावी शहरातली नागरिक चे त्रास कमी करावा अशी ही विनंती केली जात आहे

शहराचे विस्तार दिवसागणिक झपाट्याने होत असून शहरात आज घडीला ५० हजार हुन अधिक नागरिक ची लोकसंख्या आहे शहर जवळ ४० ते ४५ गाव खेडे तांडा असल्याने शहरात नेहमी च वर्दळ असते तर कर्नाटक आणि तेलंगणा राज्याच्या सीमा नाजिक चीटकुन असल्याने नागरिक चीं वर्दळ गर्दी नेहमी असते तालुका हा जिल्ह्यात सर्वाधिक क्षेत्र फळ ने मोठा तालुका आहे शासकीय कामकाज निमित्त बाहेरून येणाऱ्या नागरिक चीं संख्या मोठ्या प्रमाणावर असते.मागील काही दिवस पासून शहरात गर्दी वाढत असून सन उत्सव चे पार्शव भूमीवर वाहन ची संख्या वाढली आहे दुचाकी चार चाकी वाहन धारक ना वाहन चालवताना मोठी कोंडी होत आहे शहरात जाणाऱ्या तीन मुख्य मार्गावर वाहन कोंडी होत आहे डॉ बाबासाहेब आंबेडकर स्मारक जवळून उपजिल्हा रुग्णालय कडे जाणाऱ्या रस्त्यावर एक एक तास वाहन कोंडी होत आहे त्यातून रस्ता जाम झाल्याने नागरिकांना अतोनात त्रास होत आहे

तर शहरात मुख्य मार्गावर नांदेड लातूर रोडवर मोठ्या खाजगी प्रमाणावर खाजगी वाहने लावली जात आहेत ज्यात खाजगी प्रवासी वाहतूक करणारे खाजगी ट्रॅव्हलस मुळे मोठ्या प्रमाणावर वाहन कोंडी होत आहे नांदेड मुखेड कडे जाणाऱ्या खाजगी ट्रॅव्हल मुळे ही वाहन कोंडी होत आहे.

मोठ्या महाग्रगरता खाजगी वाहन साठी मोठ्या जागेवर थांबा दिला जातो त्याच धर्तीवर शहरातली वाहतूक सुरळीत करण्यासाठी खाजगी प्रवाशी वाहतूक करणारे ट्रॅव्हल स तंबा द्यावा यासह काळी पिवळी जीप ऑटो सर्व काही शहर बाहेर थांबा व्हावे अशी मागणी नागरिकाने केली आहे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी याबाबत लक्ष द्यावे अशी मागणी होत आहे प्रादेशिक परिवहन विभाग चे अधिकारी कर्मचारी यांकडे कानाडोळा का करीत आहेत असा ही प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे

आ डॉ तुषार राठोड यांनी स्वतः याकडे लक्ष द्यावे यात्या काळात निवडणुका होणार असून वाहतूक कोंडी मुळे अनेक समस्या निर्माण होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे

## कासराळी गणातून अरुणाताई चिंचाळकर इच्छूक

**तभा वृतसेवा**
**बिलोली, दि. ३१ ऑक्टोबर-**

गेल्या अनेक वर्षापासून शेवटच्या घटकातील जनसामान्यांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी अहोरात्र प्रयत्न करीत असलेले सेवाभावी व्यक्तिमत्व प्रदुम पाटील चिंचाळकर यांची पत्नी सौ. अरुणाताई प्रदुम पाटील चिंचाळकर यांनी आरक्षण सुटलेल्या सर्वसाधारण महिला पंचायत समिती कासराळी गणासाठी निवडणूक लढवण्याचा निर्धार केला आहे.



आर्थिक दृष्ट्या वंचित घटकांना सर्वांगीण विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रदुम पाटील नेहमी कार्यतत्पर असतात. ग्रामीण भागातील धार्मिक सांस्कृतिक शैक्षणिक सामाजिक आदी उपक्रमांना अग्रक्रम देत सौ. अरुणाताई पाटील ग्रामीण भागातील असल्याने आसपास गावातील नागरिकांना ते चांगले परिचित आहेत. त्यांच्या यशस्वी कार्याची दखल घेत संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष जेजेराव पाटील करडखेडवाडीकर यांच्या मार्गदर्शनाखाली व संभाजी ब्रिगेड तालुका अध्यक्ष बिलोली प्रदुम पाटील चिंचाळकर यांच्या नेतृत्वाखाली कासराळी गणातून निवडणूक लढवण्याची इच्छा व्यक्त केली आहे. या निर्णयामुळे गावातील राजकीय समीकरणांमध्ये हालचालींना वेग आला आहे.




**किनवट - भारतीय जनता पक्षाच्या वतीने आमदार आ. भीमराव केराम यांच्या नेतृत्वाखाली शक्ती केंद्र प्रमुख बुथ प्रमुखांची महत्वाची बैठक पार पडली. या बैठकीत मराठवाडा संघटन मंत्री संजय कौडगे, जिल्हाध्यक्ष ॲड. किशोर देशमुख, भाजपा नेते सुधाकर भोयर, महिला जिल्हाध्यक्ष सौ. संध्या राठोड, पक्ष निरिक्षक नारायण श्रीमनवार, माजी नगराध्यक्ष दिनकर चाडावार यांची उपस्थिती होती.**

# मांजरम गटात वंदना पवार यांची उमेदवारी चर्चेत

**तभा वृतसेवा**
**नरसी, दि. ३१ ऑक्टोबर-**

जिल्हा परिषद मांजरम गट हा अनुसूचित जाती (महिला) राखीव झाल्यानंतर या गटात भाजपने सर्वात आधी पावले टाकत वातावरण आपल्या बाजूने वळवण्याचा प्रयत्न सुरू केला आहे.



भाजपकडून अनुसूचित जाती मोर्चाचे जिल्हाध्यक्ष प्राचार्य मनोहर पवार यांच्या सौभाग्यवती आणि पंचायत समितीच्या माजी सभापती सौ. वंदना मनोहर पवार यांनी उमेदवारीसाठी अर्ज दाखल करून राजकीय रंगत वाढवली आहे. प्राचार्य मनोहर पवार यांनी आपल्या सौभाग्यवती वंदना पवार यांचा अर्ज आमदार राजेश पवार यांच्या कार्यालयात माजी तालुकाध्यक्ष दत्ता पाटील ढगे यांच्याकडे सुपूर्द केला. यावेळी बालाजीराव मदेवाड, श्रीहरी देशमुख, तालुका सरचिटणीस विठ्ठल पाटील तिजारे आदींची उपस्थिती होती.

भाजपने या गटात वेळ न दवडता उमेदवारी अर्ज मागवले असले, तरी विरोधक मात्र अद्याप तयारीच्या भूमिकेत दिसत नाहीत. त्यामुळे स्थानिक राजकारणात सध्या मांजरम म्हणजे वंदना पवार अशीच चर्चा ऐकू येत आहे. भाजपसाठी हा गट निश्चितपणे सोनेरी संधी ठरण्याची चिन्हे दिसत आहेत.

# प्रभाग नाही, पण नगराध्यक्ष पदासाठी 'बाशिंग' तयार!

**तभा वृतसेवा**
**मुखेड, दि. ३१ ऑक्टोबर-**

मुदखेड शहराचे राजकीय वातावरण सध्या एका नव्या आणि हास्यास्पद चर्चेने ढवळून निघाले आहे. अनेक 'युवा नेते' म्हणून मिरवणारे तरुण नगराध्यक्ष पदासाठी गुडघ्याला बाशिंग बांधून तयार असले तरी, त्यांना नगरसेवक म्हणून निवडून येण्यासाठी साधा प्रभागच मिळत नाहीये. याच कारणामुळे हे युवा नेते थेट नगराध्यक्ष पदाची स्वप्ने पाहत असल्याची चर्चा सध्या शहराच्या गल्लीबोळात होताना दिसत आहे.

राजकीय निरीक्षकांच्या मते, ज्या नेत्यांना नगरसेवक म्हणून ग्राउंड लेव्हलवर आपली ताकद



सिद्ध करता येत नाही, ते थेट नगराध्यक्षपदाच्या शर्यतीत उतरून केवळ हवा करण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यांची सध्याची जमिनीवरील (ग्राउंड लेव्हल) परिस्थिती शून्यात असतानाही, 'आपल्याशिवाय दुसरे कोणीच नाही' अशा थाटात ते गावभर ढिंगारा पेटवत आहेत.

माजी नगरसेवक ते 'गुत्तेदार' नेतृत्वाचा नवा चेहरा!या चर्चेत आणखी एक महत्त्वाचा मुद्दा उपस्थित होत आहे. एकेकाळी ज्या नेत्यांनी माजी नगरसेवक तसेच इतर पाच-पाच पदे भोगली आणि प्रशासक काळात तीन वर्षे नगरपरिषद ही जणू आपली खासगी मालमत्ता असल्याप्रमाणे वापरली, ठेकेदारांकडून 'मलिदा' खाल्ला, आज तोच 'गुत्तेदार' (ठेकेदार) आता 'भावी नगराध्यक्ष' म्हणून मिरवत आहे.

एकंदरीत, मुदखेडच्या राजकारणातील ही नवी खेळी शहरवासियांसाठी चर्चेचा विषय ठरली आहे. प्रभाग निवडणुकीत स्वतःची जागा पक्की नसताना थेट नगराध्यक्षपदासाठी इच्छुक असणे, हा शुद्ध राजकीय गोंधळ असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

# विकासकामांच्या जोरावर उमरी नगर परिषद जिंकणार : आ. राजेश पवार

**तभा वृतसेवा**
**उमरी, दि. ३१ ऑक्टोबर-**

उमरी नगर परिषद निवडणूकीचे पडघम वाजण्यास सुरुवात झालेली असतांना नायगाव विधानसभा क्षेत्राचे आ. राजेश पवार यांचे माध्यमातून उमरी शहरात तारिख २९ आक्टोंबर २०२५ रोजी नागझरीनगर भागातील बौध्दविहारचे नियोजित जागेवर रू. २२.०० लक्ष चे सभागृहाचे भूमीपूजन केले. त्यानंतर श्रीमती जानकाबाई माने यांचे घर ते नगर परिषद कार्यालय चौकापर्यंत रु. ५४.०० लक्षचा सी. सी. रोड, श्री. संत दासगणू नगरमधील श्री. मार्कंडेश्वर मंदीराचे ओपन स्पेस जागेत रु. १ कोटी ५१ लक्षमधून संरक्षण भिंत, ओपनजिम, गार्डन, पार्किंग शेड, पब्लिकचेअर, लहान बालकांसाठी खेळणी अशी विकास कामे हाती घेण्यात आली आहेत. शहरातील पाणी पुरवठ्याची व्यवस्थापन करण्यासाठी रु. १९.०० कोटींचा निधी उपलब्ध करून दिला असून त्यामधून शहरात तिन जलकुंभ, २७ कि. मि. ची पाईपलाईन, उमरी ते कुदळा एक्स्प्रेस फिडर (२४ ता विद्युत पुरवठा रहावा अशी उपाय योजना), वॉल आदीं कामांचे भूमीपूजन करण्यात आले.

सदरील कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी व्ही. पी. के. उद्योग समुहाचे अध्यक्ष मारोतराव कवळे गुरुजी होते.




ह्याप्रसंगी बोलतांना आ. राजेश पवार यांनी उमरी नगर परिषदेवर भाजपाचा नगराध्यक्ष निवडून द्या आणि २० पैकी २० जागेवर भाजपाचे नगरसेवक निवडून देण्याचे आवाहन केले. उमरी शहराला मालकशाहीचा इतिहास आहे. त्यांचे ताब्यात मागील १५ वर्षे उमरी नगर परिषदेची एकहाती सत्ता होती त्यानंतर ४ वर्षे प्रशासक होते. मागील १५ वर्षातील सत्तेच्या काळात शहराचा किती विकास झाला अशी पृच्छा करुन त्यांनी उमरी नगर परिषदेवर प्रशासक असल्यामुळे मला एवढ्या मोठ्या प्रमाणात येथे निधी देता आल्याचे सुतोवाच केले. उमरीच्या मतदारांनी भाजपाला येथील सत्ता दिली तर शहराचा चेहरामोहरा बदलून टाकू अशी ग्वाही दिली. उमरी शहरात अनेक कुटूंबाकडे स्वत:ची घरे नाहीत, अनेकांची नांवे प्लॉट नाहीत त्यांना पंतप्रधान घरकुल योजनेतून घरे उपलब्ध करून देण्यावर त्यांनी भर दिला. उमरी गोरठा रोडवरील हुतात्मा स्मारक परिसरात भव्य मंगल कार्यालयाची निर्मिती होत असून त्यासाठी आत्ता पर्यंत रू. १४.५० कोटी निधी दिलेला असून सभागृहातील एअरकंडिशनर व फर्निचरसाठी दोन कोटी निधी मंजूर करण्यात आल्याची माहिती दिली. सर्वसामान्य गोरगरीब जनतेला मोठी मंगल कार्यालये परवडत नाहीत त्यांची शहरातच सोय व्हावी म्हणून प्रयत्न करित असल्याचे सांगितले. शहरात स्लिमिंगपूल, शादीखाना, रेल्वेस्टेशन पलिकडिल भागात स्मशानभूमी व दफनभूमीची निर्मिती ह्यावर त्यांनी भर दिला. विधानसभा निवडणूकीत उमरी शहरातील मतदारांनी मला भरभरुन आशिर्वाद दिले त्यामुळे मी येथे भरभरुन निधी देत आहे. हा विकासाचा ओघ अविरत चालू ठेवण्यासाठी भाजपाला निवडुन देण्याची विनंती त्यांनी उपस्थित नागरिकांना केली.

ह्याप्रसंगी माजी नगराध्यक्ष विजयकुमार उत्तरवार, संजय कुलकर्णी, बालाजीराव टिप्रेसवार आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष अजितदादा गटाचे सरचिटणीस डॉ. विक्रम देशमुख यांची समयोचित भाषणे झाली.

अध्यक्षीय समारोप प्रसंगी उद्योगपती मारोतराव कवळे गुरुजींनी शहरातील सुशिक्षित बेरोजगारीवर प्रकाश टाकत शहरात उद्योगधंदे उभारण्यावर भर दिला. पुर्वी उमरी शहरात पांच जिनिंग होत्या येथे १५०० ते २००० मजूर शिफ्टवाईज कामाला होते पण ही कारखानदारी बंद पडल्यामुळे येथील मजूरांना दररोज पहाटेच्या रेल्वेने बासर, निजामाबाद ला जावे लागत असल्याची खंत व्यक्त करुन खा. अशोकराव चव्हाण व आ. राजेश पवार यांचे सहकार्यातून उमरी शहरात उद्योगधंदे उभारुन तरुणांचे हालाला काम उपलब्ध करुन देण्यावर भर दिला. तसेच म्हाडाची अर्धवट घरकुल योजना पुर्णत्वास नेण्यासाठी केंद्र व राज्य शासनाकडुन अधिकच निधी उपलब्ध करून देण्यासाठी आ. राजेश पवार व खा. अशोकराव चव्हाण यांचे माध्यमातून प्रयत्न करणार असल्याचे नमूद करुन आज व्यासपीठावर उपस्थित माजी नगराध्यक्ष विजू आप्पा उत्तरवार, संजय कुलकर्णी, सुभाष पेरेवार ( शिवसेना शिंदे गटाचे तालूका अध्यक्ष), म. खाजा म. सजन सेठ, शासकिय ठेकेदार तथा सामाजिक कार्यकर्ते संजिव सवई, भाजपा तालूका उपाध्यक्ष बाळासाहेब कौडगावकर, ज्ञानेश्वर सावंत, बालाजीराव ढगे, बालाजीराव माचेवाड, किशोर पबितवार, व्यापारी गणेश यम्मेवार, माजी नगराध्यक्ष श्रीनिवास अनंतवार, महिला आघाडीच्या सौ. प्रणिता जोशी, राणीताई पोटेवाड, माया दवने, भारतबाई दुधंबे, कांचन लोद आदींची उपस्थिती होती.

# कॉंग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष आ. पटोले यांनी घेतले श्री रेणुकादेवीचे सपत्नीक दर्शन!

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. ३१ ऑक्टोबर-**

कॉंग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष आमदार नानाभाऊ पटोले हे गुरुवारी आगामी होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर इच्छुक उमेदवारांशी चर्चा करून निवडणूकीची पुढील रणनीती ठरविण्यासाठी माहूर दौऱ्यावर होते. यावेळी त्यांनी गडावर भेट देऊन माता श्री रेणुका देवीचे सपत्नीक दर्शन घेत महाआरती केली.यावेळीनांदेड जिल्हा अध्यक्ष राजेश पावडे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

दर्शनानंतर त्यांनी शहरात आयोजित पक्षाच्या बैठकीला हजेरी लावली. यावेळी विधानसभा निरीक्षक बालाजी चव्हाण, ज्येष्ठ नेते, मार्केट कमिटीचे माजी सभापती मंचकराव देशमुख, माजी पं.स. सदस्य किशनराव राठोड, वानोळा जि.प. सर्कलचे इच्छुक उमेदवार कृष्णकुमार राठोड, जिल्हा सरचिटणीस आनंद पाटील तुपदाळे,



जेष्ठ नेते माणिकराव पाटील, माजी उपनगराध्यक्षा सौ.अश्विनी आनंद पाटील तुपदाळे, अ.भा.किसान सेलचे जिल्हा अध्यक्ष माधव पाटील पवळे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

